नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ११४ * * नागपूर * मंगळवार, दिनांक २२ जुलै २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## आमचे तोंड उघडायला लावू नका...

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :
सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) फटकारले आणि म्हटले की राजकीय लढाई तपास यंत्रणांमार्फत नव्हे तर निवडणुकीत लढली पाहिजे. ईडीचा असा वापर का केला जात आहे?
म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट बोर्ड प्रकरणात ईडीच्या अपीलावर सुनावणी करताना सोमवारी सीजेआय बीआर गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली. सीजेआय म्हणाले, "आम्हाला तोंड उघडायला लावू नका. अन्यथा, आम्हाला ईडीबद्दल कठोर टिप्पणी करण्यास भाग पाडले जाईल." ते म्हणाले, माझ्याकडे महाराष्ट्राचा काही अनुभव आहे. कृपया ही हिंसाचार देशभर पसरवू नका, अशा शब्दात त्यांनी ईडीला ताकिद दिली.

अग्राग्रलेख

## खरीखरी...

# नाही म्हणणे शिकलो

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी भारताचा पदोपदी अपमान करण्यासाठी जराही कसर ठेवली नाही. किमान दोन डझन वेळा भारत आणि पाकिस्तानचे युद्ध आपणच थांबवले, असे सांगून भारताला डिवचण्याचा प्रयत्न त्यांनी वारंवार केला. आतापर्यंत भारताकडून याबाबतीत कुठलीच प्रतिक्रिया आली नव्हती पण आता युरोपीय राष्ट्रे, अमेरिका आणि नाटो या सर्वांनी मिळून आपल्याला धमकावणे सुरू केलेले आहे. रशियाकडून क्रूड ऑइल खरेदी करू नका, अन्यथा तुमच्यावर जबर आयात शुल्क लागू केले जाईल अशी धमकी देण्यासही हे तथाकथित बडे नेते मागेपुढे पहात नव्हते. शेवटी आपल्या भारताचा सन्मान आणि हितासाठी या कंपूच्या दादागिरी विरुद्ध भारताने भूमिका घेतलेली आहे. हे कधीतरी होणे अपेक्षित होतेच मात्र, यापूर्वी आपण गप्प राहिलो पण अजूनही आपण गप्प राहिलो असतो. तर भारताला या युरोपियन कंपूने फार मोठ्या खड्ड्यात ढकलले असते. आताही भारताने घेतलेली भूमिका या मंडळींना पचणार नाही कारण अमेरिकेकडून महाग दराने तूरडाळ खरेदी करा त्यांच्या अन्नधान्याला भारतात प्रवेश द्या, असे दादागिरीचे प्रयोग हल्ली सातत्याने सुरू होते. रशियाकडून क्रूड ऑइल खरेदी करून त्याचे शुद्धीकरण करण्याचे दोन मोठे प्रकल्प भारतात आहेत, त्यापैकी नायारा ही एक मोठी कंपनी हे काम करीत होती. त्या कंपनीला युरोपियन देशात आता प्रवेश नाही. तेवढ्याच तोलामोलाची कंपनी रिलायन्सचीही आहे, काही दिवसानंतर रिलायन्सवरही ही गाज पडू शकते. आता अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रे यांच्याविरुद्ध भारताने सरळसरळ भूमिका घेतलेली आहे. या युरोपीयन युनियन मध्ये इंग्लंडचा समावेश नाही. आता इंग्लंड बरोबर व्यापारी करार होतो की नाही किंवा झाल्यास तो भारतानुकूल असेलच याची शाश्वती नाही. दुस?या महायुद्धात इंग्लंडचा पुढाकार होता त्यावेळी अमेरिका आणि इंग्लंड आणि इतर पाश्चिमात्य राष्ट्रांनी हिटलरचा पराभव केला होता. आता इंग्लंडशी आपले संबंध कसे राहतात हे पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यानंतरच कळेल. मग आता भारताजवळ पर्याय कोणता आहे, तर भारताला रशिया आणि चीन यांच्याशी जमवून घ्यावे लागेल. रशिया हा आपला जुना आणि पारंपारिक मित्र आहे पण चीन हा भारताचा मित्र असूच शकत नाही. धोका देण्याच्या बाबतीत चीन हा नामचीन आहे. याच चीनने भारताच्या सर्व शेजारी राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर कर्जे देऊन भारताविरुद्ध युद्धच पुकारलेले आहे हे उघड सत्य आहे. याचा अर्थ असा आहे की, भारताला जेवढा धोका अमेरिका आणि त्यांच्या बगल बच्चांकडून आहे तेवढाच किंवा त्यापेक्षा जास्त धोका चीनकडून सुद्धा आहे. म्हणजे आता अमेरिकेसोबत आपला करार झाला नाही कारण डोनाल्ड ट्रम्प म्हणतील तसा करार करण्यासाठी आपण तयार नाही. तर त्यामुळे जागतिक व्यापारात भारतासमोर यापुढे मोठे संकट उभे राहू शकते. जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या भारताला ही मंडळी डावलू शकणार नाहीत हेही तितकेच खरे आहे. तरीही आज भारताला नवे मित्र जोडण्याची गरज आहे. ही गोष्ट सुद्धा सत्य आहे की रशिया आपला जुन्या काळापासूनचा मित्र आहे. इराण सुद्धा आपला मित्र होता परंतु आपल्या डळमळीत परराष्ट्रीय धोरणामुळे अनेक मित्र दुरावलेले आहेत. त्यातच सध्याची ट्रम्पची दादागिरी बघून युरोपियन राष्ट्रेही भारताला छेडू शकतात कारण अशा अनेक बाबी आहेत कि, ज्या आपल्याला आयात केल्याशिवाय गत्यंतर नाही. साधी रासायनिक खतांची गोष्ट घेतली तरी डीएपी आणि युरिया या दोन रासायनिक खतांची निर्यात चीनने भारतासाठी जवळजवळ बंदच करून टाकलेली आहे. युरियाच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांना भयानक त्रास सोसावा लागत आहे त्यासाठी मोठमोठ्या रांगा लागलेल्या दिसतात. भारतातील इलेक्ट्रिक वाहनांना चीनकडून काही गोष्टी खरेदी कराव्या लागतात, त्यामध्ये लिथियम बॅटरी आणि त्यातील धातू ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. त्यावर सुद्धा चीन बंदी आणू शकतो म्हणजे हा उद्योगही रसातळाला जाऊ शकतो. 2014 पूर्वी भारत आणि चीन जवळ जवळ बरोबरीत होते मात्र, गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये चीनने योजनाबद्ध रीतीने अतिप्रचंड प्रगती केलेली आहे. याचे परिणाम पुढील काळात आपल्याला भोगावे लागू शकतात कारण गहू आणि तांदूळ यामध्ये आपण स्वयंपूर्ण आहोत. पण आपले दर एकरी उत्पादन चीनपेक्षा 50 टक्क्याहून कमी आहे त्यामुळे आपल्याला यापुढे अनेक समस्यांचा सामना करावा लागतो लागू शकतो. आता यातून मार्ग काढणे हेच आता सरकारचे मोठे काम ठरणार आहे. पण एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची झालेली आहे आणि ती म्हणजे अमेरिकेला हवा तसा करार करण्यास आपण नकार दिलेला आहे. भारताच्या इतिहासातील अत्यंत कठीण प्रसंगात किंवा कठीण काळात सध्या आपण वावरत आहोत. आज सकाळी पत्रकारांसोबत बोलताना मोदीजींनी विरोधी पक्षांना सहकार्याचे आवाहन केलेले आहे, ते सहकार्य दोन्ही बाजूंकडून सद्भावना असली तर आणि तरच शक्य आहे. एकूणच सध्याची परिस्थिती गोंधळाची आहे हे आपण मान्य केले पाहिजे. त्यातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला एकीची वज्रमूठ करावी लागेल आणि त्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागेल. ही काळ्या दगडावरची रेष आहे, हे कोणीही विसरू नये.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## २००६ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील
# आरोपींची निर्दोष सुटका

### फिर्यादी पक्षाला आरोप सिद्ध करण्यात अपयश : १८९ जणांचा गेला होता बळी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
मुंबई उच्च न्यायालयाने 2006 च्या मुंबई लोकल ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणात एक मोठा निकाल दिला आणि सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती एस.जी. चांडक यांच्या न्यायपीठाने हा निर्णय दिला आहे. या प्रकरणातील एकूण 12 आरोपींना यापूर्वी कनिष्ठ न्यायालयाने दोषी ठरवले होते, त्यापैकी 5 जणांना मृत्युदंड आणि 7 जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान, 11 आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. तर यातील एका आरोपीचा आधीच मृत्यू झाला आहे.

मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व 12 आरोपींना उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. उच्च न्यायालयाने म्हटले की, आरोपींविरुद्धचा खटला सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरला. घटनेला 19 वर्षे झाल्यानंतर हा निर्णय देण्यात आला आहे.



न्यायाधीश अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या विशेष न्यायपीठाने म्हटले की, सरकारी पक्षाने सादर केलेले पुरावे आरोपींना दोषी ठरवण्यासाठी निर्णायक नाहीत.

11 जुलै 2006 रोजी मुंबईच्या पश्चिम उपनगरीय भागात सात गाड्यांमध्ये साखळी स्फोट झाले होते. त्यात 189 प्रवासी मृत्युमुखी पडले आणि 824 लोक जखमी झाले होते. हे स्फोट संध्याकाळी 6:24 ते 6:35 दरम्यान झाले. हा तो वेळ होता जेव्हा लाखो प्रवासी काम केल्यानंतर मुंबईच्या लोकल ट्रेनमधून घरी परततात.

पोलिसांनी आरोपपत्रात 30 जणांची आरोपी म्हणून नावे दिली होती. त्यापैकी 13 जण पाकिस्तानी नागरिक असल्याचे आढळून आले.

**प्रेशर कुकर वापरून स्फोट**

11 जुलै 2006 रोजी मुंबईत संध्याकाळी 6:24 ते 6:35 दरम्यान एकामागून एक सात स्फोट झाले. हे सर्व स्फोट मुंबईच्या पश्चिम रेल्वेवरील लोकल ट्रेनच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात झाले. हे स्फोट खार, वांद्रे, जोगेश्वरी, माहिम, बोरिवली, माटुंगा आणि मीरा-भाईंदर रेल्वे स्थानकांजवळ झाले. ट्रेनमध्ये लावलेले बॉम्ब आरडीएक्स, अमोनियम नायट्रेट, इंधन तेल आणि खिळ्यांनी बनलेले होते, जे सात प्रेशर कुकरमध्ये ठेवण्यात आले होते आणि टायमर वापरून उडवले गेले.

20 जुलै 2006 ते 3 ऑक्टोबर 2006 दरम्यान दहशतवाद विरोधी पथकाने आरोपींना अटक केली. त्याच वर्षी नोव्हेंबरमध्ये, आरोपींनी न्यायालयाला लेखी माहिती दिली की, त्यांच्याकडून जबरदस्तीने कबुलीजबाब घेण्यात आले. आरोपपत्रात 30 आरोपींना दाखल करण्यात आले होते. यापैकी 13 जण पाकिस्तानी नागरिक म्हणून ओळखले गेले.

(अधिक वृत्त २ पान वर)

## ऑपरेशन सिंदूर पूर्णपणे यशस्वी पीएम मोदी



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :
पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या आवारात माध्यमांना संबोधित केले. ते म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले. आम्ही ऑपरेशन सिंदूर अंतर्गत २२ मिनिटांत दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले.

## उपराष्ट्रपती धनखड यांचा राजीनामा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :
जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपल्या राजीनाम्यामागे आरोग्याचे कारण दिले आहे. राष्ट्रपतींना पत्रात लिहिले, आरोग्याला प्राधान्य देऊन आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करून, मी भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा तात्काळ राजीनामा देत आहे.



पत्रात त्यांनी राष्ट्रपतींचे सहकार्य आणि सौहार्दपूर्ण संबंधांबद्दल आभार मानले. त्यांनी पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचे सहकार्याबद्दल आभार मानले. २०२२ मध्ये, जगदीप धनखड यांनी १४ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. ६ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या उपराष्ट्रपती निवडणुकीत धनखड यांनी विरोधी उमेदवार मार्गारेट अल्वा यांचा पराभव केला. धनखड यांची ३० जुलै २०१९ रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी बंगालचे २८ वे राज्यपाल म्हणून नियुक्ती केली. ते १९८९ ते १९९१ पर्यंत राजस्थानातील झुंझुनू येथून लोकसभा खासदार होते.






## गट ड कर्मचाऱ्यांचा आंदोलनाला पाठिंबा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय शिक्षण संस्थांमध्ये गंभीर तणाव निर्माण झाला आहे. १८ जुलैपासून आझाद मैदान, मुंबई येथे सुरू झालेल्या परिचारीकांच्या बेमुदत संप आंदोलनाला राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने ठाम आणि जाहीर पाठिंबा दिला आहे.

## बांगलादेश वायूदलाचे विमान शाळेवर कोसळले
# पायलटसह १९ ठार

■ वृत्तसंस्था, ढाका, दि. २१ :
सोमवारी ढाका येथील एका शाळेवर बांगलादेश हवाई दलाचे एक प्रशिक्षण विमान कोसळले. या अपघातात पायलटसह १९ जणांचा मृत्यू झाला आहे.

**१६४ जखमी**

या अपघातात १६४ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. ६० हून अधिक जखमींना बर्न इन्स्टिट्यूटमध्ये रेफर करण्यात आले आहे. किरकोळ जखमी झालेल्या अनेकांवर उत्तरा मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.

जखमींना हातगाडीतून रुग्णालयात नेण्यात येत असल्याचा व्हिडिओही समोर आला आहे. अनेक जखमी मुलांना हेलिकॉप्टरने रुग्णालयात नेण्यात आले.

## गांधार फाउंडेशनच्या मोफत डायलिसिस सेंटरचे
# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :
राज्यात आरोग्य सेवा अधिक सक्षम करत सामान्य माणसाला दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी शासन अनेक योजना, उपक्रम राबवत आहे. शासनाच्या या योजना उपक्रमाबरोबरच सामान्य माणसाला आरोग्याच्या अत्यावश्यक सेवा मिळण्यासाठी सामाजिक संस्थांचे योगदान मोलाचे ठरत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



गांधार फाउंडेशनतर्फे डीएचएल पार्क गोरेगाव पश्चिम येथे उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

फडणवीस म्हणाले, राज्यातील कोणताही रुग्ण आरोग्य सेवेपासून वंचित राहू नये, त्याला वेळेत उपचार मिळावेत हा शासनाचा प्रयत्न आहे. यासाठी राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत दिले जातात. मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून चॅरिटेबल हॉस्पिटल्समधील राखीव बेड्स गरजूंना मिळावेत यासाठीही काम केले जात आहे.

सामाजिक उत्तरदायित्व जपत मोफत डायलिसिस सेंटरच्या माध्यमातून रुग्ण सेवेचा घेतलेला हा वसा सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

गांधार फाउंडेशनमार्फत या डायलिसिस सेंटरमधून दररोज ३० रुग्णांना मोफत डायलिसिस उपचार देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी आमदार विद्या ठाकूर आणि आमदार योगेश सागर यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात गांधार फाउंडेशनच्यावतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २१ लाखाचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमास आमदार विद्या ठाकूर, आमदार योगेश सागर, आमदार अतुल भातखळकर, प्रवीण दरेकर, गांधार ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन रमेश पारेख, डॉक्टर श्याम अग्रवाल, समीर पारेख आदी उपस्थित होते.







## तटकरेंनीच हल्ला घडवून आणला

### मनोज जरांगेंचा आरोप



**मुंबई :** लातूरमध्ये छावा संघटनेचे नेते विजयकुमार पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या बेदम मारहाणीच्या घटनेने राज्यात खळबळ उडवली आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुनील तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला, असे मनोज जरांगे म्हणालेत. तसेच या प्रकरणी गृहमंत्र्यांनी कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही मनोज जरांगे यांनी केली आहे.

हा हल्ला तटकरे यांनीच घडवून आणला आहे, अशी आमची शंका आहे. हा पूर्वनियोजित प्रकार आहे. यामध्ये मराठा समाजाविषयी असलेला द्वेष स्पष्टपणे दिसतो. विजय भैय्या हे शेतक?यांचे लेकरू आहे. ते जर आज मागणी करायला गेलेत तर तुम्ही त्यांना मारता. म्हणजे हे तुम्हाला सोपे जाणार नाही. असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

## कोकाटेंचा राजीनामा केव्हा घेणार?



**मुंबई :** लातूर येथील सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत झालेल्या हिंसक घटनेनंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांची पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. या प्रकरणावरून विरोधक कृषिमंत्री कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. मोठ्या माशाला वाचवण्यासाठी लहान माशा बळी देऊन चालणार नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी म्हटले आहे. तर सूरज चव्हाणांवर [illegible] झाला, पण अटक कधी होणार?तसेच माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा कधी घेणार? असा सवाल सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे.

खासदार सुनील तटकरे हे रविवारी लातूर दौऱ्यावर आले असताना छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर पत्ते फेकत सभागृहात रमी खेळणाऱ्या कृषि मंत्र्याचा राजीनामा घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. छावाचे कार्यकर्ते बाहेर येताच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. यावर आता रोहिणी खडसे आणि अंजली दमानिया यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अजित पवारांकडे माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या बेलगाम झालेल्या युवक प्रदेशाध्यक्षाचा राजीनामा घेतला ही स्वागतार्ह बाब आहे. पण त्यांनी दुधाची भूक ताकावर भागवण्यासारखा प्रकार करू नये. मोठ्या लाडक्या माशाला वाचवण्यासाठी फक्त लहान माशाचा बळी देऊन चालणार नाही. अजितदादांनी मस्तवाल कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचाही राजीनामा घ्यावा, अशी आमची मागणी असल्याचे रोहिणी खडसे म्हणाल्या. हे प्रकरण त्यांच्यापासूनच सुरू झाले. त्यामुळे बेजबाबदार, सभागृहाचा, शेतकऱ्यांना अवमान करणाऱ्या मंत्र्यांचाही राजीनामा घ्यायला हवा, असे रोहिणी खडसे म्हणाल्या.

**अंजली दमानिया काय म्हणाल्या?**

१५ तासानंतर अजित पवारजी आपल्याला आत्मसाक्षात्कार झाला आणि मग आपण सूरज चव्हाण यांना राजीनामा देण्याचे आदेश दिलेत त्याबद्दल जनता आपली आभारी आहे. त्यांच्यावर [illegible] झाला, पण अटक कधी होणार? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला आहे. ते आदेश आपण उपमुख्यमंत्री म्हणून द्यावेत, असेही त्यांनी म्हटले. तसेच आता माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा कधी घेणार? असा सवालही अंजली दमानिया यांनी अजित पवारांना केला आहे.

## दाबेली विक्रेत्याचा खून

**पुणे :** पुणे शहरातील पर्वती दर्शन परिसरात एका कच्छी दाबेली विक्रेत्या तरुणाच्या गळ्यावर चाकूने सपासप वार करुन निर्घृण खून करण्यात आल्याची घटना सोमवारी घडली. या घटनेनंतर पोलिसांनी पसार झालेल्या हल्लेखोराला अटक केली. दिनेश प्रभाकर क्षीरसागर (35, मूळ राहणार यवतमाळ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सदर आरोपी हा फिरस्ता असून त्याला दारूचे व्यसन देखील आहे. आहे. दानिश सिद्दिकी (वय २५, रा. पर्वती दर्शन,पुणे) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. दानिश सिद्दीकी हा त्याचा भाऊ, त्याच्या पत्नीसह मागील काही वर्षांपासून पर्वती दर्शन परिसरात राहात होता. पर्वती दर्शन भागात तो हातगाडीवर कच्छी दाबेली विक्री व्यवसाय करत होता.

### फिर्यादी पक्षाचे अपयश, साक्षीदारांचे जबाब, आरोपींचा युक्तिवाद

# सर्वच मुद्यांवर हायकोर्टाचे बोट



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१:**

मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी मुंबईतील 2006 च्या साखळी बॉम्बस्फोटातील 12 आरोपींची निर्दोष सुटका केली. हा निकाल देताना कोटार्ने या खटल्यातील मुख्य मुद्दे प्रभावीपणे मांडण्यात वकिलांना अपयश आल्याचे नमूद केले आहे.

एवढेच नाही तर बॉम्ब तयार करताना पाहिल्याचा दावा करणारा एक साक्षीदार चक्क 100 दिवस गप्प होता, तर अन्य एका साक्षीदाराला घटनेनंतर 4 वर्षांतच आरोपींना ओळखण्यात अपयश आल्याचे निरीक्षणही कोटार्ने या प्रकरणी नोंदवले आहे.

न्यायमूर्ती किलोर व न्यायमूर्ती एस एम चांडक यांच्या विशेष खंडपीठाने 2006 च्या मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटाप्रकरणी 5 आरोपींना कनिष्ठ न्यायालयाने ठोठावलेली फाशीची शिक्षा रद्दबातल ठरवत सर्वच 12 आरोपींची निर्दोष सुटका केली.

**कोर्टाने नोंदवलेली ठळक निरीक्षणे :**

अवघ्या 4 वर्षांच्या कालावधीनंतर साक्षीदार आरोपीला ओळखू शकले नाही, हे अत्यंत असामान्य आहे.

सरकारी वकिलांचे पुरावे दोषसिद्धीसाठी पुरेसे नव्हते.

फिर्यादी पक्ष प्रत्येक गुन्ह्यात आरोपींविरुद्ध वाजवी संशयापलीकडे गुन्हा सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आहे असे मानल्यानंतर, आरोपींनी ज्या गुन्ह्यांसाठी त्यांना दोषी ठरवण्यात आले आहे आणि शिक्षा सुनावण्यात आली आहे तेच गुन्हे केले आहेत अशी खात्री पटणे असुरक्षित आहे. म्हणून, दोषसिद्धी आणि शिक्षेचा वादग्रस्त निर्णय आणि आदेश रद्द केला जाऊ शकतो.

विशेषतः काही साक्षीदार हे सामायिक साक्षीदार असल्याचेही तपासात निष्पन्न झाले. हे साक्षीदार इतर अनेक प्रकरणांतही साक्षीदार म्हणून हजर राहिले होते.

एका साक्षीदाराने आरोपींना बॉम्ब तयार करताना पाहिल्याचा दावा केला होता. पण तो साक्षीदार तब्बल 100 दिवस गप्प राहिला. सुरुवातीला तो संशयित होता. पण नंतर त्याने त्याचा जबाब बदलला.

सरकारी पक्ष दोषसिद्धी कायम ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात साफ अपयशी ठरला आहे.

पुस्तके, नकाशे, सीपीयू आदी वस्तूंची जप्ती सिद्ध झाल्याचे मानले गेले तरी, आरोपीविरुद्ध सध्याचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी ते पुरेसे नाही.

कबुलीजबाबातील विधाने सत्य आणि विविध कारणांमुळे पूर्ण आढळली नाहीत, ज्यात काही भाग समान आणि कॉपी केलेले आढळले.

आरोपींनी कबुलीजबाब घेण्यासाठी आपला छळ झाल्याचा आरोप केला होता. त्यांना हा आरोप सिद्ध करण्यात यश आले.

शिवाय, बचाव पक्षाने सीडीआर न पुरवल्याबद्दल प्रतिकूल निष्कर्ष काढण्याची विनंती केली. रेकॉर्ड तपासल्यावर, आम्हाला बचाव पक्षाच्या बाबतीत तथ्य आढळले, असेही कोर्टाने आपल्या निकालपत्रात म्हटले आहे.

## सुप्रीम कोर्टात अपिल करण्याची शिंदे गटाची मागणी



मुंबई 2006 रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील 11 आरोपींना उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. पार्श्वभूमीवर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

या निर्णयावर प्रतिक्रिया देताना शिंदे गटाचे नेते कृष्णा हेडगे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. 7/11 दुर्घटना आरोपींना आरोपमुक्त करने दुःखद असल्याचे ते म्हणालेत. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील करावे, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे केली आहे. तसेच त्यांनी तत्कालीन काँग्रेस सरकारवही आरोप केले आहेत.

2006 मध्ये झालेल्या मुंबईतील 7/11 रेल्वे साखळी बॉम्बस्फोटाच्या घटनेमुळे संपूर्ण देश हादरून गेला होता 200 हून अधिक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता आणि 700 पेक्षा अधिक लोक गंभीर जखमी झाले होते.


या प्रकरणात अनेक वर्षे तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. सत्र न्यायालयाने काही आरोपींना दोषी ठरवून शिक्षा दिली होती. मात्र उच्च न्यायालयाने त्या निर्णयाला उलथवत आरोपींना निर्दोष घोषित केले.

उच्च न्यायालयाने या प्रकरणातील आरोपींना निर्दोष सोडल्याचे ऐकून अतिशय दुःख झाले. आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती करतो की, त्यांनी तातडीने उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील करावे. जर हे प्रकरण न्यायाच्या अंतिम टप्प्यात पोहोचत असेल, तर त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे आवश्यक आहे. हेडगे यांनी महाराष्ट्र सरकारकडे मागणी केली की, सर्वोच्च न्यायालयात अपील करताना एक सक्षम कायदेशीर टीम नियुक्त करण्यात यावी.

### मंत्री आणि आमदार

# खरेच माजलेत

### हर्षवर्धन सपकाळांचा घणाघात



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१:**

राज्यात दररोज सहा शेतकरी आत्महत्या करत असताना कृषिमंत्री विधानसभेत ऑनलाईन रमी खेळत बसतात, हे महाराष्ट्राची लाज वेशीवर टांगण्यासारखे असल्याचा संताप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला आहे.

मंत्र्यांना काहीच भान राहिलं नाहीये. आमदार, मंत्री, पदाधिकारी सगळेच माजलेत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री या माजलेल्या लोकांना वेसन घालू शकत नाहीत. फक्त विरोधकांवर कारवाई करण्याची मर्दुमकी दाखवण्याऐवजी निर्लज्ज कृषिमंत्री आणि गुंडगिरी करणा?या पदाधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची धमक दाखवा, असा थेट इशारा सपकाळ यांनी दिला.

विधानभवनातील हाणामारीवर मुख्यमंत्री म्हणाले होते, आमदार माजलेत. यावर उत्तर देताना सपकाळ म्हणाले, आमदारच नाही तर मंत्री आणि पदाधिकारीही माजलेत हे मुख्यमंत्र्यांना दिसत नाही का? कृषिमंत्री कधी शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, कधी कर्जमाफीच्या पैशातून लग्न करतात म्हणतात, आणि आता सभागृहात रमी खेळत बसतात.

या घटनेच्या निषेधार्थ छावा संघटनेने लातूरमध्ये राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना पत्त्यांचा सेट देत आंदोलन केले. हा निषेधाचा मार्ग असताना, अजित पवारांच्या गुंडांनी आंदोलकांवर हल्ला केला. हा माज कशातून येतो? सत्ता डोक्यात गेलेली आहे, पण ही नशा फार काळ टिकत नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**हनीट्रॅप प्रकरणावरुन सरकारवर हल्लाबोल**

राज्यातील काही मंत्री व अधिकारी हनीट्रॅपमध्ये अडकलेत, असे काँग्रेसने सभागृहात सांगितले. तरी मुख्यमंत्री असे काही घडले नाही म्हणाले. मुख्यमंत्र्यांचा निकटवर्तीय मंत्री आणि हनीट्रॅपमधील व्यक्तीचा फोटो समोर आलाय. सरकार हे प्रकरण दडपतेय. उच्चस्तरीय चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी सपकाळ यांनी केली.

## महाराष्ट्राचाच जुगाराचा डाव करून टाकलाय...

### जितेंद्र आव्हाडांकडून कृषिमंत्र्यांचे आणखी दोन व्हिडिओ शेअर, मागेल तेवढे पुरावे देण्याचे आव्हान



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१:**

विधिमंडळाच्या सभागृहात प्रश्नोत्तरांचा तास सुरू असतानाच राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाइलवर जंगली रमी हा ऑनलाईन जुगार खेळताना आढळल्याच्या प्रकरणात आता नवा ट्विस्ट आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी कोकाटेंचे पत्ते खेळतानाचे आणखी दोन व्हिडिओ समोर आणून खळबळ उडवून दिली आहे. दोन्ही व्हिडिओ व्यवस्थित बघा... कुठला पत्ता कुठे आणि कसा हलवला आहे, हे दिसेल, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तसेच मागेल तेवढे पुरावे देण्याचे आव्हानही आव्हाड यांनी दिले आहे.

आमदार रोहित पवार यांनी काल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधीमंडळाच्या सभागृहात पत्ते खेळतानाचा व्हिडिओ त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केला होता. यानंतर विरोधकांकडून माणिकराव कोकाटे आणि महायुती सरकारवर टीका करण्यात सुरुवात केली होती. चौफेर टीका सुरू झाल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी मी युट्युब बघत होतो आणि रमीची जाहिरात स्किप करत होतो, असे स्पष्टीकरण दिले. मात्र, आता जितेंद्र आव्हाड यांनी थेट दोन नवे व्हिडीओ सादर करून यामध्ये कुठला पत्ता कुठे आणि कसा हलवला आहे, हे दिसेल, असा दावा करत कोकाटेंच्या स्पष्टीकरणावर पाणी फेरले आहे.

एकीकडे विधिमंडळाचे कामकाज सुरू आहे; प्रश्नोत्तरांचा तास सुरू आहे अन दुसरीकडे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे जंगली रमी खेळत होते. त्याचा व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर, माणिकराव कोकाटे यांच्या पहिल्या व्हिडिओत ते जंगली रमी खेळतच नव्हते जाहिरात बघत होते असे सांगण्यात येत होते. आता मी दोन व्हिडिओ देतोय. दोन्ही व्हिडिओ व्यवस्थित बघा... कुठला पत्ता कुठे आणि कसा हलवला आहे, हे दिसेल, माणिकराव कोकाटे हेच ऑनलाईन जुगाराचे पत्ते आपल्या बोटाने सरकवत आहेत. आणखी किती पुरावे हवेत ते सांगा; मागाल तेवढे पुरावे देतो, असे आव्हानही आव्हाड यांनी दिले आहे. महाराष्ट्राचाच जुगाराचा डाव करून टाकलाय...! असे म्हणत आव्हाड यांनी संताप व्यक्त केला.

## पत्ते उधळणे योग्य नव्हते



■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. २१:**

लातूर येथे अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली होती. या सगळ्यावर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ता सुरज चव्हाण यांच्या राजीनाम्यावर तसेच लातूरच्या घटनेवर विचारण्यात आले असता छगन भुजबळ म्हणाले, मला त्याची माहिती नाही. अजित दादांनी काय आदेश दिले आहेत मला माहीत नाही. ज्यांना निवेदन द्यायचे त्यांनी द्यावे. पण. पत्ते उधळणे योग्य नाही, पत्ते खेळणे हा प्रकार काय तटकरे यांनी केला नव्हता, असे म्हणत भुजबळ यांनी माणिकराव कोकाटे यांना अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

## सूरज चव्हाण यांचा तात्काळ राजीनामा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१:**

लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये काल घडलेली घटना अत्यंत गंभीर, दुर्दैवी आणि निषेधार्ह असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. हिंसेला, असभ्य वर्तनाला किंवा असंसदीय भाषेला मी ठामपणे विरोध करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

समाजातील प्रत्येक घटकाच्या न्याय्य मागण्यांचा आणि भावनांचा आम्ही मनापासून सन्मान करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ओळख ही छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही, समता व बंधुत्वाच्या विचारांवरच उभी आहे, असेही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले.

अजित पवार यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की, सामाजिक जीवनात काम करत असताना नेहमी लोकशाही, शांतता आणि अहिंसा या मुल्यांना प्राधान्य द्या.

लातूरमध्ये घडलेल्या या घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना त्यांच्या पदाचा तात्काळ राजीनामा देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्याचे अजित पवार यांनी जाहीर केले. पक्षाच्या मूल्यांच्या विरोधात जाऊन केले जाणारे कोणतेही वर्तन कोणत्याही स्थितीत स्वीकारले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### १ हजार कुटुंबांच्या जखमा

# पुन्हा भळभळल्या

### शेकडोंचा बळी घेतला कोणी?



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ :**

2006 च्या 11 जुलैची एक शांत पावसाळी सायंकाळ... मुंबईतील चाकरमान्यांची पाऊले दिवसभराचे कामकाज संपवून आपल्या घराच्या दिशेने वळली होती. त्यांच्या गर्दीने लोकलचे डब्बे खचाखच भरले होते. तेव्हा अचानक रेल्वे लागोपाठ झालेल्या स्फोटांनी हादरली. काय घडले? कसे घडले? हे कुणालाच समजेना... स्फोटांचे खरे कारण कळेपर्यंत 189 जणांचा बळी गेला होता, तर 700 हून अधिक जणांना कायमचे अपंगत्व प्राप्त झाले होते.

मुंबई हायकोर्टाने सोमवारी या स्फोटांसाठी कथितपणे जबाबदार असणाऱ्या सर्वच 12 आरोपींची निर्दोष सुटका केली. यामुळे भारताच्या इतिहासातील या काळ्याकुट्ट घटनेत आप्तस्वकिय गमावणाऱ्या व कायमचे अधू झालेल्या जवळपास 1 हजार कुटुंबांच्या जखमा पुन्हा भळभळल्या आहेत.

देशात कुठेही जातीय हिंसाचार झाला, तर त्याचे गंभीर परिणाम मुंबईला भोगावे लागतात. अयोध्येत बाबरी मस्जिद पाडण्यात आली. त्यानंतर लगेचच मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले.

गोधरा हत्याकांडानंतर गुजरातमध्ये दंगल उसळली. त्यावर प्रतिक्रिया म्हणून मुंबईत बॉम्ब फोडण्यात आले. यामागे एकच कारण आहे, ते म्हणजे भारताचा आर्थिक कणा असणाऱ्या मुंबईची गाडी रुळावरून घसरवायची. पण मुंबई अशा घटनांनी थांबली नाही. ती पुन्हा सावरली. स्वतःच्या हिंमतीवर उभी राहिली. हेच मुंबईचे खरे वैशिष्ट्य आहे.

पण सोमवारी 2006 मध्ये मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांतील आरोपींची निर्दोष सुटका झाली आणि या घटनेतील पीडित कुटुंबीयांवर पुन्हा एकदा दुःखाचा आभाळाएवढा डोंगर कोसळला.

या स्फोटांमध्ये तब्बल 189 जणांचा बळी गेला होता. अनेकांनी आपले अवयव गमावले होते. अनेकांच्या अंगांत लोखंडी खिळे शिरले होते. काहींना अर्धांगवायू झाला. काहींनी आपल्या कुटुंबाचा एकमेव आधार गमावला. या स्फोटांमध्ये कायमचे बहिरेपणा आलेल्या लोकांचा आकडा खूप मोठा होता. कालांतराने या स्फोटांची स्मृती अंधुकशी झाली, पण त्याचा मनावर झालेला आघात तसाच अबाधित राहिला.

या स्फोटात मारल्या गेलेल्या किंवा जखमी झालेल्या प्रत्येक व्यक्तीची एक वेगळी कहाणी आहे. जवळपास 1 हजार गोष्टींपैकी काही गोष्टी प्रकर्षाने सांगतात की, त्या स्फोटांत कशा पद्धतीने त्यांचे आयुष्य उद्धवस्त झाले होते. पराग सावंत यांच्या पत्नी व छोट्या मुलीसह त्यांच्या मातोश्री माधुरी व वडील जयप्रकाश यांच्या वेदनाही काही कमी नाहीत. पराग अनेक वर्षे कोमात राहिले. त्यानंतर 2015 साली त्यांचा मृत्यू झाला. जयप्रकाश म्हणतात, त्यांच्या मुलासोबत जे घडले ते इतर कोणासोबतही घडू नये.

आजही सुहास तावडे यांचे डोळे लोकल ट्रेनच्या डब्यातील त्या अज्ञात सहप्रवाशांचे चेहरे शोधण्याचा प्रयत्न करतात, ज्यांना ते दररोज पाहत होते. परंतु स्फोटांनंतर ते अचानक गायब झाले. स्फोटानंतर, ते रेल्वेत खाली पडले होते. त्यांच्या शरीरात धातूचे अनेक तुकडे घुसले. त्याच्या वेदना ते आजही सहन करतात.

देवयानी दळवी यांचे पती चंद्रकांत दळवी या स्फोटातून वाचले, पण त्यांना अर्धांगवायू झाला. 2009 मध्ये त्यांचे निधन झाले. तेव्हापासून देवयानी आर्थिक व मानसिकदृष्ट्या आपल्या कुटुंबाचे जीवन संतुलित करण्याचा प्रयत्न करत आहेत. या घटनेत कानाच्या पडद्यांना दुखापत झालेल्या लोकांची संख्या सर्वाधिक आहे. या स्फोटांमुळे बहिरेपणा लोकांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनला.

या स्फोटांमधील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी अशी महेंद्र पितळे यांची इच्छा होती. या स्फोटांमध्ये डावा हात कायमचा गमावलेले पितळे आज कृत्रिम हाताच्या मदतीने जगत आहेत. अनेक कुटुंबांच्या अशाच जखमा आजही कायम आहेत.

# आळंदीत वारकरी कीर्तनकार परिषदेत एकमत

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :**

विखुरलेल्या समाजाला चालना देण्यासाठी संताचे विचार अत्यंत महत्वाचे आहे. या समाजाला जोडण्याचे कार्य केवळ वारकरी संप्रदायाने केले आहे.हा संप्रदाय म्हणजे समन्वयाचे स्त्रोत आहे. संतत्व म्हणजे मातृत्व असून हेच समाजाला जोडून ठेवतात असा सूर परिषदेत सहभागी सर्व कीर्तनकार व संत साहित्य अभ्यासक तज्ज्ञांनी काढला.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे व एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित दोन दिवसीय महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदेचे तिसरे सत्र वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची लोककल्याणकारी वाटचाल याविषयावर संपन्न झाले. यासत्रात हा सूर निघाला.

प्रसंगी पंढरपुर येथील वै.हभप श्रीगुरू अप्पासाहेब वासकर महाराज फडचे प्रमुख हभप देवव्रत (राणा) महाराज वासकर, आळंदी येथील हभप डॉ.




नारायण महाराज जाधव, श्रीवरद विनायक संस्थानचे प्रमुख हभप उध्दव महाराज मंडलिक,पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रा. हभप डॉ. दिनेश रसाळ, सामाजिक उद्योजक व आरएफआयडी-एनएफसी तंत्रज्ञानाचे प्रणेते असीम पाटील आणि संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक व अर्थव्यवहार विश्लेषक अभय टिळक हे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ.राहुल कराड होते. तसेच संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांची विशेष उपस्थिती होती. तसेच, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, पद्मश्री पोपटराव पाटील व परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील उपस्थित होते.

दिनेश रसाळ म्हणाले, जगाचे कल्याण हे केवळ संतांच्या विचारातच आहे. त्यामुळे साधु संतांच्या समतेचा विचार समाजाता रुजवावा. यांनी समाजात माणुसकीचा संदेश दिला आहे. संत यांच्या आचरणांमुळेच समाजाची घडी व्यवस्थित बसली आहे.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
वाशीम, दि. २१ :

वाशीम जिल्ह्यातील विविध ठिकाणी झालेल्या घरफाडीच्या गुन्ह्यातील आरोपींना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखा वाशीम व रिसोड पोलिस स्टेशनच्या पथकांना यश आले. याप्रकरणी दोन आरोपींना जेरबंद करण्यात आले. त्यांच्याकडून ११ लाख १७ हजर ७४० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



याबाबत पोलिस सूत्राकडुन मिळालेल्या माहितीनुसार १ मार्च २०२५ रोजी फियार्दी राजेश श्रावण बलकार रा. मोप ता. जि. वाशीम यांचे तक्रारीवरुन गुन्हा दाखल करुन आरोपीच्या शोधकामी स्थागुशा व रिसोड पोस्टेच्या वतीने पथके तयार करण्यात आली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने आरोपी ईश्वर उर्फ प्रभूराज युवराज पवार, रा. बीबी, ता. लोणार जि. बुलढाणा व श्यामराव रामकिसन पवार, रा. जांभरुण नावजी ता. जि. वाशीम यास शिताफीने ताब्यात घेतले.

त्यानंतर जिल्हा पोलिस अधीक्षक यांचे आदेशाने नमूद आरोपींना पोलिस स्टेशन यांचे ताब्यात देऊन गुन्ह्याचे गांभीर्य बघून उपरोक्त आरोपींचा पोलिस कोठडी घेऊन सखोल चौकशी केली असता आरोपींनी एकूण १० गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्यांचेकडून ११२ ग्रॅम सोने, ५०० ग्रॅम चांदी, एक मोबाईल, एक मोटारसायकल व नगदी ४५०० रुपये असा एकूण ११ लाख १७ हजार ७४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात बुलढाणा व हिंगोली जिल्ह्यातील आणखी तीन आरोपी सहभागी आहेत.

सदरची कामगीरी जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलिस अधीक्ष लता फड, सहायक पोलिस अधीक्षक नवदीप अग्रवाल, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक प्रदिप परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली रिसोड पोस्टे पोनि रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलिस निरीक्षक जगदीश बांगर, पोलिस उपनिरीक्षक सचिन गोखले, शेखर मास्कर, मसपोउपनि मिना पाथरकर, पोहवा प्रशांत राजगुरू, दिपक सोनोने, गजानन झगरे, विनोद घनवट, रवि अढागळे, परमेश्वर भोने, देविदास काळबांडे, संदीप दुतोंडे, दिपक घुगे, गजानन गोटे, सुजर खडके, चापोहवा साहेबराव मुकाडे, मपोशि योगिता भस्मे, कांचन डोंगरदिवे आदींच्या पथकाने केली.

# महिला सरपंचाचा प्रताप

## शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी वय वाढवले

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २१ :

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी कुणी काय करेल, याचा नेम नाही. वृद्धपकाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी एका महिला सरपंचांनी चक्क बनावट आधार कार्ड तयार करून स्वतःचे वय वाढवले. त्यानंतर योजनेचा लाभही घेतला. या प्रकरणाचे बिंग फुटल्याने अपर जिल्हाधिकाऱ्यांनी सदर महिला सरपंचाला अपात्र ठरवले. मोहाडी तालुक्यातील पिंपळगाव/कान्ह. येथे हा प्रकार उघडकीस आला.

सरपंच रेखा गभणे यांनी वृद्धपकाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी बनावट आधार कार्ड तयार करून वय वाढवले होते. त्यांनी सरपंच होण्यापूर्वी या योजनेचा लाभ घेण्यासाठी दुसरे बनावट आधार कार्ड तयार केले होते. त्या आधार कार्डवर वय ४९ वरून थेट ७१ केले होते. १ जानेवारी २०२१ पासून शासनाकडून अनुदानही घेतले. दरम्यान, मोहाडीच्या तहसीलदारांनी, शासनाची फसवणूक करून शासकीय योजनेचा लाभ घेत असल्याचा ठपका ठेवला. दरम्यान, पिंपळगाव/ कान्ह येथील उपसरपंच उमेश उपरकर यांनी १२ डिसेंबर २०२४ ला सरपंच गभणे यांच्याविरुद्ध अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते.

सदर प्रकरणाचा निकाल देत अपर जिल्हाधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांनी आदेश पारित केला. या आदेशानुसार सरपंच गभणे, सरपंच व सदस्य मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ -१ (ज)अंतर्गत दोषी आढळून आल्याने त्यांना पदावरून कमी करण्यात आले. तसेच पद रिक्त झाले, असे अपर जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात नमूद केले आहे.

मोहाडीच्या तहसीलदारांमार्फत वृद्धपकाळ निर्वाह योजनेतील बोगस लाभार्थी शोधण्यासाठी मोहीम राबवण्यात आली. लाभार्थ्यांकडून वयाचे पुरावे मागवण्यात आले. त्यात रेखा गभणे यांनी ७१ वर्षे वय वाढवून दिलेले आधार कार्ड तलाठ्यांकडे जमा केले. परंतु, सरपंचपदाचे नामनिर्देशन दाखल करताना ४९ वयाचे आधार कार्ड जोडले होते. याप्रकरणी उपसरपंच उमेश उपरकर यांनी जिल्हाधिकारी, मोहाडी तहसीलदारांकडे तक्रार केली होती. गभणे यांना सरपंचपदावरून अपात्र करण्याची मागणी केली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला होता.

सरपंच गभणे यांनी आठ वर्षांपूर्वी वृद्धपकाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी सेतू केंद्रावरून दोन बनावट आधार कार्ड तयार करून घेतले. एकावर १० नोव्हेंबर १९७५, तर दुसऱ्या आधार कार्डवर १ जानेवारी १९५३ अशा जन्मतारखा मुद्रित आहेत. त्या दोनपैकी दुसरे आधार कार्ड वापरून त्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. खोट्या जन्मतारखेच्या आधार कार्डनुसार त्यांचे वय ७१ वर्षे आहे. प्रत्यक्षात त्यांचे वय ४९ वर्षे आहे.

रेखा गभणे यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंचपदासाठी ऑनलाइन नामनिर्देशन दाखल केले होते. प्रमाणपत्रावर आणि ऑनलाइन अर्जातही १० नोव्हेंबर १९७५ ही जन्मतारीख लिहिलेली आहे. त्यांचे माहेर भंडारा तालुक्यातील सिरसी येथील असून, तेथील शाळेतील रेकॉर्डवरही १० नोव्हेंबर १९७५ हीच जन्मतारीख नोंदविलेली आहे. त्यांनी निवडणूक लढण्यासाठी टीसीचा आधार घेतला. वृद्धपकाळ निर्वाह योजनेच्या लाभासाठी बनावट आधार कार्डचा वापर केला, दोन्ही आधार कार्ड बघितल्यावर हे लक्षात येते. त्यांच्या आंधळगाव येथील बँक खात्यावर महिन्याला दीड हजार रुपये मानधन जमा झाले होते.

# ४ गायी व २ वासरांवर ॲसिड टाकून जाळण्याचा प्रयत्न



■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. २१ :

शहरालगत असलेले नागापूर रूपाळा ग्रामपंचायत येथील सेवालाल महाराज मंदिराला गावातील लोक नवस पूर्ण झाला की, गायी, वासरे दान म्हणून सोडत असतात. त्यांची देखरेख ग्रामपंचायत करत असते. या मंदिरात 4 गायी व 2 वासरे सोडलेली आहेत.गुरुवार, 17 जुलै रोजी संध्याकाळी 6 च्या सुमारास अज्ञात इसमाने या चार गायी व दोन वासरांवर ॲसिड टाकून त्यांना जाळण्याचा प्रयत्न केल्याने भाविकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

तक्रारदार सरपंच सुलावती डुकरे यांच्या तक्रारीवरून अज्ञात इसमावर उमरखेड पोलिस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नागापूर येथे मंदिराला सोडलेल्या चार गाई व दोन वासरांवर अज्ञात इसमाने ॲसिड टाकून त्यांना जखमी केल्याचे सरपंचांना एका गावकड्याने कळविले. या घटनेची पाहणी करण्याकरिता पोलिस पाटील गजानन तोडासे, भीमराव राठोड आणि देविदास जाधव यांनी गावात जाऊ त्यांचा शोध घेतला. त्यांना चारही गायी व दोन्ही वासरांवर कोणीतरी ॲसिड टाकून जखमी केल्याचे दिसून आले. गावकड्यांना विचारले केली असता कोणीही ॲसिड टाकणाड्या इसमास बधितले नसल्याचे सांगितले.

गाई व वासरांवर ॲसिड टाकणाड्या अज्ञात इसमाचा शोध घेवून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याकरिता नागापूर रूपाळाच्या सरपंच सुलावती राजाराम डुकरे यांनी उमरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. या तक्रारीवरून अज्ञात इसमावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक गणेश मुंडे व जमादार जयकुमार राठोड करीत आहेत.

# महापालिकेने जप्त केलेल्या हातगाड्या मोडून भंगारात काढा

## मनपा आयुक्तांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २१ :

महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने कारवाई दरम्यान जप्त केलेल्या हॉकर्सच्या शेकडो हातगाड्या कार्यशाळा विभागात पडून आहेत. प्रशांतनगर उद्यानाच्या पाहणीदरम्यानच शनिवारी मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी लागूनच असलेल्या मनपाच्या कार्यशाळेला भेट दिली. त्यावेळी त्यांना एका रांगेत लावलेल्या हातगाड्या दिसल्या. या येथे कशासाठी ठेवल्या आहेत, अशी विचारणा त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्यानंतर या मनपाने जप्त केलेल्या हातगाड्या असल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यावेळी त्यांनी तत्काळ त्या मोडून त्यांचा लिलाव करावा, या हातगाड्या पुन्हा रस्त्यावर दिसता कामा नये, असे आदेश दिले. मनपाच्या अतिक्रमण कारवायांदरम्यान बरेचसे साहित्य जप्त केले जाते.

# "वसुंधरां'नी गाठला ५०० वृक्षारोपणाचा टप्पा

■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. २१ :

पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. आपण राहत असलेल्या अजिंठा पर्वत रांगामुळे बुलडाणेकरांना निसर्ग समृध्द स्थळ लाभले आहे. या निसगार्ला वृक्षसंगोपनाचे जोपासण्याचे काम सध्या ज्या वसुंधरा करत आहेत. त्यात प्रत्येकाचा हातभार लागल्यास आपण एक हिरवेगार पर्यावरणाशी जुळलेले शहर निश्चितच आपल्या पुढील पिढीला दाखवण्यासाठी ठेऊ शकू, असे मत सहकार विद्या मंदिरच्या अध्यक्षा कोमल झंवर यांनी व्यक्त केले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाच्या नव नवीन संकल्पना राबवण्याचे काम सध्या महिला मोठया प्रमाणात करत आहेत. आता पर्यंत या वसुंधरांनी ५०० हुन अधिक वृक्षांचे रोपण केले आहे. त्यात राणी बाग येथे १८० वृक्षांचे रोपण बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहकार विद्या मंदिरच्या अध्यक्षा कोमल झंवर यांनी वसुंधराच्या वृक्षारोपणात सहभाग घेत आपले मत व्यक्त केले. यावेळी अभिजीत ठाकरे, खान, शिंदे, शीतल सोनुने यांसह शाहिना पठाण,सचिन वैद्य,सिध्दार्थ शर्मा, जयंत सोनुने, डॉ. वैशाली पडघान, उदय देशपांडे, विजयता चव्हाण, सुरेखा जतकर, भावना वैद्य, मीना पाटील, प्रज्ञा लांजेवार, श्रीमती मनवर आदींची उपस्थिती होती.



वृक्ष लागवडीचा उपक्रम राबवणे सुरुच राहणार ^राणी बागेत वसुंधरा टीमने बुलडाणा अर्बन परिवाराला सोबत घेऊन वृक्षारोपण केले. ५०० वृक्ष राणी बागेत लावण्यात आले आहेत. अजून २० ते २५ वृक्ष शिल्लक असून ते सुध्दा लावणार आहोत. हा उपक्रम बंद पडणार नाही. कारण पर्यावरणाचा ढासळता समतोल सावरण्यासाठी आमच्या वसुंधरा टीमचा हा प्रयत्न आहे. राणी बागेत दाट वनराई भविष्यात बघायला मिळावी, अशी अपेक्षा वसुंधरा टीमची आहे आम्हाला बुलडाणा अर्बनचे राधेश्याम चांडक व कोमल झंवर यांनीही साथ दिली आहे.

**शीतल सोनुने, वसुंधरा टीम हेड**

# आरोग्य व्यवस्था कोलमडली

## परिचारिका रस्त्यावर, बेमुदत संपाचा पाचवा दिवस

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २१ :

परिचारिकांना केंद्रानुसार भत्ता देण्यासोबतच अन्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्य परिचारिका संघटनेने आंदोलन छेडले आहे. दोन दिवसाचे धरणे आणि त्यानंतर एक दिवशीय लक्षवेधी आंदोलनाची दखल घेतल्या गेली नाही. त्यामुळे नाईलाजाने संघटनेला बेमुदत संप पुकारावे लागले अशी माहिती राज्य परिचारिका संघटनेच्या अध्यक्ष संगीता राठोड यांनी दिली.

परिचारिकांच्या विविध मागण्या प्रलंबित आहे. यावर ठोस पाऊले उचलली जावी यासाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने राज्यव्यापी कामबंद आंदोलन सुरु केले आहे. पाठ्यनिर्देशिका या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन त्रुटी निवारण करावे, राज्यातील परिचारिकांना केंद्राप्रमाणे नर्सिंग भत्ता सात हजार २०० रुपये मंजूर करावा, पात्र परिचारिकांना शैक्षणिक भत्ते मंजूर करावे, केंद्राप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामामध्ये बदल करावा, वैद्यकीय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या कंत्राटीभरती परिपत्रकातून परिचारिकांना वगळण्यात यावे, परिचर्या संवर्गातील शुश्रूषा, शैक्षणिक व अशैक्षणिक विविध पदाच्या कायमस्वरूपी शंभर टक्के पदभरती, पदनिर्मिती करण्यात याव्यात, वाढलेल्या अतिरिक्त खाटा नवीन महाविद्यालये व वाढत्या विद्यार्थी संख्येनुसार नवीन आकृतिबंध मंजूर करावा, अनेक प्रश्न वषार्नुवर्षे प्रलंबित असल्याने स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करावी, जीएनएम विद्यार्थी परिचारिकांचे विद्यावेतनात वाढ केली जावी, वाढती महागाई विचारात घेता बीएस्सी नर्सिंग विद्यार्थ्यांप्रमाणे जीएनमच्या विद्यार्थ्यांनाही विद्यावेतन देण्यात यावे, परिचारिकांच्या आस्थापनेतील दफ्तर दिरंगाई दूर केली जावी, यासह अन्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी परिचारिका रस्त्यावर उतरल्या आहेत.

आंदोलनात आरती मडावी, विश्वास चांदेकर, सिद्धार्थ मेश्राम, वैशाली दातार, सुरेखा मदनकर यांच्यासह शेकडो परिचारिका सहभागी झाल्या आहेत. यापूर्वी १५ राज्य कार्यकारिणीच्या उपस्थितीत आझाद मैदानात १५ आणि १६ जुलै रोजी धरणे आंदोलनातून इशारा देण्यात आला. त्यानंतर १७ जुलैला एक दिवसीय लक्षवेधी संप पुकारण्यात आला, परंतु, मागण्यांचा विचार न झाल्याने आंदोलकांनी लगेचच १८ तारखेपासून बेमुदत संप सुरु केला आहे. मागील पाच दिवसांपासून येथील रुग्णसेवा प्रभावित झाली आहे. यापूर्वीही २०२२ रोजी संघटनेने सात दिवसीय कामबंद आंदोलन केले होते. परंतु, काही दिवसांनी सरकार बदलल्यानंतर त्यांचा हिरमोड झाला. त्यामुळे परिचारिकांनी पुन्हा एकदा तीव्र लढ्याला सुरुवात केली आहे.

# भरती प्रक्रियेत प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण वाढवण्याची बाब विचाराधीन

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २१ :

शासकीय भरती प्रक्रियेत प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण वाढण्याबाबत सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. आरक्षण वाढवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे मंत्री म्हणाले, असे संघटनेचे म्हणणे आहे. नियमित आरक्षण १५ टक्के तर जलसंपदा विभागात ५० टक्के आरक्षण हवे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

जिल्ह्यातील अनेक प्रकल्प, योजना, उपक्रमांमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येईल, अशी आशा होती. यासाठी प्रकल्पग्रस्त व संघटनांनी प्रशासन व शासनाकडे पाठपुरावाही केला. प्रलंबित मागण्यांसाठी सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेने अनेकदा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. मात्र त्यानंतरही मागण्या पूर्ण झाल्या नाहीत. दरम्यान सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेचे संजय धनाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. याप्रसंगी अमरावती जिल्हाध्यक्ष शुभम दोंदलकर, अकोला जिल्हाध्यक्ष आशिष सुर्वे, सरचिटणीस विजय चव्हाण, सरचिटणीस, राजेश धाडसे, पीयूष देशमुख, श्रीराम लोखंडे,अनिकेत चक्रधरे, विजय सरकटे ,निलेश सरकटे, भीमराव सहस्त्रबुद्धे, किशोर कोरडे आदी होते. बेरोजगार प्रकल्पग्रस्तांची संख्या वाढतीच : सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेचे नेते संजय धनाडे केलेल्या चचेर्नुसार बेरोजगार प्रकल्पग्रस्तांचे संख्याही दिवसेंदिवस वाढत असून ही संख्या चार लाखापर्यंत येऊन ठेपली आहे. पाच पाच टक्के प्रमाणात भरती प्रक्रिया होणे शक्य नाही. पाच व पंधरा टक्के आरक्षण वाढवण्यात आहे असे मागणी करण्यात आली. राज्यात शासकीय नोकरीमध्ये थेट नियुक्तीद्वारे भरती किंवा एकरकमी रक्कम देण्यात यावी, अशी मागणी काही प्रकल्पग्रस्तांकडून होत आहे.

# श्री गुरु शिवलिंग स्वामी मठ सभागृहाचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी, कारंजा लाड, दि. २१ :

श्री गुरु शिवलिंग स्वामी मठ संस्थान (सद्यः श्री सद्गुरु शिवायनमः मठ संस्थान), कारंजा येथे सुसज्ज सभागृहाचा लोकार्पण समारंभ २० जुलै रोजी उत्साहात संपन्न झाला. या सभागृहासाठी ना. संजय राठोड यांनी वार्षिक नगरोत्थान निधीतून आवश्यक निधी मंजूर केला होता. त्यानुसार भव्य सभागृहाची बांधकाम प्रक्रिया पूर्ण झाली असून, त्याचे लोकार्पण करण्यात आले. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सई डहाके, आमदार हरिषआप्पा पिंपळे, दत्तराज डहाके, जयकिशन राठोड, प्राजक्ता माहितकर आणि महेश वाघमोडे यांची उपस्थिती लाभली.

# जिल्हा न्यायालयात मध्यस्थी कक्षाचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २१ :

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने जिल्हा न्यायालयात विशेष मध्यस्थी मोहिमेअंतर्गत मध्यस्थी कक्ष सुरु करण्यात आला आहे. या कक्षाचा शुभारंभ व राष्ट्रासाठी मध्यस्थी मोहिमेच्या रॅलीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या हस्ते झाले. जिल्हा न्यायालयात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नागेश न्हावकर, कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश सि.एल. देशपांडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव दिपक दाभाडे, जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिकारी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष संजय जैन, वकील मंडळी, मध्यस्थी अधिवक्ते, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधीक्षक व सर्व कर्मचारी वर्ग, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, पॅरा विधी स्वंयसेवक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी समजून घेतली निवडणूक प्रक्रिया

## सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचे अलंकरण

■ महासागर प्रतिनिधी
अकोट, दि. २१ :

तांदूळवाडी फाटा स्थित सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचा अलंकरण समारंभ १९ जुलै रोजी उत्साहात पार पडला. ११ जुलै रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान घेण्यात आले व निकाल जाहीर करण्यात आला. निवडणुकीत शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता.




निवडणुकीत स्कूल हेडबॉय संकेत गरजे, स्कूल हेडगर्ल नेतल राठी, असिस्टंट हेडबॉय आर्यन बागडी, असिस्टंट हेडगर्ल श्रितीजा दाने, स्पोर्ट कॅप्टन स्वरीत पुंडकर, फाईन आर्ट कॅप्टन स्वरा सरदार यांची निवड झाली. तसेच हाऊस कॅप्टन, व्हाईस कॅप्टन, हाऊस वॉर्डन निवडण्यात आले. या कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, प्रमुख पाहुणे अमोल मालवे, ठाणेदार शहर पोलिस स्टेशन अकोट, उपाध्यक्ष लुणकरन डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, प्राचार्य द्वारकाप्रसाद बसेर, उपप्राचार्या कविता मिश्रा उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना निवडणुकीचे महत्त्व समजावे व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने निवडणूक परिषदेची स्थापना करण्यात आली. अमोल मालवे यांना शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संगीत शिक्षक प्रवीण कुलट व मयुर नाथे व विद्यार्थ्यांनी स्वागतपर गीत सादर केले. सिद्धार्थ अंभोरे यांच्या नेतृत्वाखाली आठवीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. उपप्राचार्या कविता मिश्रा यांनी हेडबॉय व हेडगर्ल यांना शपथ दिली. त्यानंतर नियुक्त विद्यार्थ्यांचा शपथविधी पार पडला. उप मुख्याध्यापक कविता मिश्रा, मुख्याध्यापक द्वारकाप्रसाद बसेर यांनी शुभेच्छा दिल्या. शाळेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया यांनी नियुक्त विद्यार्थ्यांनी आपले काम प्रामाणिकपणे पार पाडावे असे आवाहन केले. सूत्रसंचालन मंजिरी रंधे व हर्षिता डेम्बला तसेच आभार प्रदर्शन अभिषेक गुजर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता सांस्कृतिक विभाग प्रमुख धनश्री कुलट, शुभांगी कुकडे, पुनम मोरखडे, स्वाती अग्रवाल आदींनी परिश्रम घेतले.

# कुळ खरेदी हक्क प्रकरण तहसीलदारांनी फेटाळले

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २१ :

जिल्ह्यातील श्री काळेश्वर महादेव संस्थान, भुजवाडा (ता. दयार्पूर) यांच्या मालकीच्या शेत जमिनीवरील कब्जेदाराने कुळ खरेदीसाठी दाखल केलेले प्रकरण तहसीलदारांनी १० जुलै रोजी फेटाळले असून, मंदिराच्या हक्काला कायदेशीर मान्यता दिली आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पुढाकाराने आणि धर्मदाय आयुक्त प्राधिकरणाच्या निरीक्षकांच्या सकारात्मक अहवालामुळे मंदिराच्या जमिनीचे रक्षण शक्य झाले. ही कार्यवाही मंदिराच्या पुनरुत्थानासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.



श्री काळेश्वर महादेव संस्थान उर्फ श्री कोंडेश्वर महादेव संस्थान, भुजवाडा (ता. दयार्पूर) यांच्या मालकीची गट क्र. ६८ व ९२ या क्रमांकांची सुमारे १५ एकर शेतजमीन आहे. ही जमीन संस्थानला अनुक्रमे इ.स. १९१० व १९१२ मध्ये लाभलेली असून मंदिर व्यवस्थापनासाठी आवश्यक उत्पन्नाचा स्रोत म्हणून ती महत्त्वाची आहे. परंतु, सध्या मंदिराची अवस्था अत्यंत जीर्ण असून कोणत्याही मोबदल्या शिवाय जमिनीवर एक कब्जेदार अतिक्रमण करून आहे. विशेष म्हणजे संस्थानचे पूर्वीचे सर्व विश्वस्त मृत झाल्यानंतर त्या परिस्थितीचा गैरफायदा घेत कब्जेदाराने ६ एकर जमिनीची खरेदी प्रक्रिया तहसील कार्यालयात सुरू केली होती. ही बाब लक्षात घेत महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल यांनी पुढाकार घेत शेतजमीन विक्रीस कडाडून विरोध केला. त्यांनी कुळ कायदानुसार संस्थानला विक्रीपासून सूट असल्याचे अधोरेखित करत सुट प्रमाणपत्र सादर केले तहसील कार्यालयात जमीन विक्री प्रक्रिया तत्काळ रद्द करण्याची मागणी केली. धर्मदाय आयुक्त प्राधिकरणामार्फत निरीक्षक जावेद पठान यांनी संस्थानच्या बाजूने सकारात्मक अहवाल दिला. त्यानुसार तहसीलदार रविंद्रकुमार कानडजे (दयार्पुर) यांनी संस्थांनच्या शेतजमिनीला कुळ कायदा लागू पडत नसल्याने व अशा हस्तांतरणाला धर्मदाय आयुक्त यांची परवानगीची गरज असल्याचे निष्कर्ष नोंदवत १० जुलै रोजी कब्जेदाराचे प्रकरण फेटाळून संस्थानच्या हक्काला मान्यता दिली. या निर्णायक यशामध्ये मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल यांच्यासह गजानन शेंडोकार, अक्षय सरडे, धनराज चव्हाण, देविदास वडूरकर, रविंद्र कानकिरड यांनी योगदान दिले. महासंघाचे कार्य प्रशंसनीय भुजवाडा येथील भक्तांनी नवीन विश्वस्त मंडळ स्थापनेसाठी धर्मदाय सहआयुक्त अमरावती यांच्याकडे अर्ज सादर केले. मंदिर महासंघाने त्या प्रस्तावित विश्वस्तांना आवश्यक सुट प्रमाणपत्र मिळवून दिले आहे. या यशस्वी कार्यवाहीमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण असून, मंदिर व भक्तांच्या न्यायासाठी कार्यरत असलेल्या हिंदु जनजागृती समिती व महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कार्य निश्चितच प्रशंसनीय आहे.

# बलात्कार प्रकरणातील आरोपीची पायी कोर्टवारी

■ महासागर प्रतिनिधी
दयार्पूर, दि. २१ :

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून पसार झालेल्या आरोपीला दयार्पूर पोलिसांनी दोन महिन्यानंतर अटक केली. अल्पवयीन मुलीवर दुष्कृत्य करणाऱ्या या आरोपीचा खरा चेहरा दयार्पूर पोलिसांनी आगळ्यावेगळ्या माध्यमातून सर्वसामान्यांसमोर आणला. पोलिसांनी रविवारी या आरोपीला अक्षरशः मुख्य मागार्ने पायी फिरवत स्थानिक न्यायालयात नेले होते. नटवर कैलाससिंग तोमर (२६, रा.लेहगाव, दयार्पूर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध दयार्पूर पोलिसांत १२ मे २०२५ रोजी बलात्कार तसेच पोस्को कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. मात्र गुन्हा दाखल झाल्यापासून तो पोलिसांना सातत्याने चकमा देत होता. त्याच्या शोधासाठी दयार्पूर पोलिसांनी आजूबाजूच्या जिल्ह्यातील पोलिसांनाही माहिती दिली होती. दरम्यान अथक प्रयत्नानंतर त्याला अहिल्यानगर नेवासा येथून दयार्पूर पोलिसांनी अटक केली आहे.


**कामठी नगर परिषद कामठी**
**बांधकाम विभाग**
**जिल्हा नागपुर ४४१००२**

Phone 07109 288262, Fax: 07109286665
Mail: chiefofficermckamptec@gmail.com

जा.क./न.प.का./ सा.बां.वि./३४५६/२०२५ दिनांक:२१/७/२०२५

**निविदा सुचना २०२५-२०२६**

नगर परिषद कामठीला महाराष्ट्र शासनाचे खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदाराकडून नगर परिषद कामठी क्षेत्रातील प्रभाग क्र. ११ मध्ये बजरंग पार्क येथे वंजारी आटा चक्की जवळील नाला बांधकाम करण्याकरीता कामाचे द्वी लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदेबाबतची सविस्तर माहिती दिनांक २२/७/२०२५ पासुन नगर परिषद कामठी जुने कार्यालय येथील बांधकाम विभागात पाहण्यास उपलब्ध आहे

(संदिप बोरकर)
मुख्य अधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद कामठी

# : देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्राचा मास लीडर

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस.. गेले दशकभर "देवेंद्र फडणवीस" हे नाव राज्याच्या सत्तापटलावर या ना त्या कारणांमुळे गाजत आहे. निष्कलंक, चारित्र्यसंपन्न आणि आपल्या कामाप्रति प्रामाणिक असणारा हा लोकनेता गेली दशक पूर्णपणे महाराष्ट्राच्या राजकारणाचा आणि सत्ताकारणाचा एकमेव केंद्रबिंदू ठरत आहे.

---------------

**भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक**
**भाजपा, सोशल मीडिया सेल**
**उत्तर नगर**

---------------



नागपूर शहरात भाजपला सत्तेवर आणण्यासाठी आपले शीर्षस्थ नेते नितीन गडकरी यांच्या खांद्याला खांदा लावून घेतलेले परिश्रम देवेंद्रजी फडणवीस यांना महापौर पदाच्या रुपात फळाला आले. वयाच्या २७ व्या वर्षी ते राज्यात सर्वात तरुण महापौर म्हणून नावारुपाला आले.

देवेंद्र फडणवीस हे एक लोकप्रिय नेते आहेत. नगरसेवक, महापौर, आमदार ते मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते हा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी असा राहिलेला आहे.

एक धुरंदर नेता म्हणून त्यांचे मला सर्वात जास्त आवडणारे गुण म्हणजे हजरजबाबीपणा, जबरदस्त वक्तृत्व, एखादा विषय मांडण्याची हातोटी, राज्यभर अफाट दौरे, प्रचंड जनसंपर्क आणि अतिशय महत्त्वाचे म्हणजे स्व पक्षात असो किंवा विरोधकांच्या गोटात, पुढच्या क्षणाला काय होणार आहे ह्याचा त्यांना बहुतांश वेळा येणारा अचूक असा अंदाज.... प्रत्येक क्षणी विरोधकांच्या डावाला प्रतिडाव टाकण्याची असणारी त्यांची चाणाक्ष बुद्धी..

देवेंद्र फडणवीस यांची अफाट आणि अचाट कार्यक्षमता भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाच्याही नजरेत भरली आणि पुढे ते महाराष्ट्र राज्य भाजपा प्रदेशाध्यक्ष झाले. अर्थात त्यावेळी येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षबांधणी आणि विरोधकांना एक सक्षम पर्याय म्हणून एक अभ्यासू, आक्रमक वक्तृत्व असलेले शालीन नेतृत्व यादृष्टीने भाजप पक्षश्रेष्ठींनी हा निर्णय घेतलेला होता.

पक्षश्रेष्ठींचा निर्णय सार्थ ठरवत फडणवीस यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणूक प्रचारात पक्ष प्रतिमेला साजेसा पण अतिशय आक्रमक पवित्रा घेतला होता. एकीकडे २५ वर्षे जुनी युती तोडून शिवसेना विरोधी पक्ष म्हणून समोर उभी ठाकली असताना दुसरीकडे कॉंग्रेस, राष्ट्रवादीला भुईसपाट करत सेनेला त्यांनी केलेली चूक दाखवत महाराष्ट्रात पक्षाला 'न भूतो न भविष्यति' असे यश मिळवून दिले.

राजकीय विश्लेषक भलेही त्यावेळच्या 'मोदी लाटे'चा उल्लेख करतील पण 'देशात नरेंद्र, राज्यात देवेंद्र' हे समीकरण जनतेला त्यावेळी मनस्वी पटलेले होते. त्यामुळेच महाराष्ट्र राज्यात पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचे १०० च्या वर आमदार निवडून आले. तोच पराक्रम त्यांनी २०१९ विधानसभेला दाखवून पुन्हा एकदा राज्यात भाजपाची शंभरी पार केली. २०२४ ला पण ....

५ वर्षे मुख्यमंत्री म्हणून राज्यशकट हाकताना देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः सम्राटाच्या भूमिकेत न राहाता 'चाणक्या'च्या बुद्धी चातुर्याने कारभार केला. विरोधी पक्षांनी सातत्याने मार्गात उभे केलेले अडथळे, पक्षांतर्गत छुपे विरोध, मित्र पक्षाने चालवलेली अडवणूक, समोर शरद पवार यांच्यासारखा बलाढ्य विरोधक या साऱ्या प्रतिकूलतेवर मात करत देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत मुत्सद्दी आणि धोरणीपणे राज्य प्रगतीपथावर नेहण्यासाठी कोणत्याही प्रश्नावर तात्पुरती मलमपट्टी न करता दीर्घकालिन उत्तर शोधण्यावर परिश्रम घेतले.

आज राज्यात विविध पक्षांमध्ये अनेक महारथी, धुरंधर नेते सक्रिय आहेत आणि त्या सगळ्यांना आपले मुख्य विरोधक हे फक्त देवेंद्र फडणवीस हेच वाटतात हे एक प्रकारे त्यांचे यशच आहे .

२०१९ ला बहुमताचे जवळ असताना शिवसेनेच्या सत्ता लालशी भूमिकेने सत्ता मिळाली नाही. मात्र अडीच वर्षात ठाकरेंना धोबीपच्छाड देते एकनाथ शिंदे ना मुख्यमंत्री केले. तेच नाही तर शरद पवार यांच्यावर मात करत राष्ट्रवादीत उभी फुट पाडली. अजित पवार यांना सोबत घेऊन राज्याच्या राजकारणात किंगमेकर झाले. २०२४ ला दोन तृतीयांश बहुमताचे सरकार आणून मुख्यमंत्री झाले.

साथ पक्षाची आहे पण कष्ट हे देवेंद्र फडणवीस यांचे स्वतःचे आहेत.. त्यातही त्यांना घराघरात पोहोचवायच्या कामात मात्र विरोधकांच्या विविध सोशल मीडिया टिमनी राबून अधिकचा हातभार लावलेला आहे.. त्यासाठी त्या सर्व विरोधी पक्षांचे आभार..!! विरोधक काय करतील..??

देवेंद्र फडणवीस यांना ते ब्राम्हण आहेत म्हणून हिनवतील, ते एका रुपयांचा भ्रष्टाचार करू शकले नाहीत, त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे कधीही कुठेही सापडत नाहीत म्हणून चिडतील, त्यांनी आपल्या सुविद्य पत्नीला बळजबरीने घरी बसवून ठेवले नाही म्हणून त्यांना नावे ठेवतील..

**काय करतील विरोधक मित्र?**

देवेंद्र फडणवीस यांच्या शरीर यष्टीवर बोलतील? विविध नावांनी त्यांची हेटाळणी करतील? स्वतःला प्रसिद्धी मिळावी म्हणून कारण नसताना त्यांच्या पत्नीला टीकेचे लक्ष्य करतील ? पण एक मुरलेला राजकीय नेता कधीही अशा प्रकारच्या टिकेला कुठलीही भीक न घालता असल्या तमाशाकडे ढुंकून ही बघत नाही.

मग ते नरेंद्र मोदी असोत की देवेंद्र फडणवीस असोत..

पण विरोधकांच्या अशा कपटी, द्वेषी आणि विकृत टीकांना मात्र देवेंद्र फडणवीस हे अजिबात विचलित न होता, सर्वसामान्य जनतेत नेहमीप्रमाणे जाऊन केल्या गेलेल्या सर्व टिका टिपन्नी सकारात्मकतेमध्ये बदलवुन उत्तर देतात.

महाराष्ट्रासारख्या थोर परंपरा आणि भौगोलिक विविधता असलेल्या, प्रशासकीय दृष्ट्या कारभार करण्याबाबत अवघड अशा राज्याचे नेतृत्व करणे हे येरा गबाळ्याचे काम नव्हे.. आणि म्हणूनच वयाच्या अवघ्या ४४ व्या वर्षी ही अवघड जबाबदारी अगदी लीलया पेलत महाराष्ट्र राज्याच्या आजवरच्या महनीय मुख्यमंत्र्यांच्या मांदियाळीत आपले अनोखे वेगळेपण अधोरेखित करायला लावणारे देवेंद्रजी हे '#एकमेवाद्वितीय'च ठरतात.

ज्या प्रमाणे कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा राहत नाही त्याच प्रमाणे सर्व विरोधकांच्या छाताडावर पाय देऊन देवेंद्रजी फडणवीस संपूर्ण बहुमताने मुख्यमंत्री झाले... शेवटी एवढेच सांगेन की, राजकारण म्हणजे करिअर समजून काम करणाऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्वगुण हे '#दीपस्तंभ' आहेत.

**: भूषवलेली पदे :**

१९८९ भारतीय जनता युवा मोर्चाच नागपूरमधील वॉर्ड अध्यक्ष
१९९९ ते आजतागायत - विधानसभा सदस्य
१९९२ ते २००१ सलग दोन वेळा नागपूर महापालिकेचे सदस्य, दोन वेळा नागपूरचे महापौर
१९९४ भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष
२००१ भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष
२०१० भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाचे सरचिटणीस
२०१३ भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष
२०१४ ते २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री
२०१९ ला दुसऱ्यांदा मुख्यमंत्री
२०१९ ते जून २०२२ महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते
जून २०२२ पासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री
५ डिसेंबर २०२४ पासुन तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

माझ्या बाबांना इंदिरा गांधींनी अटक केली त्यामुळे मी इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये शिकणार नाही, असे आणीबाणीच्या काळात वयाच्या सहाव्या वर्षी देवेंद्रने आईला बजावून सांगितले. शेवटी त्या कॉन्व्हेंटमधून त्याला सरस्वती शाळेत टाकावे लागले. संघ, जनसंघाच्या संस्कारांचे बाळकडू मिळालेला तोच मुलगा पुढे भाजपाचा प्रदेशाध्यक्ष झाला आणि नंतर महाराष्ट्राचा तीन वेळा मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता उपमुख्यमंत्री असे पद भूषवणारा देवेंद्र फडणवीस अर्थात देवाभाऊ होय.

महाराष्ट्राच्या अशा या लाडक्या लोकनेत्याला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.. ! उदंड निरोगी आयुष्य देवो आणि येणाऱ्या प्रत्येक दिवशी यशाची नवनवी शिखर गाठण्यासाठी बळ देवो हीच प्रार्थना..!!

■ ■ ■

# न्यायव्यवस्थेत सुधारणा करणे शक्य आहे का?

सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भुषण रामकृष्ण गवई यांनी नालसार विधी विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात बोलतांना न्याय व्यवस्थेत सुधारणेची नितांत गरज आहे असे प्रतिपादन केले. कोर्टातील प्रलंबीत आणि दशकानुदशके चालणाऱ्या खटल्यांबाबत चिंता व्यक्त केली आहे.

अनेक आरोपी कुठलाही गुन्हा सिध्द न झाल्याने वर्षोगणती शिक्षा भोगून बाहेर पडतात. यावर न्यायमुर्ती गवई यांनी चिंता व्यक्त केली आहे. तर आमचे मंत्रीगण शिक्षा भोगून परत सत्तास्थानी जाऊन बसतात. कनिष्ठ कोर्टापासून तर सुप्रीम कोर्टापर्यंत केस लढवली गेली तर कोर्टाचा निर्णय हाती येईपर्यंत किती पिढ्या बर्बाद झालेल्या असतील? हे न्यायालयाने स्पष्ट करावे.'

शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये ' असे सांगून त्याला न्याय नाकारला जातो आहे. कोर्ट कशासाठी स्थापन झालेले आहेत? हे एकदा केंद्र सरकारने आणि न्यायालयाने स्पष्ट करावे.

कोर्टाने कुठल्याही निकालाला बंधन घालून दिलेले नाही.कोर्टात दाखल होणाऱ्या प्रकरणांचे प्रामुख्याने दिवाणी आणि फौजदारी असे दोनच विभाग पाडले जातात. गुन्हे शाखेशी संबंधीत प्रकरणे फौजदारी गटात मोडतात. तर गुन्हे शाखेशी संबंधीत नसणारी प्रकरणे दिवाणी गटात मोडतात. फौजदारी केसेसकडे थोडेतरी गांभिर्याने बघितले जाते. दिवाणी केसेसकडे पहाण्याचा दृष्टीकोन हा अत्यंत चुकीचा आहे. त्याचे महत्व नसल्यात जमा आहे.

आपली न्यायव्यवस्था न्याय देऊच शकत नाही. कारणं संपुर्ण कोटार्चा कारभार हा इंग्रजी भाषेतून अजुनही चालवीला जातो आहे. यामुळे वादी-प्रतिवादी हे फक्त कागदावर असतात.

वकील मंडळी आणि न्यायालय यामध्ये होणारा संवाद म्हणजेच न्यायालयाच्या बंद खोलीत कामकाज चालते. प्रत्येक गोष्ट शपथ पत्रावर लिहून घेतली जाते.मग ती खरी असो वा खोटी.

शपथ पत्रावर धडधडीत खोटं लिहून दिले जाते. याची शहानिशा कोर्ट करीत बसणार! याच कारणाने साक्ष वारंवार बदलली जाते. कारणं कायद्याचा धाक नाही.

आधुनिक काळात ब्रेन मॅपींग, नार्को टेस्ट सारखे खात्रीशीर उपाय उपलब्ध असतांना कोर्ट सांगितलेल्या माहितीवर विश्वास ठेवून काम करते आहे. हे जग विश्वासपात्र राहिलेले नाही.चांगल्यांची तर दुनियाच नाही. छक्के-पंजे, कुटनिती, धाकदपट याचा वापर करून होत्याचे नव्हते करण्याचा प्रघात रूढ झाला आहे. वकील मंडळी यात आघाडीवर असतात. कोर्टात समझोता करण्याचा आग्रह धरून बरीचशी दिर्घकालीन प्रकरणे गुंडाळली जात आहेत. यात कुणाचीही हारजीत होत नसते. तर परस्पर सहमतीने प्रकरणाचा निकाल दिला जातो. या मध्ये खास करून सिव्हील केसेस हाताळल्या जातात. यामुळे न्यायालयावरील थोडाबहुत ताण कमी झालेला आहे. परंतु यामुळे न्याय मिळत नसतो.

न्याय मिळण्यासाठी सत्यता जाणून घेऊन निर्णय घेणे अपेक्षित असते. न्याय हा गावीच मिळाला पाहिजे.जुन्याकाळी न्याय निवाडा हा गावीच होत होता. तो ही राजदरबारी किंवा गावातील पंचांसमोर! गावातील ग्रामपंचायती या सक्षम व्हायला पाहिजेत. गावातील न्यायनिवाडे हे गावातच लागायला पाहिजेत. यासाठीचे कायदे निर्माण केले गेले पाहिजेत.

आज कनिष्ठ न्यायालय, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सुप्रीम न्यायालया पर्यंत केस जाईपर्यंत अनेक पिढ्या गारद झालेल्या पहायला मिळतात आहेत. असा न्याय जनतेला अपेक्षित नाही. तर जनतेला वास्तविक परिस्थितीवर आधारीत न्याय हा हवा आहे.

**मिलिंद गड्डमवार**
**सामाजिक कार्यकर्ता**
**मुक्त पत्रकार**
**राजुरा, जि. चंद्रपूर.**
**9511215200**

यामुळे कोर्टातील केसेसच्या प्रमाणात घट होऊ शकते. आजची न्यायप्रणाली ही वास्तवाला धरून नाही. येथे जनतेला न्याय मिळतच नाही. तर जनतेची पदोपदी अडवणूक करून वारंवार तारीख दिली जाते आहे. यामुळे गुन्हेगारांचे फावते आहे. न्यायप्रणालीत साक्ष नोंदविण्याच्या पध्दतीत आमुलाग्र बदल करणे अपेक्षित आहे. साक्ष-पुरावे हे प्रत्यक्ष घटनांवर आधारीत हवे आहे. आज ईलेक्ट्रानिक यंत्रणांचा,मोबाईल,सीसीटिव्ही इ.चा वापर करून खऱ्या खोट्याची शहानिशा करता येणे शक्य झाले आहे. याला कायदेशीर मान्यता प्राप्त झाली पाहिजे.

गाव पातळीवरील तंटे-बखेडे, ग्रामपंचायत स्तरावरील तक्रारींचे निवारण हे त्या त्या गावातच झाले पाहिजे. कार्यालयीन नियमांचे उल्लंघन, बांधकामाच्या तक्रारी इ. चे गावपातळीवर निराकरण करणे गरजेचे आहे. यासाठीच अधिकारी लोकांची नियुक्ती ही केलेली असते.

न्यायालयीन प्रकरणांची वर्गवारी होने गरजेचे आहे. कोणती प्रकरणे न्याय निवाड्यासाठी योग्य आहेत याचा निर्णय कोर्टाने घेतला पाहिजे. आज सरकारी नियमांचे पालन होत नसल्याने आणि आपली जवाबदारी कोर्टावर ढकलून मोकळे होण्यासाठी कोर्टाचा वापर केला जातो आहे.

कोर्टात जाण्यास सांगून अधिकारीगण आपल्या जवाबदारीतून मुक्त होवू पहात आहेत. ते नौकरीतून निवृत्त होतात तरी कोर्टाचा निर्णय हा लागलेला नसतो. वेळकाढू धोरण अवलंबण्यासाठी कोर्टाचा सहारा घेतला जातो आहे. हे सुप्रीम कोर्टाच्या कसे लक्षात येत नाही ?

याबाबत सुप्रीम कोर्टाकडून दिशानिर्देश दिले गेले पाहिजेत. याचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. तरच कोर्टातील केसेसचे प्रमाण कमी होणार आहे. न्याय व्यवस्थेत सुधारणा करणे शक्य आहे. याबाबत न्याय व्यवस्थेने सक्त असले पाहिजे. कुठलाही मुलाहीजा खपवून घेता कामा नये. आता तर न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टी सुध्दा हटवली गेली आहे.आता ती डोळस झाली पाहिजे, अशी जनतेची रास्त अपेक्षा आहे.

■ ■ ■

# महान पार्श्वगायक मुकेश

आज २२ जुलै, हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची आज जयंती. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला.

मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती.

त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले.

"मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले.

या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले.

गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता.

१९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले.

त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले.

अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर.

पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते.

डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली.

मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. जयंतीदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

■ ■ ■



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

## गटारी नव्हे, 'दीप अमावस्या' !

वाचक लिहितात

श्रावण मासारंभाच्या आदल्या दिवशी म्हणजे आषाढ अमावास्येला अखेरचे मांसाहार आणि आणि दारू ढोसण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे, काहींच्या मते या अमावस्येला 'गतहारी अमावास्या' म्हटले जाई म्हणून पुढे गतहारी शब्दाचा अपभ्रंश म्हणून 'गटारी' नाव प्रचलित झाले. गटारी या नावाला कोणताही शास्त्राधार नाही त्यामुळे हा हिंदु धर्मातील सण किंवा उत्सव नाही, तर ती केवळ एक अनिष्ट प्रथा आहे.

हिंदु धर्मात आषाढ अमावस्या ही 'दीप अमावस्या' म्हणून प्रचलित आहे. या दिवशी घरातील सर्व समया, निरांजने, दिवे स्वच्छ धुऊन पुसून सभोवती रांगोळी काढून पाटावर त्यांना आसनस्थ केले जाते. दिवे प्रज्वलित करून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. त्यांना पक्वानांचा नेवैद्य दाखवला जातो. 'तमसो मा ज्योतीर्गमय' म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याची महान शिकवण दीप आपल्याला देत असतो. दीपच नसता तर मानवाचे जीवन अंधकारमय झाले असते त्यामुळे दिव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे.

काळाच्या ओघाने आणि भारतीयांवरील पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे या सणावर भोगवादाचे सावट आले, परिणामी सध्याच्या ३ पिढ्यांपैकी अनेकांना या दिवसाचे खरे महत्व ज्ञात नाही. किमान नव्या पिढीला तरी आषाढ अमावास्या ही गटारी अमावास्या नसून दीप अमावस्या आहे याविषयीची माहिती ती योग्यरीत्या साजरी करूनच देऊया.

■ **जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.**

## खबर हटके



## भाजी विक्रेत्याला २९ लाख रुपयांची जीएसटी नोटीस

कर्नाटकातील हवेरी येथील एका भाजी विक्रेत्याला २९ लाख रुपयांची जीएसटी नोटीस मिळाली आहे. शंकरगौडा नावाच्या या विक्रेत्याने गेल्या चार वर्षांत १.६३ कोटी रुपयांचे यूपीआय व्यवहार केले आहेत, ज्याच्या आधारे जीएसटी विभागाने ही नोटीस पाठवली आहे.

वारंवार होणाऱ्या डिजिटल व्यवहारांमुळे जीएसटी अधिकाऱ्यांमध्ये संशय निर्माण झाला, ज्यामुळे त्यांना २९ लाख भरण्याची नोटीस पाठविण्यात आली. या घटनांनंतर, बंगळुरू आणि म्हैसूर सारख्या शहरांमधील छोटे दुकानदार घाबरून यूपीआय सोडून रोख व्यवहारांवर आग्रह धरत आहेत.

हवेरीचे शंकरगौडा गेल्या चार वर्षांपासून म्युनिसिपल हायस्कूलजवळ भाजीपाल्याचे दुकान चालवत आहेत. त्यांचे बहुतेक उत्पन्न वढक आणि डिजिटल वॉलेटमधून येते.

शंकरगौडा म्हणतात, मी शेतकऱ्यांकडून ताज्या भाज्या खरेदी करतो आणि विकतो, ज्या जीएसटी मधून सूट आहेत. मी दरवर्षी आयकर रिटर्न भरतो. मी इतका मोठा कर कसा भरू शकतो?

क्लिअरटॅक्स आणि जीएसटी नियमांनुसार, जर विक्रेत्याने थेट शेतकऱ्यांकडून ताज्या, प्रक्रिया न केलेल्या भाज्या खरेदी केल्या आणि दुकानात विकल्या तर त्यावर जीएसटी लागू होत नाही. बऱ्याच वेळा, अधिकारी सर्व डिजिटल व्यवहारांना व्यवसाय उलाढाल मानतात आणि नोटीस पाठवतात.

कर्नाटकातील रस्त्याच्या कडेला असलेल्या खाद्यपदार्थांची दुकाने, ठेलावाले आणि लहान दुकाने अशा हजारो लहान व्यापाऱ्यांना अशा नोटिसा येत आहेत. कारण युपीआयद्वारे होणारे व्यवहार आता जीएसटी विभागाच्या रडारवर आहेत.

वार्षिक उलाढाल ४० लाख रुपयांपेक्षा जास्त (वस्तू विकणाऱ्यांसाठी) किंवा २० लाख रुपयांपेक्षा जास्त (सेवा देणाऱ्यांसाठी) असल्यास जीएसटी नोंदणी अनिवार्य आहे. बरेच व्यापारी नकळत ही मर्यादा ओलांडत आहेत, ज्यामुळे त्यांना नोटिसा येत आहेत.

■ ■

# स्वयंपाकघरात असलेले काही पदार्थ आरोग्यासाठी सायलेंट किलर



आपल्या स्वयंपाकघरात अशा काही गोष्टी ठेवल्या जातात ज्या अन्नाची चव वाढवतात पण त्या हळूहळू आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.

त्या शरीरात कोणतीही लक्षणे देत नाहीत, परंतु आतून त्या शरीरावर परिणाम करत असतात. याच वस्तूंना किचनमधील सायलेंट किलर म्हणतात. या छोट्या छोट्या गोष्टी लगेच आरोग्य बिघडवत नाहीत. पण त्या विषासारख्या पसरतात. सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या गोष्टी आपल्या भारतीय स्वयंपाकघरात वर्षानुवर्षे वापरल्या जात आहेत आणि आजही लोक त्यांच्याशिवाय आपले जेवण अपूर्ण मानतात.

**1. रिफाइंड तेल :** सामान्यतः भारतीय घरांमध्ये रिफाइंड तेल वापरले जाते. भजी तळणे असो किंवा भाज्या करणे असो त्यासाठी शक्यतो रिफाइंड तेल वापरले जाते. काही लोकांचा असा विश्वास आहे की रिफाइंड तेल आरोग्यासाठी कमी नुकसान करते. पण तसे नाही. उलट, रिफाइंड तेल आरोग्यासाठी सर्वात वाईट मानले जाते. प्रत्यक्षात, ते बनवण्यासाठी अनेक रसायने वापरली जातात आणि ते उच्च तापमानाच्या अधीन असते. यामुळे त्यातील सर्व पोषक घटक नष्ट होतात. त्याचा हृदयाच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.

**2. पांढरे मीठ :** भारतीय घरांमध्ये मीठाशिवाय जेवण अपूर्ण आहे . बऱ्याच घरांमध्ये मीठ मोठ्या प्रमाणात वापरले जाते. पण हे तुमच्या शरीरासाठी अजिबात आरोग्यदायी नाही. जास्त प्रमाणात पांढऱ्या मीठाचे सेवन केल्याने उच्च रक्तदाबासह अनेक आजार होऊ शकतात. त्याऐवजी काळे मीठ किंवा सैंधव मीठ वापरणे चांगले.

**3. भारतीयांची आवडती साखर :** भारतीयांची आवडती साखर ही आरोग्याचा शत्रू मानली जाते. पण भारतात गोड पदार्थ खूप आवडीने खाल्ले जातात.

तुम्हाला प्रत्येक गोड पदार्थात साखर आढळेल. पण आहारतज्ज्ञ श्रेया यांच्या मते, साखर हळूहळू शरीराला आजारांचे घर बनवते. साखरेचे सेवन केल्याने मधुमेह, हार्मोन्स असंतुलन, पोटात चरबी आणि मूड स्विंग यासारख्या समस्या उद्भवतात.

**4. मैदा :** आजकाल, बहुतेक फास्ट फूडमध्ये रिफाइंड पीठ वापरले जात आहे. मग ते पिज्झा असो, ब्रेड असो, बिस्किट असो किंवा मोमो असो. पण रिफाइंड पीठात फायबरचे प्रमाण खूप कमी असते, ज्यामुळे ते पचण्यास कठीण होते. जास्त प्रमाणात रिफाइंड पीठ खाल्ल्याने पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### संस्कार केंद्राची गरज

आजी - आजोबा
नाही घरात
आई - बाबा
बिझी कामात..!

गावोगावी आहेत
देवालये
त्यांशी संलग्नीत असावी
संस्कार केंद्रालये..!

संचार क्रांतीने
लेकरे झाली फॉरवर्ड
पण संस्काराविना
होताहेत बॅकवर्ड ..!

भौतिक प्रगतीला
हवी संस्कारांची जोड
तरच जीवनात शक्य
होते संतुलीत तडजोड ..

# गर्भाशय मुख कर्करोगाशी झुंजणाऱ्या तरुण महिलेचे वाचविले प्राण

**नागपूर, २१ जुलै :** वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी दुसऱ्या स्टेजवरील गर्भाशय मुख कर्करोगाच्या निदानानंतर एक्स्टर्नल बीम रेडिएशन उपचार करूनही कर्करोग शिल्लक राहिल्याने मृत्यूशी झुंजणाऱ्या महिलेवर जटील उपचार करीत रेडिएशन आणि सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट टीमने तिची मरणाच्या दारातून सहीसलामत सुटका केली.
वर्धा जिल्ह्यातल्या सावंगी येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटमधील डॉ. तेजश्री तेलखडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आशिष उके, डॉ. अनुराग लुहारिया (मेडिकल फिजिसिस्ट) डॉ. भूषण जाजू, डॉ. तनू प्रधान, डॉ. आदित्य पटेल (सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट), रेडिओथेरेपी परिचारिका आरती कांबळे यांच्या टीमने ही जटील आणि इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपी यशस्वी केली.
उज्ज्वला (नाव बदललेले) असे गर्भाशय मुखाच्या दुसऱ्या स्टेजवरील कर्करोगाशी झुंजणाऱ्या महिलेचे नाव आहे. अवघ्या ३६ शीत कर्करोगाशी झुंजणारी ही तरुण महिला चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. गर्भाशय मुखाचा दुसऱ्या स्टेजवरील कर्करोगाचे निदान झालेल्या उज्ज्वला या असह्य वेदनेशी झुंज देत होत्या. नातेवाईकांनी त्यांना सावंगी येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजशी संलग्न सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी भरती केले.
डॉ. तेलखडे यांनी तिच्या चाचण्या केल्या असता, उज्ज्वला यांना गर्भाशय मुखाचा दुसऱ्या स्टेजवरील कॅन्सर असल्याचे निदान करण्यात आले. त्यांची कर्करोगाची गाठ ६ से. मी. आकाराची होती. या गाठीवर एक्स्टर्नल बीम रेडिएशन प्रभाव होऊन सुद्धा गर्भाशय मुखावर ३ से. मी. ची गाठ शिल्लक होती. बाह्य विकिरण उपचारानंतर (एक्स्टर्नल बीम रेडिएशन) इतकी मोठी गाठ शिल्लक राहणे, ही दुर्मिळ स्थिती मानली जाते. या गाठीमुळे इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपी म्हणजेच आंतरगर्भाशय विकिरण उपचार करणे अवघड होणार होते.
परिस्थितीचे गांभीर्य ओळखत डॉ. तेजश्री तेलखडे यांनी त्वरीत सर्जिकल ऑन्कॉलॉजी टीमशी संपर्क साधला. त्यानुसार डॉ. भूषण जाजू, डॉ. तनू प्रधान, डॉ. आदित्य पटेल यांनी आधी शस्त्रक्रिया करून गर्भाशय मुखावरील गाठ शक्य तितक्या प्रमाणात बाहेर काढली. त्यानंतर डॉ. तेजश्री तेलखडे आणि डॉ. आशिष उके यांनी यशस्वीरित्या इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपी करून शिल्लक राहिलेल्या गाठीला हायडोस रेडिएशन देऊन ही गाठ पूर्णतः बरी केली.
डॉ. तेजश्री तेलखडे यांनी रुग्णाच्या कर्करोगाचे त्वरीत निदान करीत त्यांच्या तज्ज्ञ सहकाऱ्यांनी अल्पावधित अत्याधुनिक उपचार प्रणाली वापरत हा जटिल कर्करोग पूर्णतः बरा केल्यामुळे अकाली मृत्यूच्या दारात पोचलेल्या या तरुण महिलेला सहीसलामत परत आणले. उपचार झाल्याच्या सहा महिन्यांनंतर या महिलेची पुन्हा (पीईटी- सीटी, एमआरआय- पेल्विस) तपासणी केली असता, तिला आता कर्करोगाची कोणतीही लक्षणे नसल्याचे दिसून आले.

## सॅमसंग इंडियाने गॅलॅक्सी वॉच८ सिरीजच्या प्री-ऑर्डरला सुरूवात केली



**मुंबई, २१ जुलै :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्सफ ब्रँडने आज गॅलॅक्सी वॉच८ आणि गॅलॅक्सी वॉच८ क्लासिक लाँच केले, ज्यानसह संपूर्ण गॅलॅक्सी वॉच लाइनअपमध्ये प्रख्यात डिझाइन ओळख स्थापित केली आहे. गॅलॅक्सी वॉच अल्ट्राच्या, कुशन डिझाइनच्यां पायाला अधिक दृढ करत या सिरीजमध्ये आतापर्यंतचे सर्वात सडपातळ गॅलॅक्सी वॉच आहेत. या लाँचचा भाग म्हणून सॅमसंग आकर्षक सुरूवातीच्या किमती आणि विशेष प्री-ऑर्डर फायदे देत आहे. गॅलॅक्सी वॉच८ ४० मिमी बीटीची किंमत ३२,९९९ रूपये आहे, तर ४० मिमी एलटीई व्हर्जन ३६,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध आहे. मोठे ४४ मिमी बीटी व एलटीई व्हेआरिएण्ट्सची किंमत अनुक्रमे ३५,९९९ रूपये आणि ३९,९९९ रूपये आहे. गॅलॅक्सी वॉच८ क्लासिक ४७ मिमी बीटी मॉडेलची किंमत ४९,९९९ रूपये आहे, तर एलटीई व्हेलरिएण्ट ५०,९९९ रूपयांमध्ये उपलब्धि आहे. ९ जुलै ते २४ जुलै २०२५ दरम्यान गॅलॅक्सी वॉच८ सिरीज प्री-बुक करणारे ग्राहक उत्साहवर्धक फायद्यांचा आनंद घेऊ शकतात, जसे जवळपास १२,००० रूपयांपर्यंत मल्टी-बँक कॅशबॅक किंवा अपग्रेड बोनस किंवा जवळपास १५,००० रूपयांपर्यंत मल्टी-बाय ऑफर्स, ज्या विशेषत: नवीन गॅलॅक्सी एस व झेड सिरीज ग्राहकांसाठी डिझाइन करण्यातत आल्या आहेत. तसेच, ग्राहक आघाडीच्या बँका आणि एनबीएफसींकडून जवळपास १८ महिन्यांसाठी नो-कॉस्ट ईएमआय पर्यायांचा आनंद घेऊ शकतात.

## डॉ. धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

**नागपूर, २१ जुलै :** करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.
प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटरच्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ६ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ५ ते १० लिटर्स क्षमतेचे ऑक्सिजन



कॉन्संट्रेटर या उपकरणांचा समावेश होता. याआधी गेल्या वर्षीही ८ रुग्णांना दातार यांनी अशीच मदत केली आहे.
याप्रसंगी बोलताना डॉ.धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज रिक्षा ॲम्ब्युलन्स या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत.
फुफ्फुसाच्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसन कार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटरचे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.
डॉ. प्रभुदेसाई म्हणाले, आयुष्य आरोग्यपूर्ण घालवणे महत्त्वाचे असते आणि त्यासाठीच सर्वांनी आरोग्य, योग्य जीवनशैली व श्वासाचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे. सकारात्मक दृष्टीकोण, योग्य उपचार, नियमित व्यायाम या जोरावर फुफ्फुसाच्या आजारांचे रुग्ण सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. आम्ही अशा रुग्णांचे समुपदेशन तथा यशस्वी पुनर्वसन करुन त्यांना आनंदी जीवन जगायला शिकवतो.

## जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री

**नागपूर, २१ जुलै :** जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (कंपनी) ची इक्विटी शेअर्ससाठीची प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) बुधवार, २३ जुलै २०२५ रोजी खुली होणार आहे. प्रमुख गुंतवणूकदार बोली दिनांक हा बोली / प्रस्ताव सुरू होण्याच्या एक कार्यदिवस आधी मंगळवार, २२ जुलै २०२५ रोजी ठेवण्यात आला आहे. बोली /प्रस्ताव बंद होण्याचा दिनांक शुक्रवार, २५ जुलै २०२५ आहे.
ही ऑफर एससीआरआर १९५७ च्या नियम १९(२)(ब) आणि सेबी आयसीडीआर नियम ३१ च्या अनुषंगाने केली जात आहे. ही ऑफर बुक बिल्डिंग प्रक्रियेच्या माध्यमातून केली जात असून, सेबी आयसीडीआर सुधारित २०१८ नियम ६(१) च्या नियमनात आहे. त्या अंतर्गत सेबी आयसीडीआर नियमांनुसार, ऑफरच्या ५०% पेक्षा जास्त नसलेला भाग पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी (क्यूआयबी आणि तो हिस्सा क्यूआयबी भाग) प्रमाणबद्ध वाटपासाठी उपलब्ध असेल. तथापि आपली कंपनी, बीआरएलएम सोबत सल्लामसलत करून, सेबी आयसीडीआर नियमांनुसार विवेकाधीन आधारावर क्यूआयबी भाग पैकी ६०% पर्यंत हिस्सा प्रमुख गुंतवणूकदारांसाठी वाटप करू शकते. त्यापैकी किमान एक तृतीयांश हिस्सा देशांतर्गत स्थानिक म्युच्युअल फंडांसाठी उपलब्ध राहील. त्यासाठी स्थानिक म्युच्युअल फंडांकडून प्रमुख गुंतवणूकदार वाटप किमतीच्या बरोबरीने किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीसाठी वैध बोली प्राप्त व्हायला लागतील. जर प्रमुख गुंतवणूकदार भागामध्ये कमी सदस्यता किंवा वाटप न झाल्यास, उर्वरित इक्विटी शेअर्स नेट क्यूआयबी भाग मध्ये समाविष्ट केले जातील.
ऑफर प्राईस इतक्या किंवा त्याहून अधिक



किमतीला बोली मिळाल्यास क्यूआयबी च्या एकूण हिश्शापैकी ५ % फक्त म्युच्युअल फंडांना वाटपासाठी उपलब्ध असतील आणि क्यूआयबीचा उर्वरित हिस्सा म्युच्युअल फंडांसह अन्य सर्व क्यूआयबी बोलीधारकांसाठी उपलब्ध करून दिला जाईल. उर्वरित नेट क्यूआयबी हिस्सा सर्व क्यूआयबी गुंतवणूकदारांसाठी (म्युच्युअल फंडसह) प्रमाणानुसार वाटपासाठी उपलब्ध असेल. त्यासाठी वैध बोली ऑफर प्राईस इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने प्राप्त झाल्या पाहिजेत. तसेच, ऑफरच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी नसलेला हिस्सा बिगर संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असेल. त्यापैकी बिगर संस्थात्मक हिस्स्याचा एक तृतीयांश भाग ०.२० दशलक्ष रु. पेक्षा जास्त आणि १.०० दशलक्ष रु. पर्यंत अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल आणि दोन तृतीयांश भाग १.०० दशलक्ष रु.पेक्षा अधिक अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल. अर्थात त्यासाठी सेबी आयसीडीआर निर्देशांनुसार वर नमूद केलेल्या कोणत्याही उप-श्रेणीतील सबस्क्राईब नसलेला भाग दुसऱ्या इतर उप-श्रेणीतील गुंतवणूकदारांना वाटप केलेला असू शकतो. ऑफर प्राईस इतक्या किंवा त्याहून अधिक किमतीला बोली मिळाल्यास हे लागू होईल. ऑफर प्राइस इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या बोलीवर हे लागू असेल.
पुढे, सेबी आयसीडीआर निर्देशांनुसार ऑफरच्या ३५ % पेक्षा कमी नसलेला भाग रिटेल वैयक्तिक गुंतवणूकदारांना उपलब्ध होईल. ऑफर प्राइस इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या बोलीवर हे लागू असेल. प्रमुख गुंतवणूकदारांखेरीज सर्व संभाव्य गुंतवणूकदारांनी आपापल्या एएसबीए खात्यांचा तपशील आणि यूपीआय अर्जदारांसाठी यूपीआय आयडीसह जाहीर करून अर्जाची विहित रक्कम ॲप्लीकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक अमाऊंट (एएसबीए) प्रक्रियेद्वारे करून ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार योजनेत सहभागी करून घेण्यासाठी सर्व बोली रकमा या सेल्फ सर्टिफाइड सिंडिकेट बँक्स एससीएसबीतर्फे किंवा यूपीआय यंत्रणे अंतर्गत स्पॉन्सर बँकेतर्फे ब्लॉक करून ठेवण्यात येतील. प्रमुख गुंतवणूकदारांना त्यांच्यासाठीच्या हिश्शात एएसबीए प्रक्रीयेनुसार सहभागी होण्याची परवानगी नाही.
ऑफरच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त नसलेला हिस्सा बिगर संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असेल. त्यापैकी (अ) एक तृतीयांश भाग २००,००० रु. पेक्षा जास्त आणि १,०००,००० रु. पर्यंत अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल आणि (ब) दोन तृतीयांश भाग १.०० दशलक्ष रु.पेक्षा अधिक अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल. अर्थात त्यासाठी सेबी आयसीडीआर निर्देशांनुसार वर नमूद केलेल्या कोणत्याही उप-श्रेणीतील सबस्क्राईब नसलेला भाग दुसऱ्या इतर उप-श्रेणीतील गुंतवणूकदारांना वाटप केलेला असू शकतो. ऑफर प्राईस इतक्या किंवा त्याहून अधिक किमतीला बोली मिळाल्यास हे लागू होईल

## सिल्व्हरटन इंडस्ट्रीज लिमिटेडने सेबीकडे दाखल केला डीआरएचपी

**नागपूर, २१ जुलै :** सिल्व्हरटन इंडस्ट्रीज लिमिटेड ही खास पर्यावरणपूरक कागदाचे उत्पादन आणि विपणन करणारी कंपनी असून, आपल्या एकत्रित कार्यपद्धतीच्या माध्यमातून ती विविध क्षेत्रांतील उद्योगांना कागद पुरविते. लेखन व मुद्रणासाठीचा कागद, क्राफ्ट पेपर, कपस्टॉक पेपर तसेच इतर विशेष दर्जाचे कागद यांचे उत्पादन ही कंपनी करते. किरकोळ व्यापार, कॉर्पोरेट, शैक्षणिक आणि सरकारी क्षेत्रांमध्ये या उत्पादनांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. तसेच, पॅकेजिंग, एफएमसीजी, दुय्यम पॅकेजिंग, जलद सेवा देणाऱ्या रेस्टॉरंट्ससाठी अन्न व पेय पदार्थांचे पॅकेजिंग, द्रव पॅकेजिंग, लेबल आणि स्टेशनरी उत्पादने, तसेच औषध उद्योगासाठीचे पॅकेजिंग यांमध्येही ही उत्पादने उपयुक्त ठरतात.
सिल्व्हरटन इंडस्ट्रीज लिमिटेडने सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या संस्थेकडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केला आहे. कंपनीने प्राथमिक समभाग विक्रीच्या (आयपीओ) माध्यमातून निधी उभारण्याची योजना आखली आहे. या आयपीओमध्ये ५ रुपये दर्शनी मूल्य असलेल्या समभागांचा समावेश असून, त्याअंतर्गत एकूण ३०० कोटींच्या नव्या समभागांची (फ्रेश इश्शू) विक्री केली जाणार आहे. यासोबतच विद्यमान समभागधारकांकडील ३ कोटी २२ लाख समभागांची (ऑफर फॉर सेल) विक्रीदेखील करण्यात येणार आहे.
या समभाग विक्रीतून मिळणारा निधी काही विशिष्ट उद्दिष्टांसाठी वापरण्याचा कंपनीचा प्रस्ताव आहे. सध्याच्या उत्पादन प्रकल्पातच १४ मेगावॅट क्षमतेचा वेस्ट-टू-एनर्जी कॅप्टिव्ह पॉवर प्लँट आणि कंप्रेस्ड बायोगॅस प्लँट उभारून शाश्वत ऊर्जा उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक भांडवली खर्चासाठी अंदाजे १७७.५० कोटींचा निधी कंपनी वापरणार आहे. त्याचप्रमाणे विद्यमान उत्पादन प्रकल्पात रीवाइंडर व शीटर यंत्रणांची क्षमता वाढविण्यासाठी, तसेच आतील गोदामांची उभारणीसाठी भांडवली खर्चाच्या अनुषंगाने सुमारे ३४.६४ कोटींचा निधी वापरला जाणार आहे. कंपनीने घेतलेल्या काही कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड वा पूर्वपरतफेड करण्यासाठी सुमारे ७२ कोटी वापरले जातील. याशिवाय उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट वापरासाठी राखून ठेवण्यात येणार आहे. हे उल्लेख ऑबजेक्ट ऑफ इश्शूमध्ये नमूद आहेत.
ही समभाग विक्री रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसच्या माध्यमातून करण्यात येत असून, विक्रीस आलेले इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) या दोन्ही शेअर बाजारांवर सूचीबद्ध करण्याचा कंपनीचा प्रस्ताव आहे.
या इश्यूसाठी पॅंटोमॅथ कॅपिटल अ‍ॅडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड हे बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून कार्य करीत आहेत.

## अभिषेक मलिकने शेअर केले त्याचे ऑन-द-गो फिटनेस हॅक्स



**मुंबई, २१ जुलै :** झी टीव्हीवरील जमाई नंबर १ ही मालिका तिच्या रोचक कथानकामुळे आणि करिष्मादायक पात्रांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. या मालिकेमध्ये मुख्य भूमिका नील साकारणारा अभिनेता अभिषेक मलिक परिपूर्णपणे आकर्षकपणा आणि जबाबदारी यांच्यातील समतोल साधत आहे. पडद्यावर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा अभिषेक, पडद्यामागेही व्यस्त शूटिंग शेड्यूल असूनही आपल्या आरोग्य आणि फिटनेसबद्दल तितकाच समर्पित आहे.
शूटिंगचे सततचे सीन आणि दीर्घ तासांच्या वेळापत्रकात फिटनेससाठी वेळ काढणे अनेकांसाठी कठीण वाटते. पण अभिषेक आपल्या धावपळीच्या दिवसांतही सक्रिय राहण्याच्या शिस्तीत अडथळा येऊ देत नाही. तो सेटवरील कोणत्याही मोकळ्या जागेला स्वतःच्या वर्कआउट स्पेसमध्ये रूपांतरित करतो. मेकअप रूममध्ये रेसिस्टन्स बँडने वर्कआउट करणे असो, सीनच्या बदलाच्या दरम्यान कोअर एक्सरसाईज करणे, किंवा दोन टेक्समधल्या वेळेत थोडा वॉक घेणे अशाप्रकारे अभिषेक सतत हालचाल करत राहतो. तो आपल्या शिस्तीचे श्रेय 'माइंडफुल' म्हणजे जागरूक खाण्यालाही देतो. शूटिंग दरम्यान ब्रेकमध्ये तो नेहमी घरचे साधे आणि सोपे जेवण पसंत करतो. साखरयुक्त स्नॅक्स टाळून, तो प्रोटीन बार्स, फळे आणि भरपूर पाणी घेणे पसंत करतो.
अभिषेक म्हणाला, फिटनेस मला संतुलित ठेवतो, विशेषतः जेव्हा शूटिंगचे दिवस खूप लांबतात किंवा अनपेक्षित असतात. मला प्रत्येक वेळी जिमसाठी वेळ मिळत नाही, पण मी सतत हालचाल करत राहतो जरी तो फक्त १५ मिनिटांचा सेटवरील वॉक असो, शॉट्समधून ब्रेक घेत स्ट्रेचिंग असो, पायऱ्या चढणे असो किंवा स्टेप-अप एक्सरसाईज. अनेक वेळा मी सेटवर जे काही सापडेल त्याचा वापर करतो. उदा. स्कॉट्ससाठी खुर्ची, पुश-अप्ससाठी भिंत. फिटनेस म्हणजे केवळ सिक्स-पॅक ॲकब्स नव्हे तर सतत सक्रिय राहणे, ताजेतवाने वाटणे, आणि शरीर व मनाची काळजी घेणे. धावपळीच्या दिवसात या छोट्या सवयी खूप मोठा बदल घडवून आणतात.
अभिषेकचा फिटनेसबाबतचा दृष्टिकोन सोपा पण प्रभावी आहे खूप काही करण्यापेक्षा दररोज थोडे तरी काहीतरी करणे अधिक महत्त्वाचे आहे. आगामी भागांमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळेल की नील कशा पद्धतीने कांचनचे (पापिया सेनगुप्ता) खरे रूप समोर आणण्याचा प्रयत्न करतो. पण तो यशस्वी होईल का? की कांचन पुन्हा एकदा तिच्या धूर्त डावांनी त्याला फसवेल?

## अभिनेत्रींनी सांगितले त्यांच्या मेकअप पॅशनबाबत!

**मुंबई, २१ जुलै :** अभिनेत्रींसाठी मेकअप फक्त त्यांच्या कामापुरता मर्यादित नाही, तर मेकअपच्या माध्यमातून त्यान स्वत:ला आणि त्यांच्यापॅशनला व्यक्ता करतात. नवीन शेड्ससह प्रयोग करायचा असो, छान हायलाइटर शोधायचे असो किंवा योग्य न्यूड लिपस्टिक शोधायची असो मेकअप शॉपिंग टास्कपेक्षा उत्साहवर्धक बाब बनली आहे. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री मेकअपप्रती त्यांचे अविरत प्रेम आणि त्यांच्या कलेक्शनध्ये नवीन प्रोडक्टची भर केल्या शिवाय कशाप्रकारे राहू शकत नाही याबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत सोनल पवार (मलायका, हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, भाबीजी घर पर है'). मालिका हप्पू की उलटन पलटन'मध्ये मलायकाची भूमिका साकारणाऱ्या सोनल पवार म्हहणाल्या, प्रामाणिकपणे सांगायचे तर, मी कधीही, कुठेही मेकअपसामग्रीची खरेदी करू शकते. माझ्याकडे पाच ब्लशेस किंवा दहा लिपस्टिक्स असल्या तरी मी खरेदी करते. मला काहीतरी आकर्षक व चांगले उत्पादन दिसले की ते लावून पाहते. मेकअप माझ्यासाठी थेरपीसारखे आहे. मला नवीन रंग व फिनिशेसचा शोध घ्यायला आवडतो. ऑनलाइन ब्राऊजिंग करत असले किंवा स्टोअरमधून सहज चालत असले की मी काहीतरी नवीन खरेदी करते. माझे कलेक्शान वाढत आहे, पण प्रत्येअक उत्पादनामधून नवीन आनंद मिळतो. मला विशेषत: विविध प्रकारे वापरता येणारी उत्पादने आवडतात, जसे टिंट, जे ओठ व गालांवर लावता येते किंवा शिमर, जे डोळ्यांच्या पापण्यांना आकर्षक करते. मी दररोज आकर्षक व किमान लुकला प्राधान्य देते, ज्यासाठी टिंटेड मॉइश्चरायझर, मस्करा व सॉफ्ट लिप टिंटचा वापर करते. या जलद, फ्रेश मेकअपमधून मला उत्साही वाटते. दररोज हेवी मेकअप करण्याची गरज नाही, तर त्यामधून माझे व्यक्तिमत्त्व दिसून येण्याला प्राधान्य देते, तसेच माझ्या मूडनुसार वेगवेगळे लुक्स तयार करते.''



## आज का अंदाज

मंगळवार २२ जुलै २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 6 | 7 | 0 |
| 139 | 790 | 124 | 127 |
| 256 | 114 | 278 | 280 |
| 689 | 277 | 467 | 569 |
| 32 | 62 | 78 | 08 |
| 34 | 64 | 79 | 09 |
| 34 | 65 | 71 | 01 |

मुंबई बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 5 | 8 | 9 |
| 158 | 168 | 189 | 126 |
| 266 | 348 | 378 | 289 |
| 699 | 230 | 224 | 478 |
| 42 | 51 | 86 | 90 |
| 43 | 52 | 87 | 97 |
| 41 | 53 | 80 | 96 |

२२ जुलै २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 20 | 56 | 86 |
| 19 | 29 | 53 | 83 |
| 17 | 27 | 54 | 84 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034



## ३० जून रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एचडीएफसी बँकेचे आर्थिक निकाल

**नागपूर, २१ जुलै :** एचडीएफसी बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाने शनिवार, १९ जुलै २०२५ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी बँकेचे (भारतीय जीएएपी अनुसार) आर्थिक निकाल मंजूर केले.
बँकेच्या या खात्यांचा आढावा बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी 'मर्यादित पुनरावलोकन' अंतर्गत घेतला आहे.
स्वतंत्र आर्थिक निकाल: जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत एचडीएफसी बँकेचे एकूण निव्वळ उत्पन्न ५३१.७ अब्ज इतके झाले, ज्यामध्ये बँकेच्या सहाय्यक कंपनी एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या अलीकडील आयपीओ मध्ये ऑफर फॉर सेलच्या माध्यमातून अंशतः विक्री करून मिळालेला ९१.३ अब्ज रुपयांचा नफा समाविष्ट आहे. मागील वर्षीच्या याच तिमाहीत हे उत्पन्न ४०५.१ अब्ज होते. जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत बँकेचे निव्वळ व्याज उत्पन्न (म्हणजे व्याज उत्पन्नातून व्याज खर्च वजा करून उरलेली रक्कम) ५.४% ने वाढून ३१४.४ अब्ज झाले, जे मागील वर्षीच्या समान तिमाहीत २९८.४ अब्ज होते. एकूण मालमत्तेच्या तुलनेत बँकेचा कोअर निव्वळ व्याज मार्जिन ३.३५% इतका होता. यामध्ये ठेवींपेक्षा मालमत्तांची किंमत अधिक वेगाने वाढल्याचा परिणाम दिसून आला. मागील तिमाही (मार्च ३१, २०२५) मध्ये हा मार्जिन ३.४६% होता.

## राशीभविष्य

**मेष :** आज आरोग्याशी संबंधित कोणतीही गंभीर समस्या येण्याची शक्यता कमी आहे. हवामानाशी संबंधित आजार झाल्यास त्वरित उपचार घ्या. गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांनी आहाराची विशेष काळजी घ्यावी.
**वृषभ :** आज व्यवसायात उत्पन्न कमी आणि खर्च जास्त होईल. स्वत:ची परिस्थिती लक्षात घेऊन पैसे गुंतवण्याचा निर्णय घ्या. वडिलोपार्जित संपत्ती मिळण्यात येणारा अडथळा वरिष्ठ नातेवाईकाच्या मध्यस्थीने दूर होईल.
**मिथुन :** आज प्रेमसंबंधातील तणाव संपुष्टात येईल. परस्पर मतभेद वाढू देऊ नका. एकमेकांचा प्रॉब्लेम समजून घेण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये समन्वयाचा अभाव असू शकतो.
**कर्क :** विवाह करण्याचा विचार करत असतील, तर थोडा आर्थिक बाजूचा विचार करावा. प्रवासाचे योग संभवतात. करिअर आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न कराल.
**सिंह :** आज एखादा मित्र कार्यक्षेत्रात विशेष सहयोगी ठरेल. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. कोणाचीही दिशाभूल करू नका. महत्त्वाच्या कामात बुद्धीचा वापर करून अंतिम निर्णय घ्या. लोभ टाळा.
**कन्या :** आज अशी एखादी घटना घडू शकते ज्यामुळे तुमच्या कामावर परिणाम होईल. सामाजिक कार्याकडे कल वाढेल. कोणाचीही दिशाभूल करू नका. तुमच्या बुद्धीने आणि विवेकाने काम करा.
**तुळ :** या राशीच्या व्यक्तींना आज काहीतरी गुडन्यूज मिळेल. नोकरी करणाजयांना मोठा आर्थिक लाभ होऊ शकतो. मात्र बिझनेस करणाजयांनी खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहेत.
**वृश्चिक :** आज व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील. घर आणि व्यवसायाच्या जागेच्या सजावटीवर जास्त पैसे खर्च होऊ शकतात.
**धनु :** राग टाळा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नोकरी करणाजया लोकांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जास्त लक्ष द्यावे लागेल. पती पत्नीने एकमेकांवरील विश्वास वाढवण्याचा प्रयत्न करावा.
**मकर :** आजचा दिवस उत्तम राहील. बचत करण्यावर लक्ष द्या. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. आज खूप धावपळ होईल. काही कारणामुळे प्रवासाचे योग संभवतात.
**कुंभ :** आपल्या जोडीदारसोबत वेळ घालवावा. जर एखाद्या विषयावर काही अडचणी असतील तर मनमोकळेपणाने संवाद साधा. या आठवड्यात कोणतीही गुंतवणूक करु नका.
**मीन :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याचे संकेत आहेत. त्यामुळे संचित भांडवली संपत्ती वाढेल. आर्थिक बाबतीत पूर्वी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील.

## शब्दकोडे क्रमांक २१७२



**आडवे शब्द :-**
१) अत्यंत संथ गतीने
६) खून, हत्या
८) शपथ
११) धाड घालणे, लुटणे
१३) आशीर्वादाचा हात
१४) बळकट
१६) उत्सवाचे दिवस
१७) अंत:करण
१८) खोलवर
१९) सदोदित
२१) हद्द
२२) पहारेकरी
२५) बांबू
२६) संपूर्ण
२८) नदीचे तीर
२९) बनकर
३०) कमी बोलणारा
३२) दिवा
३३) पाण्यावरील लाट
३५) गैरसावध
३७) विरी, शक्ती सामर्थ्य
३८) एकटा, खच सिंचन
४०) गव्हाचे पीठ
४१) कैफ मद
४२) एक ऋतू
४३) मोठे डोळे, विद्रूप
४६) पायाचे उभे हाड
४८) एक कडवे धान्य
४९) समुद्रकिनारा
५२) बळ, शक्ती
५४) माळ धारण करणारा
५६) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
५९) बोबडी वळाल्या नंतरची भाषा
६१) ऋण
६२) च्या बरोबर
६३) श्रम
६४) ओटा, पार
६५) उथळ वाटी
६६) मीन
६८) विरोध, अडथळा
७०) रमापती
७३) तामसी रागीट
७५) वाळवी
७६) दृष्टी
७७) डबके, तट्ट फुगलेला

**उभे शब्द :-**
२) संस्कृत भाषा
३) बदल
४) लोभी
५) बळ, दम, भार
६) हिरव्या विषारी सापाची जात
७) साहित्यातील नऊ भावना
८) पाऊल
९) सोशीक, सोसण्याचा स्वभाव
१०) झकास
१२) महिना
१४) श्रीरामाचे वडील
१५) कट्टर, ठाम मताचा
१८) नेहमी
२०) रामदासस्वामींचा एक ग्रंथ
२३) गोंधळ, मोठा आवाज
२४) शरम
२५) उमलण्यापूर्वीची फुलाची अवस्था
२७) मनाचा ओढा
२९) मागणारा
३०) वजनदार
३१) हाताचा तळवा
३४) गरीब, निर्धन
३६) वस्तू, माल ३७) विसंगती,
३८) साईबाबांचा एक संदेश
३९) छोटा दरवाजा
४४) भरभराट
४५) त्या प्रमाणे
४७) लो टिळकांनी लिहिलेला एक टीका ग्रंथ
५०) बेपता, ठावठिकाणा न लागेल असे
५१) तात्काळ
५३) अरुंद तोंडाची लांब पिशवी
५५) यथाशास्त्र, पद्धतीनुसार
५७) धमनी
५८) आठ
६०) लवकर, चटकन
६३) जनावरांचा घोळका
६७) एक चतुर्थांश भाग
६८) शंकर, प्रत्येक
६९) दालचीनीचे झाड
७१) शोध, तपास
७२) रडकथा
७३) चांदणी
७४) एकाग्र नजर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# महिलांच्या हितासाठी एकत्रितपणे कार्य करावे : जिल्हाधिकारी येरेकर

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २१ :

महिला व बालविकास विभाग हा शासनासाठी अत्यंत महत्वाचा विभाग आहे. महिलांच्या सर्वांगीण विकास आणि उत्थानासाठी शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आज बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण, चाईल्ड हेल्पलाईन, बाल विवाह प्रतिबंध, बाल संरक्षण संस्थेची त्रैमासिक सभा, कोवीडमुळे पालकत्व गमाविलेल्या बालकांची काळजी व संरक्षण कृती दल सभा, पुनर्वसन समितीची त्रैमासिक सभा, अपराधी परिविक्षा अधिनियमानुसार सभा, महिला सल्लागार समितीची त्रैमासिक सभा पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, विभगीय महिला व बालविकास अधिकारी विलास मसराळे, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी अतुल भडांगे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, महिलांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. यामुळे महिला विकासात योगदान देऊ शकतील. अल्पवयात लग्न, मुले होणे, घरगुती हिंसाचार यामुळे महिलांचे खच्चीकरण होत असून विभागाने महिलांकडे पाहण्याचा कल बदलविण्यासाठी कार्य करणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने बाल विवाह रोखल्यास निर्माण होणाऱ्या समस्या निकाली निघू शकतील. महिलांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिल्यास त्या आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे त्यांना पारंपारिक प्रशिक्षणापेक्षा वेगळे प्रशिक्षण देण्यात यावे.

येत्या पिढीला अंमली पदार्थापासून वाचविणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिसांनी कार्यवाही वाढवावी. शाळांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर बंदी आहे. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खातरजमा करावी. तसेच मुलांसाठी असलेल्या चाईल्ड हेल्पलाईनची माहिती प्रत्येक शाळेत देण्यात यावी. अल्पवयीन मुलांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करताना त्याची माहिती बाल संरक्षण कक्षास देण्यात यावे. यामुळे त्यांचे समुपदेशन होऊ शकेल. रेल्वेस्टेशनप्रमाणे महत्वाच्या बसस्थानकावरही मुलांसाठी मदत कक्ष उभारण्याच्या सूचना करण्यात आल्या.

महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महिलांच्या उद्योजकतेला वाव देण्यात येत आहे. त्यांच्यातर्फे निर्मित वस्तूंना बाजारपेठेत चांगली मागणी आहे. त्यामुळे महिलांमध्ये उद्योजकता वाढावी यासाठी आरसेटी, जिल्हा उद्योग केंद्र या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा उपयोग करून घ्यावा. महिलांच्या विकासाठी विभाग म्हणून भूमिका महत्वाची राहणार आहे. त्यामुळे येत्या काळात परिणामकारक ठरतील, अशा कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



# जऊळखेडला काळवीटाची शिकार

## अकोला वन परिक्षेत्र पथकाने तिघांना घेतले ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
चोहोट्टा, दि. २१ :

वन्य प्राण्याची शिकार करण्यावर बंदी असताना देखील काळवीटच मांसाचे मटण बनवून खातेवेळी जऊळखेड (ता. अकोट) येथे एका आरोपीस रंगेहात पकडण्यात आले आहे.ही कारवाई अकोला वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यांनी केली आहे. अकोट वतुर्ळात येत असलेल्या जऊळखेड येथे वन्य प्राण्यांची शिकार झाली असताना अकोला वन परिक्षेत्रातील पथक अकोट वन परिक्षेत्रात मध्ये येऊन कारवाई करते मात्र अशा वेळी अकोट विभागाला या शिकारी बाबत कुठलाच सुगावा नसल्याचे दिसून आले.

राखीव वन क्षेत्र,मुबलक जल स्रोत आलेल्या वन्य प्राणी काळवीट यांचा सर्वाधिक अधिवास असलेल्या आणि अकोट वर्तुळ अंतर्गत येणाऱ्या कुटासा क्षेत्रातील जऊळखेड गावात वन्य प्राणी काळवीटची शिकार करण्यात आली असल्याची घटना १९ जुलै रात्रीच्या सुमारास घडली. २० जुलै रोजी यातील तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, एका आरोपीला घरात मांस बनवून खातेवेळी ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणात एक आरोपी फरार असल्याची माहिती संबंधित विभागाकडून देण्यात आली.

२० जुलै रोजी अकोला प्रादेशिक वन विभागाला गुप्त व गोपनीय माहितीच्या आधारे वन्य प्राण्यांची शिकार अकोट वतुर्ळात झाल्याची माहिती मिळाली. यावेळी भारतीय वन अधिनियम १९२७ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून झडती वॉरंट द्वारा मौजा जऊळखेड येथील रहिवासी अंकुश गणेश इंदौरे रा. जऊळखेड, दिगंबर जनकीराम घारे (रा. कुटासा), गणेश दयाराम इंदौरे (रा. जऊळखे) यांच्या घरची झाडाझडती घेण्यात आली.

यामध्ये दिगंबर जनकीराम घारे (रा. कुटासा) यांच्या राहत्या घरातून वन्यप्राणी काळवीट ची शिकार कलेले व त्याचे मांस बनवून खातेवेळी आरोपीस रंगेहात पकडण्यात आले. आरोपी जवळून वन्य प्राणी काळवीटाचे मांस अंदाजे अर्धा किलो जप्त करण्यात आले आहे.

ही कार्यवाही उपवनसंरक्षक सुमंत सोळंके, सहाय्यक वनरंक्षक (वने) नम्रता शां. ताले यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) व्ही. आर. थोरात यांचे अधिनस्त वन कर्मचारी पी. ए. तुरुक, वनरक्षक अतिक हुसेन, सुभाष काटे, सोपान रेळे, तुषार आवारेआदी वन कर्मचाऱ्यांनी पार पाडली.या प्रकरणात इंदोरे नामक इसम अद्याप फरार असून त्यावर यापूर्वीही शिकार संबंधी दोन गुन्हे असल्याची माहिती विभागाने दिली.

# अंढेरा परिसरात हुमणी अळीचे थैमान



■ महासागर प्रतिनिधी, अंढेरा, दि. २१ :

अंढेरासह परिसरातील अनेक गावांमधील शेतीत हुमणी अळीने मोठ्या प्रमाणात थैमान घातले असून, ऐन बहरात आलेली सोयाबीन आणि मका पिके पूर्णपणे सुकत चालली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे.

अंढेरासह सेवानगर, शिवणी आरमाळ, मेंडगाव, बायगाव, पाडळी शिंदे, पिंप्री आंधळेसह परिसरातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांनी पेरणी केलेल्या खरीप हंगामातील पिकांना जवळपास एक महिना पूर्ण झाला आहे. परिसरात सोयाबीन, कपाशी, मका, उडीद, मूग, तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणात लागवड क्षेत्र आहे. पिके बहरलेल्या स्थितीत असतानाच काही दिवसांपासून अचानक हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाला आहे.

हुमणी अळीने मुळे कुरतडल्याने झाडे पूर्णपणे पिवळी पडून सुकत चालली आहेत. त्यामुळे शेतकरी आपली पिके वाचविण्यासाठी धडपड करत आहेत. हुमणी अळीपासून पिके वाचवण्यासाठी शेतकरी महागडी किटकनाशके, बुरशी नाशक तसेच विविध प्रकारच्या महागड्या औषधांची फवारणी करत आहेत. परंतु, हुमणी अळीचा प्रादुर्भाव कमी न झाल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. शासनाने वेळीच दखल घेऊन हुमणी अळीने नुकसान झालेल्या पीक क्षेत्राची पाहणी करून शेतकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करावी, अशी मागणी केली जात आहे.

# राजमाता जिजाऊंच्या राजवाड्यात स्वच्छता मोहीम

# ४८ मावळ्यांसह अनेकांची उपस्थिती



■ महासागर प्रतिनिधी
सिंदखेडराजा, दि. २१ :

राजा शिवछत्रपती परिवार या संस्थेच्या वतीने शहरातील राजमाता जिजाऊंच्या राजवाड्यात रविवारी दि. २० जुलै रोजी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

राजा शिवछत्रपती परिवार ही संस्था महाराष्ट्रात २६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने प्रत्येक महिन्यात एका रविवारी ऐतिहासिक वास्तू, गडकिल्ले संवर्धन, गडकिल्ले स्वच्छता मोहीम वेगवेगळ्या ठिकाणी राबविली जाते. संस्थेचा एक विभाग अकोला व बुलडाणा जिल्ह्यात कार्यरत आहे. या विभागाने आतापर्यंत अशा ५१ मोहिमांचे आयोजन केले आहे. त्यामध्ये बाळापूर किल्ला, गोंधनापूर किल्ला, अकोला येथील असदगड, आडगावराजा येथील राजवाडा, पातूरमधील नानासाहेब वाडा अशा ठिकाणी मोहीम राबविण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर राजा शिवछत्रपती परिवाराच्या अकोला - बुलडाणा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता मोहीम क्रमांक ५१ अंतर्गत आज सिंदखेडराजा येथे स्वच्छता मोहीम पार पडली. याप्रसंगी राजमाता जिजाऊ यांचे दर्शन घेऊन राजवाड्यात स्वच्छता करण्यात आली. यावेळी मोहीम राबवताना मावळे ४०, रणरागिणी ५, बालमावळे ३ अशा एकूण ४८ जणांनी मोहिम राबवली.

# स्व. डॅडी देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुरणखेड येथे रंगभरण स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी,
कुरणखेड, दि. २१ :

कुरणखेड गावचे भूमिपुत्र स्व. डॅडी देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रात त्याचबरोबर चित्रपट क्षेत्रात विविध कार्य आहे. त्यांनी गावात विविध चित्रपट निर्मिती केली. त्याचबरोबर अनेक चित्रपटांच्या गावात शूटिंग झाल्या. अकोला जिल्हयामध्ये त्यांचे विविध सामाजिक कार्य आहे. अशा या महान समाजसेवक स्व.डॅडी देशमुख यांनी कुरणखेड गावाच्या शाळेत शिकून त्यांनी आपले नाव मोठ केले, असे प्रतिपादन राजर्षी देशमुख यांनी केले.



गजानन महाराज विद्यालय कुरणखेड येथे सार्वजनिक विवेकानंद वाचनालय कुरणखेड यांच्या वतीने स्व. डॅडी देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रववारी रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गजानन महाराज विद्यालय मुख्याध्यापक रणजीत सोळंके होते. आपल्या सामाजिक कायार्तून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित असलेले स्वर्गीय डॅडी देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुरणखेड येथील गजानन महाराज विद्यालयात रंगभरण स्पर्धा रविवारी उत्साहात झाली. यावेळी देशमुख महिला मंडळ अकोला अध्यक्ष राजश्री देशमुख, श्री चंडिका देवी संस्थान विश्ववस्त पंकज देशमुख, सार्वजनिक विवेकानंद वाचनालय संचालक मनोज देशमुख,सामाजिक कार्यकर्ता उज्वल देशमुख, पत्रकार योगेश विजयकर, सागर सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होते.

# रेशीम शेती शेतकऱ्यांसाठी वरदान : डॉ. महेंद्र ढवळे

■ महासागर प्रतिनिधी,
दिग्रस, दि. २१ :

रेशीम रक्षितो रक्षितः रेशीम शेती हे आजच्या पारंपरिक शेती करण्याऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरले आहे. रेशीम उद्योगाच्या माध्यमातून शेतकरी लाखोंचे उत्पन्न मिळवून तो आर्थिक दृष्टीने सक्षम होऊ शकतो. जो लावेल तुतीची काडी, तोच बांधेल शेतामध्ये माडी. पानापासून पैसे देणारा एकमेव उद्योग कोणता असेल, तो रेशीम उद्योग आहे. शासन ४ लाख ३२ हजार ३४० रुपये मनरेगा अंतर्गत कामाचे मूल्यांकन झाल्यानंतर तीन वर्षात अदा करते. केवळ शेतकऱ्याचा उद्योग करण्याचा दृष्टिकोन असला पाहिजे, असे मत रेशीम संचालनालयाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे यांनी व्यक्त केले.

स्थानिक रेशीम गोल्ड फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या मुख्य कार्यालयात बुधवारी १६ जुलै रोजी झालेल्या एका कार्यक्रमात डॉ. महेंद्र ढवळे बोलत होते. या वेळी अनिकेत राऊत, रामेश्वर पवार, योगेश धनगर, गजानन माहुरे पाटील, अरुण ढोरे, गजानन राठोड आदी उपस्थित होते. डॉ. ढवळे पुढे मार्गदर्शन देत रेशीम उद्योग प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांच्या दौऱ्यादरम्यान परिसरातील रेशीम लागवड इच्छुक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा रेशीम कार्यालयाचे वरीष्ठ तांत्रिक सहायक हगवणे यांनीही मार्गदर्शन केले.

पानापासून निर्माण होणारे पिक म्हणजे रेशीम उद्योग काडी पासून माडी हा आगळ्या वेगळ्या संकल्प शेतकरी यांना देत ते म्हणाले की, रेशीम काळाची गरज आहे. पानापासून निर्माण होणारे पिक म्हणजे रेशीम उद्योग आहे, म्हणत त्यांनी उपस्थित रेशीम उद्योग करण्यास इच्छुक असणाऱ्या शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाची ओळख करून देत प्राथमिक मार्गदर्शन केले.

# महिलेचे एक लाख रुपये चोरीला

■ महासागर प्रतिनिधी,
घाटंजी, दि. २१ :

शहरात १५ दिवसांपूर्वी दुपारच्या सुमारास भरदिवसा एका महिलेकडून ग्राहक सेवा केंद्राजवळ १ लाख रुपयांची चोरी झाल्याची घटना घडली होती. मात्र, घाटंजी पोलीस विभागाच्या तत्काळ कारवाईमुळे केवळ काहीच दिवसांत गुन्हा उघडकीस आला.

चोरी गेलेली १ लाख रुपयांची रोख रक्कम परत मिळवण्यात यश आले आहे. तालुक्यातील पांढुर्णा येथील साधना किशोर ठावरी या महिलेने शुक्रवारी ४ जुलै रोजी स्टेट बँकेत घाटंजी शाखेतून २ लाख २० हजार रुपये काढले. या प्रकरणी घाटंजी ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेताच पोलिसांनी तातडीने तपास सुरु केला.

# गुप्तधन शोधणारी टोळी गजाआड




■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २१ :

गुप्तधन काढण्यासाठी घरात खोदकाम करणाऱ्या पाच जणांना ग्रामीण पोलिसांनी अटक केली. तालुक्यातील साकुर (हेटी) येथे हा प्रकार उघडकीस आला. ऐन गुप्तधन शोधतांना पोलिसांनी छापा टाकल्याने आरोपींच्या मनसुब्यावर पाणी फेरल्या गेले. या प्रकरणी पाच जणांना पोलिसांनी अटक केली. काही दिवसांपूर्वी यवतमाळ शहरात गुप्तधनासाठी नरबळीचा होणारा प्रयत्नही पोलिसांनी उधळला होता.

आकाश उकंडराव कोटनाके (३०) रा.साकुर (हेटी) याच्या घरी एका खोलीत मांत्रिकाच्या माध्यमातून पूजा करून गुप्तधन शोधण्यासाठी खड्डा खोदला जात होता. चार फुटापर्यंत खोदकाम झाले असतानाच पोलिसांनी तेथे छापा टाकला.

पूजेचे साहित्य जागेवर सोडून सैरभैर पळत सुटलेल्या आकाश कोटनाकेसह सोनू ऊर्फ कुणाल सुरेश खेकारे (३८) रा.सारखणी ता.किनवट, ह.मु.कराडी पुणे, वृषभ मनोहर तोडसकर (२४) रा. तिवसाळा रा. घाटंजी, प्रदीप रामकृष्ण इळपाते (५०) रा. मेहा ता. कारंजा,बबलू ऊर्फ निश्चय विश्वेश्वर येरेकर (२६) रा. देऊरवाडी ता. आर्णी यांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले. त्यांच्या विरोधात ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम तीन, महाराष्ट्र नरबळी आणि अमानुष अनिष्ट व अघोरी प्रतिबंध करण्याबाबत तसेच समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ सह कलम ३ (५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनास्थळावरून पोलिसांनी दुचाकी जप्त केल्या आहे. साकुर हेटी येथील कोटनाके याच्या घरातील मागच्या खोलीत आरोपींनी मोठा खड्डा खोदला होता. पाचव्या फुटावर असलेले सोन्याचे घबाड काढत असताना पोलिसांनी हा डाव अर्ध्यावरती मोडून काढला. खडयाच्या शेजारी लिंबु, ताट, नारळ ओटीचे सामान असे पुजेचे साहित्य आढळले.

या प्रकरणातील काही आरोपी मोठ्या वाहनाने गावालगत पहारा देत असल्याची माहिती आहे. पोलिसांची धाड पडल्याचे कळताच या वाहनातील आरोपींनी तेथून पळ काढला. ही कारवाई ठाणेदार सुनील नाईक यांच्या मार्गदर्शनात प्रवीण मानकर, संजय राठोड, रमेश कोंदरे,रणजित जाधव, गजानन खांदवे, सचिन पातकमवार, पंकज नेहारे, तुषाल जाधव, रूपेश नेव्हारे यांनी केली.

# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य विचारांच्या माध्यमातून आजही जिवंत : योगेश तायडे

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. २१ :

जग बदल घालुनी घाव,सांगून गेले मज भीमराव अशा क्रांतिकारी साहित्याच्या माध्यमातून शोषित वंचित पीडितांना गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य त्यांच्या क्रांतिकारी विचाराच्या माध्यमातून आजही जिवंत आहे. जनसामान्यांच्या वेदनेवर साहित्य आणि शाहिरीच्या माध्यमातून अण्णाभाऊ सदैव प्रेरणादायी राहतील, असे मत बहुजन विचारवंत योगेश तायडे यांनी व्यक्त केले.



बुलडाणा येथील आझाद हिंद संघटनेच्या कार्यालयाच्या सभागृहात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतिदिनानिमित्त महानायक विचार मंच च्या वतीने १८ जुलै रोजी सायंकाळी आयोजित चर्चासत्रामध्ये प्रमुख व्याख्याते म्हणून योगेश तायडे यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. सर्वप्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला सामूहिक माल्यार्पण करून आदरांजली समर्पित करण्यात आली. यावेळी महानायक विचार मंचचे गणेश राऊत पाटील,प्रबोधनकार ॲड. सतीशचंद्र रोठे पाटील, शिव व्याख्याते समर्थ तायडे, नितीन गवई, रमाई ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सुरेखा निकाळजे, आझाद हिंद शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय साबळे पाटील,शाहीर परिषदेच्या जिल्हाध्यक्ष सिंधू अहेर,आझाद हिंद महिला संघटनेच्या अध्यक्षा आशा गायकवाड, पंचफुला गवई, ग्राम स्वराज्य समितीचे संयोजक कमलाकर व्यवहारे, उल्हास काकर, राम व्यवहारे, राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रांत उपाध्यक्ष भूपेश शेळके, जिल्हाध्यक्ष सुशांत पाटील आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. उपस्थित सर्व मान्यवरांनी यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त करत प्रबोधन केले. प्रास्ताविक विचारवंत निखिल राणे यांनी तर संचालन संजय राका यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजय एंडोले, शेख अफसर, पुरुषोत्तम व्यवहारे, ॲड. प्रतीक देखणे, विजय बावस्कर, पुंजाजी गायकवाड, यांच्यासह महानायक विचार मंच च्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# अकोला-वाशीम जिल्हा बँकेला नाबार्डचा बँक पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २१ :

नाबार्डच्या ४४ व्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अमरावती विभागातून सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी बँक म्हणून शनिवारी गौरवण्यात आले, अशी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी दिली. शनिवारी ते माध्यमांशी बोलत होते.

पुरस्कार सोहळा पुणे येथे यशदाच्या सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला भारत सरकारचे सहकार राज्यमंत्री मुरलिधर मोहोळ, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, नाबार्ड मुंबईचे उपव्यवस्थापकीय संचालक गोवर्धनसिंह रावत, नाबार्ड पुण्याच्या मुख्य महाप्रबंधक रश्मी दराड, महाराष्ट्राचे सहकार आयुक्त दिपक तावरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या पुरस्काराने बँकेला ग्रामीण भागातील आर्थिक विकासासाठी केलेल्या




उल्लेखनिय कार्याची पावती मिळाली आहे, असे सांगून बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी हा पुरस्कार बँकेचे सर्व संचालक मंडळ, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, अधिकारी, कर्मचारी तसेच बँकेचे ग्राहक, शेतकरी, हितचिंतक या सर्वांचे सहकायार्मुळे प्राप्त झाला आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. विश्वास आहे असेही ते म्हणाले. २३ जुलै रोजी बँकेला आणखी दोन पुरस्कार बँकेला दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स असोसिएशन, मुंबई या संस्थेद्वारे बँकेला कै. वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **PRAFUL MAHENDRA MATEY.** NOW MY NEW NAME IS **PRAFUL GAJENDRA MATEY** .
**ADD** : VISHAL BHAVAN SOUTH AMBAJHARI ROAD MATEY SQ GOPAL NAGAR NAGPUR.

MY OLD NAME WAS **MAHENDRA KUMAR MATEY.** NOW MY NEW NAME IS **GAJENDRA ANTUJI MATEY.**
**ADD** : VISHAL BHAVAN SOUTH AMBAJHARI ROAD MATEY SQ GOPAL NAGAR NAGPUR.

MY OLD NAME WAS **URMILATAI MATEY.** NOW MY NEW NAME IS **BABYTAI GAJENDRA MATEY.**
**ADD** : VISHAL BHAVAN SOUTH AMBAJHARI ROAD MATEY SQ GOPAL NAGAR NAGPUR.

MY OLD NAME WAS **ASKHAY RAMESH WARDHANE.** NOW MY NEW NAME IS **AKSHAY RAMESH WARDHANE.**
**ADD** : 401 KAPIL TOWER 6 CANAL ROAD RAMDASPETH NAGPUR - 440010.

I **ATIQUE AHMAD** CHANGE MY SON NAME IN HIS PASSPORT NO **W2291132**. MY SONS OLD NAME WAS **FAIZ ATIQUE SHEIKH.** NOW MY SONS NEW NAME IS **FAIZ ATIQUE AHMAD.**
**ADD** : NEAR DOCOMO TOWER BEHIND SALI FACTORY AMRAVATI - 444604.

MY OLD NAME WAS **FAROOQUE PATHAN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD FARUK ABDUL GAFFAR.**
**ADD** : PLOT NO.237, DIGHORI NAKA ROAD NEAR SAWALI AMMA DARGA NAGPUR

MY OLD NAME WAS **NOORJAHAN BEGUM.** NOW MY NEW NAME IS **NURJAHA MUJAMMIL MOHAMAD SHEIKH.**
**ADD** : 488 B, BHANDARA ROAD NEAR HANUMAN MANDIR SUBHASH NAGAR PARDI NAGPUR.

MY OLD NAME WAS **SHAMSUDDIN.** NOW MY NEW NAME IS **SHAMSUDDIN ANSARI SIRAJUDDIN ANSARI.**
**ADD** : BHANKHEDA MOMINPURA NAGPUR.

MY OLD NAME WAS **MOHD SHAHNAWAZ MOHD FAZAL.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHAHNAWAZ ANSARI.**
**ADD** : NEAR JAMA MASJID LEADER MANZIL MOHAMMAD ALI ROAD MOMINPURA NAGPUR 440018.

I WANT TO CHANGE MY NAME FROM **ALMISBAH** TO **ALMISBAH** AND SURNAME IS **KHAN**
**ADD** : PLOT NO.15 TEACHER COLONY JAFAR NAGAR NAGPUR 440013
PASSPORT NO.: **L1806247**.

I WANT TO CHANGE MY NAME IN PASSPORT NUMBER **M8593007**. MY OLD NAME WAS **MUKESH KUMAR CHOURASIYA.** NOW MY NEW NAME IS **MUKESH CHAURASIA.**
**ADD** : 699 BRIJ BHAVAN KALAR LINE SITABULDI NAGPUR - 440012.

I WANT TO CHANGE MY NAME IN PASSPORT NUMBER **J8886550**. MY OLD NAME WAS **SYED SOHIL**. NOW MY NEW NAME IS **SYED SOHAIL.**
**ADD** : WARD NO 16, NEAR MARKAZ MASJID, JUNE FAIL KHAMGAO BULDHANA 444303.

MY OLD NAME WAS **NOOR SABA ABDUL RAHMAN.** NOW MY NEW NAME IS **NOOR SABA ABDUL RAHMAN KHAN.**
**ADD** : PLOT NO.44 BHANDARA ROAD NEAR TOWER LINE DESHPANDE LAYOUT NAGPUR 440008.

MY OLD NAME WAS **SUDHAKAR SONALI YESEKAR.** NOW MY NEW NAME IS **SONALI VIVEK CHAUDHARI.**
**ADD** : FLAT NO.102, MARGERITA SHIV ELITE PH 3, SHANKARPUR ROAD SHANKARPUR NAGPUR.
MY PASSPORT NO. **H2440378**.

MY OLD NAME WAS **RAVINDRA BHOYAR.** NOW MY NEW NAME IS **RAVINDRA PANDURANG BHOYAR.**
**ADD** : QU.NO/03/C,TYPE-3 SEC-6 ORDANANCE FACTORY CHANDA, BHADRAWATI, CHANDRAPUR, 442501, MAHARASHTRA, INDIA.




# कॉर्न आलू मसाला चाट

झटपट रेसिपी



एखाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**सामग्री :** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅगी मसाल्याचं एक पाकीट, चिमूटभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्ध लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती :** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद, धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न-बटाट्याचं मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.

## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।

# संन्यास सोडून उभारला उद्योग

अचिव्हर



शोभित कुमार सिंह यांची कहाणी फारच प्रेरणादायक आहे. त्यांनी आयुष्यात अनेक चढ-उतारांचा सामना केला. एकेकाळी संन्यास घेण्यासाठी निघालेले शोभित आज एक यशस्वी उद्योजक आहेत. कानपूरचे रहिवासी असलेले शोभित जवळपास दीड वर्ष आश्रमात सन्यांसी म्हणून राहत होते. मात्र आई-वडिलांच्या दबावामुळे त्यांना पुन्हा घरी यावे लागले. त्यानंतर शोभित यांनी लग्न केले. आज शोभित १२० कोटी रुपयांचा टर्नओव्हर असलेल्या खेळणी आणि स्टेशनरी ब्रँडचे मालक आहेत.

शोभित कुमार सिंह उत्तर प्रदेशातील कानपूर येथील रहिवासी आहेत. त्यांचा जन्म एका धार्मिक कुटुंबात झाला असून त्यांनी १९९७ मध्ये अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीमधून इकॉनॉमिक्समध्ये बीए ऑनर्स केले होते. १९९९ मध्ये त्यांनी फायनान्समध्ये एमबीए केले. त्यांनी दिल्लीत एका जर्मन सॉफ्टवेअर कंपनीत पहिली नोकरी केली. तिथे त्यांनी असिस्टंट मॅनेजर म्हणून काम केले. सुरुवातीपासूनच त्यांचे मन अध्यात्माकडे झुकलेले होते. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. त्यात वैदिक व्यवस्थापन कार्यक्रम, इस्लामिक शिकवणी आणि ख्रिश्चन धर्मशास्त्र यांचा समावेश आहे.

एमबीए आणि नंतर जर्मन सॉफ्टवेअर फर्ममध्ये करिअर सुरू केल्यानंतर वयाच्या २६ व्या वर्षी शोभित यांनी भौतिक सुखाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. ते ऋषिकेश येथे महर्षी महेश योगी यांच्या आश्रमात सन्यासी म्हणून राहू लागले. तिथे त्यांनी जवळपास १८ महिने वास्तव्य केले. साधारण दीड वर्षांनंतर आई-वडिलांच्या दबावानंतर त्यांनी सन्यांसी आयुष्य सोडून लग्न केले. त्यांची पत्नी बडोद्यातील एका व्यावसायिक कुटुंबातील होती. त्यामुळेच त्यांनी व्यवसायात पाऊल ठेवले.

शोभित कुमार सिंह यांनी २०१६ मध्ये 'स्टोन सफायर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी सुरू केली. कंपनीने त्यांच्या ब्रँडअंतर्गत लहान मुलांची खेळणी आणि स्टेशनरीचे मार्केटिंग सुरू केले. त्यांनी 'स्टोन सफायर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'ला एक अग्रगण्य मेक इन इंडिया स्टेशनरी आणि खेळण्यांचा ब्रँड बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्यांच्या कंपनीचा टर्नओव्हर १२० कोटींचा आहे. त्यांनी मुलांसाठी 'आर्ट अँड कल्चर किट'ची देखील सुरुवात केली होती. त्यानंतर स्टेशनरी, खेळणी, गेम्स आणि होम प्रॉडक्ट्सच्या उत्पादनाला सुरुवात केली. शोभित यांच्याकडे ५००हून अधिक एसकेयू (स्टॉक-कीपिंग यूनिट्स) आहेत. त्यांनी प्ले-डॉ, माय लिटिल पोनी, प्लेस्कूल, बार्बी, हॉट व्हिल्स, मार्व्हल, फ्रिशर-प्राइस, डिज्नी सारख्या प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ब्रँडसाठी खेळण्यांच्या उत्पादनाचे लायसन्स मिळवले आहे.

कंपनीकडे संपूर्ण भारतात वितरण नेटवर्क आहे. तीस हजारांहून अधिक दुकानात त्यांचा माल जातो.


## टेक टॉक



### इंजिन गरम होतेय?

ट्रॅफिकमध्ये थांबल्यामुळे किंवा सतत रायडिंग केल्यामुळे बाईकचे इंजिन ओव्हरहीट होऊ लागले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. कारण बाइकचे इंजिन खराब होऊ शकते किंवा मायलेज कमी होऊ शकते. अतिवेगाने वाहन चालवणे टाळले पाहिजे. अतिवेगाने वाहन चालवल्यावर बाइकच्या इंजिनचे नुकसान होते. इतकेच नाही तर बाईकचे इंजिन वेगाने गरम होते आणि मायलेज झपाट्याने कमी होते. बाइकमध्ये कधीही ट्रिपलिंग करू नका कारण असे केल्याने बाइकच्या इंजिनवर प्रचंड ताण येतो आणि मग बाईकचे इंजिन ओव्हरहीट होऊ लागते. इंजिन जास्त गरम झाल्याने आग लागू शकते. अशावेळी इंजिन ऑईल आणि कूलंट लेव्हलची काळजी घेणे गरजेचे आहे. कमी कूलंटमुळे इंजिन जास्त गरम होऊ शकते. जास्त उष्णतेमुळे जवळच्या इंधन किंवा तेलाच्या पाईपमध्ये आग लागू शकते. कूलंटमुळे इंजिन थंड राहते. इंजिन ऑईलची पातळीही योग्य असावी. इंजिन ऑईल किंवा ट्रान्समिशन फ्लुइडची गळती तपासा. उन्हाळ्यात नेहमी बाईक सावलीत पार्क करण्याचा प्रयत्न करा.


## जाणून घ्या




### इंटरनेटशिवाय पैसे कसे पाठवाल?

इंटरनेट नसताना पैसे पाठवायचे असतील तर सर्वप्रथम *९९ टाइप करा आणि कॉल करा. यानंतर तुम्हाला भाषा निवडण्याचा पर्याय मिळेल. भाषा निवडल्यानंतर १ डायल करा. यानंतर ज्या यूपीआय आयडीवर तुम्हाला पैसे पाठवायचे आहेत ती माहिती भरा. यानंतर 'यूपीआय' पिन टाकण्यास सांगितले जाईल. पिन व्हेरीफाय झाल्यानंतर तुम्ही समोरच्या व्यक्तीला पैसे पाठवू शकाल. या सेवेद्वारे तुम्ही फक्त ५००० रुपयांपर्यंत ट्रान्सफर करू शकता. *९९ ला कॉल करुन तुम्ही तुमचा 'यूपीआय' पिन बदलू शकता. मोबाईलच्या डायलरमध्ये *९९ कोड टाका आणि कॉल करा. यानंतर भाषा निवडा. यानंतर सेट यूपीआय पीनचा पर्याय निवडा. हा पर्याय ५ व्या क्रमांकावर मिळू शकेल. यानंतर अकाउंट नंबरचे शेवटचे ६ अंक आणि डेबिट कार्डची एक्सपायरी डेट टाका. यानंतर मोबाइल नंबरवर एक ओटीपी पाठवला जाईल. तो ओटीपी टाका. यानंतर तुम्हाला यूपीआय पिन सेट करण्यास सांगितले जाईल.

## ॲप वर्ल्ड




### वायफाय ट्रॅकिंग धोकादायक?

'ॲपल'च्या मते 'वायफाय ट्रॅकिंग' हे फीचर चांगली नेटवर्क कनेक्टिव्हिटी आणि लोकेशन-आधारित सेवा देते. परंतु याचा तुमच्या गोपनीयतेवर आणि फोन बॅटरीवर वाईट परिणाम होतो. वायफाय ट्रॅकिंगमुळे लोकेशन लीक होण्याचा धोका वाढतो. तुमचा डेटा तुमच्या संमतीशिवाय शेअर केला जाऊ शकतो. बॅटरी जलद संपते. कारण फोन सतत नेटवर्क स्कॅन करतो. काही 'थर्ड पार्टी ॲप्स' या डेटाचा गैरवापर करू शकतात. ट्रॅकिंगमुळे तुमचा फोन सायबर हल्ल्याला बळी पडू शकतो. वायफाय ट्रॅकिंग बंद करणे खूप सोपे आहे. त्यासाठी फक्त पुढील काही गोष्टी कराव्या लागतात. १. आयफोनच्या सेटिंग्जमध्ये जा २. खाली स्क्रोल करा आणि गोपनीयता आणि सुरक्षावर टॅप करा ३. नंतर लोकेशन सर्व्हिसेस पर्यायावर जा ४. तळाशी सिस्टम सर्व्हिसेस निवडा. येथे तुम्हाला नेटवर्किंग आणि वायरलेसचा पर्याय दिसेल ६. त्यावर क्लिक करा आणि टॉगल करा. कृपया हे लक्षात ठेवा ही सेटिंग बंद केल्याने तुमचा आयफोन वायफायशी कनेक्ट होण्यापासून थांबणार नाही. फरक एवढाच असेल, की आता तुमचे लोकेशन वायफाय नेटवर्कद्वारे ट्रॅक केले जाणार नाही.

# लग्न ठरत नाही...




मॅच मेकिंग

मी २९ वर्षांचा तरुण असून बँकेत चांगल्या पदावर नोकरी करतो. मी दिसायला चारचौघांसारखाच आहे. गेल्या वर्षभरापासून माझ्यासाठी वधूसंशोधन सुरू आहे. पालकांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करूनही माझं लग्न ठरत नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. विविध मॅट्रिमोनिअल साईट्सवरही नाव नोंदवलं आहे. कधी पत्रिका जुळत नाहीत तर कधी स्वभाव न जुळल्यामुळे बोलणी फिस्कटतात. मी एका सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबातला मुलगा आहे. आर्थिकदृष्ट्याही स्थिरस्थावर आहे. त्यामुळे आता लग्न करायचं आहे. पण लग्न ठरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मी खूप अस्वस्थ आहे. अनेकदा मला खूप निराश वाटतं आणि मी नियतीला दोष देत बसतो. माझ्यावर मनापासून प्रेम करणारी मुलगी कधीच मिळणार नाही, असं आता वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर :** सुयोग्य जोडीदार कधी मिळेल, हे कोणीच ठामपणे सांगू शकणार नाही. सद्यपरिस्थितीत तू स्वत:ला वेळ दे. स्वविकास करण्याचा प्रयत्न कर. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी असणं आणि सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबाचा भाग असणं या तुझ्या जमेच्या बाजू आहेत. सततच्या अपयशामुळे खचणं, नैराश्य येणं स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तू समविचारी लोकांशी संवाद साध. नव्या लोकांना भेटण्यासाठी काही ग्रुप्समध्ये सहभागी हो. लग्न ही जन्मभराची कमिटमेंट आहे. गोष्टी जुळून यायला वेळ लागतो. तू धीर सोडू नकोस. मुख्य म्हणजे उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. तुला मनासारखा जोडीदार नक्कीच मिळेल.

# जगातील दुसऱ्या क्रमांकाची भिंत

भटकंती



जगातील सर्वात लांब भिंत म्हटले, की चीनमधील 'द ग्रेट वॉल' आठवते, परंतु जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आपल्या भारतातच आहे हे अनेकांना आजवर ठाऊक नाही. ही भिंत शतकानुशतके शत्रूंपासून संपूर्ण राज्याचे रक्षण करते आहे.

राजस्थानमधील कुंभलगड किल्ल्यात जगातील दुसरी सर्वात लांब भिंत आहे. हा फक्त एक किल्ला नाही, तर शौर्य, कला आणि इतिहासाचा जिवंत पुरावा आहे. तो अजूनही अरवली टेकड्यांमध्ये अभिमानाने उभा आहे.

**भारताची 'ग्रेट वॉल'**

उदयपूरपासून सुमारे ८४ किलोमीटर अंतरावर असलेल्या अरवलीच्या टेकड्यांमध्ये असलेला हा किल्ला घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. १५ व्या शतकात महाराणा कुंभ यांनी हा किल्ला बांधला होता. त्यांनी कोणताही बाह्य आक्रमणकर्ता सहज प्रवेश करू शकणार नाही, अशा प्रकारे हा किल्ला बांधला होता. यामुळेच कुंभलगडच्या सुरक्षा भिंती इतक्या मजबूत आणि रुंद बनवल्या गेल्या, की त्याला 'भारताची ग्रेट वॉल' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**३६ किलोमीटर लांबीची भिंत**

या किल्ल्याची भिंत सुमारे ३६ किलोमीटर लांबीची आहे. ती चीनच्या 'ग्रेट वॉल' नंतर जगातील दुसरी सर्वात लांब भिंत आहे. ती इतकी रुंद आहे, की आठ घोडे एकत्र धावू शकतात. या किल्ल्याची मजबूती आणि रचना पाहता कोणत्याही शत्रूला तो जिंकणे सोपे नव्हते, याचा अंदाज लावता येतो.

कुंभलगड येथे शूर योद्धा, महाराणा प्रताप यांचा जन्म झाला. त्यांनी कधीही मुगलांकडून पराभव स्वीकारला नाही. म्हणूनच हा किल्ला केवळ एक वास्तुशिल्पाचा चमत्कार नाही, तर राजस्थानची ओळख आणि धैर्याचे प्रतीकदेखील आहे.

**कला आणि श्रद्धेचा संगम**

कुंभलगड हा केवळ एक लष्करी किल्ला नव्हता. येथे ६० हून अधिक हिंदू आणि जैन मंदिरेदेखील बांधली गेली आहेत. त्यामुळे हे ठिकाण राजकीय आणि लष्करी कारवायांचे केंद्र तर होतेच, पण धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक समृद्धीचेही केंद्र आहे. किल्ल्याच्या आत बांधलेल्या मंदिरांचे कोरीव काम आणि स्थापत्य आजही धर्म, कला आणि शक्ती एकमेकांना कसे पूरक होते, हे दाखवते. विशेष म्हणजे प्रत्येक मंदिर एका विशिष्ट उद्देशाने बांधले गेले होते. काही ध्यानांसाठी, तर काही शौर्याच्या पूजेसाठी. किल्ल्याच्या वेगवेगळ्या भागांना वेगवेगळी नावे आहेत. 'दानीवा' भाग किल्ल्याच्या पूर्वेकडील बाजूस आहे, तर 'हिराबारी' ही पश्चिमेकडे जाणारी दुसरी वाट आहे. कुंभलगड किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी सात दरवाजे तयार केलेले आहेत. प्रत्येक दगड, प्रत्येक भिंत आणि प्रत्येक दरवाजा इतिहासात दडलेले काहीतरी सांगत असतो. या किल्ल्याच्या चारही बाजूंनी रात्री मशाली पेटवल्या जातात. त्यामुळे तो रात्री उजळून निघतो. हा किल्ला आणि भिंत पाहण्यासाठी अनेक पर्यटक येथे येत असतात. म्हणूनच 'युनेस्को'च्या जागतिक वारसा यादीत याचा समावेश करण्यात आला आहे.

# करा परदेशात एलएलबी



उच्च शिक्षण

मी खर्चात परदेशातून कायद्याचे शिक्षण घेण्याची इच्छा आहे का? मग ही अत्यंत चांगली संधी आहे. अनेक देशांमध्ये कायद्याचे शिक्षण अत्यंत स्वस्त दरात दिले जाते. स्वस्त असण्यासोबतच या पदवीला जगभर मान्यतादेखील असते. त्यामुळे ही पदवी घेऊन जगभरात कुठेही वकिलीचा व्यवसाय सुरू करू शकता. जर्मनी, फ्रान्स, स्पेन आणि पोर्तुगाल हे युरोपीयन देश एलएलबीसाठी कमी ट्युशन फी आणि स्वस्त राहणीमानासाठी प्रसिद्ध आहेत. या देशांमधील सरकारी विद्यापीठांमध्ये मोफत शिक्षण दिले जाते. ज्या ठिकाणी ट्युशन फी घेतली जाते. तीदेखील अत्यंत कमी असते. त्यामुळे परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे देश उत्तम पर्याय ठरु शकतात.

भारतमध्येही कायद्याचं शिक्षण स्वस्तात मिळते. विशेषतः लहान शहरांतील खासगी महाविद्यालयांमधील एलएलबीची फी दहा हजारांपासून ते दीड लाखांपर्यंत असते. बांग्लादेश हा भारताचा शेजारी देश असून इथे एलएलबीसाठी वार्षिक ट्यूशन फी ३० हजारांपासून सुरू होते. याच देशातील काही ठिकाणी एक लाखांपर्यंत फी घेतली जाते. इथली भाषा, राहणीमान आणि संस्कृती भारतासारखीच असल्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी इथे शिक्षण घेणे सोपे ठरते. नेपाळमध्येही एलएलबीसाठी ४० हजारांपासून ते एक लाख २० हजारांपर्यंत फी आहे. दोन्ही देश भारताचे शेजारी देश आहेत. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी अधिक अनुकूल मानले जातात.

रशिया आणि तुर्कस्तानमध्येही एलएलबी शिक्षण कमी खर्चात करता येऊ शकते. मात्र या देशांमध्ये राहण्याचा किंवा इतर खर्च जीवनावश्यक खर्च जास्त आहेत. त्यामुळे इतर दोन देशांच्या तुलनेत रशिया आणि तुर्कस्तानमध्ये शिक्षणाचा खर्च थोडा जास्त असू शकतो.

# विमानात कोणते कपडे घालाल ?

फॅशन पॅशन



आपण नेहमीच फॅशनच्या किंवा आरामाच्या नावाखाली शॉर्ट्स् किंवा क्रॉप कपडे घालून बाहेर पडतो. मुली क्रॉप टॉप आणि शॉर्ट्स् घालून बाहेर पडतात आणि मुलेही शॉर्ट्स् किंवा कॅप्रीज घालून बाहेर पडतात; पण लांबच्या प्रवासात याच गोष्टी त्रासदायक ठरतात. कारण ३८ हजार फूट उंचीवर उडणाऱ्या विमानात एसी एक मिनिटही थांबू शकत नाही. अशा परिस्थितीत, एकतर व्यक्तीकडे स्वतःचे ब्लँकेट किंवा शाल असावी किंवा थंडीपासून संरक्षण करू शकतील असे कपडे असावेत. छोट्या कपड्यांमुळे प्रवासभर कुडकुडत राहावे लागू शकते.

**फ्लिप फ्लॉप्स**

फ्लिप फ्लॉप फुटवेअर आरामदायी असले, तरी अशा चपलांचा इमर्जन्सी गेटकडे जाण्यासाठी अजिबात उपयोग नाही. त्यामुळे धावताना पडू शकता आणि दिसायलादेखील अशा चपला विमानतळावर अजिबात चांगल्या दिसत नाहीत.

**पॉलिस्टर आणि सिंथेटिक कपडे**

असे कपडे कितीही चमकदार आणि ब्रँडेड दिसत असले, तरी त्यांचे कापड अजिबात योग्य नसते. फ्लाइटमध्ये एसीच्या तापमानात चढ-उतार होतो. त्यामुळे मध्येच एसी काम करत नसेल तर अशा कपड्यांमध्ये अस्वस्थ वाटू शकते. विमानाला टेकऑफ करण्यासाठी थोडा वेळ लागतो. अशा परिस्थितीत उकाड्यात बसू शकत नाही. म्हणून ब्रिदेबल म्हणजेच सुती कपडे घालणे चांगले ठरते.

आगीपासून कोणीही वाचू शकत नाही. विमान प्रवासात घट्ट कपडे घालण्याचा प्रयत्न करू नका. कारण कधी कुठेही आगीसारखी परिस्थिती उद्भवली तर सिंथेटिक कापड लवकर आग पकडतात आणि त्यात लवकर अडकू शकता. असे होऊ नये असे वाटत असेल तर असे कापड घाला, जे तुमचे आगीपासून संरक्षण करू शकतील.

**स्ट्रेचेबल किंवा ॲडजस्टेबल कपडे**

विमानात प्रवास करताना, असे कपडे घालावेत जे स्ट्रेचेबल आणि ॲडजस्टेबल असतील. कारण विमान टेकऑफ करते, तेव्हा अनेकांना पोट फुगणे, डोके जड होणे किंवा उलट्या झाल्यासारखे वाटणे या समस्या जाणवू शकतात. त्यामुळेच तुम्ही हवे तसे ॲडजस्ट करता येतील किंवा सैल असतील असे कपडे घालणे चांगले ठरते. गरज पडल्यास ते काढता येतील.

# अर्ज तरी करा

वेगळ्या वाटा



सध्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे. त्यामुळे सातत्याने नव्या संधी, नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. मात्र विद्यार्थी अशा नोकऱ्यांसाठी तयार नसतात. आपल्याकडे पुरेशी कौशल्यं नाहीत असं त्यांना वाटतं. या कारणामुळे ते अर्जही करत नाहीत. मात्र एखाद्या नोकरीसाठी शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांनीही अर्ज करायला हवेत.

सध्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांची निर्मिती होते आहे. आधी अशी पदं अस्तित्त्वात नव्हती. बदलतं तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे सगळं गणित बदलून गेलं आहे. त्यातच कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देतात. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही. सध्याच्या काळात अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. आपण प्रत्येक क्षेत्रातले तज्ज्ञ असू शकत नाही. मात्र प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण कौशल्यं विकसित करू शकतो. त्यामुळे अशा संधी साधायला काहीच हरकत नाही. किमान अर्ज तर नक्कीच करायलाच हवा. नोकरीच्या बाजारपेठेवर नजर टाकली तर ८४ टक्के कंपन्या नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यामुळे आपल्याकडे कौशल्यं नसतील तरी ती आत्मसात करता येतात. जवळपास ४२ टक्के अर्जदारांकडे नोकरीशी संबंधित कौशल्यं नसतात असं एक अहवाल सांगतो. त्यामुळे तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करून किमान मुलाखत द्यावी असं तज्ज्ञ सांगतात.

# टाळा या चुका

फिटनेस फंडा



'वॉर्म अप' आणि 'कूल डाउन' ही व्यायामाची महत्त्वाची अंग आहेत. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं. यामुळे दुखापती टाळता येतात. कूल डाउनमुळे हृदयाचे ठोके आणि श्वास पूर्वपदावर यायला मदत होते. पण अनेक जण फक्त मुख्य व्यायामावर भर देतात. वॉर्म अप आणि कूल डाउन किती महत्त्वाचं आहे हे अनेकांच्या गावीही नसतं. आपल्या काही चुकांमुळे व्यायामाचे सगळे लाभ मिळत नाहीत. व्यायामादरम्यान होणाऱ्या काही चुकांविषयी...

* धावपळीच्या दिनक्रमात वॉर्म अप टाळलं जातं. मात्र वॉर्म अपमुळे हृदयगती वाढते. स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा होतो. शरीराचं तापमान वाढतं. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं.

* काही जण झटपट वॉर्म अप उरकतात. दोन मिनिटं वॉर्म अप केलं की झालं, असं काहींना वाटतं. ही खूप मोठी चूक आहे. व्यायाम करण्याआधी ५ ते १० मिनिटं वॉर्म अप करावं.

* प्रत्येक व्यायामप्रकाराआधी वेगळं वॉर्म अप करावं लागतं. मात्र आपण एकाच पद्धतीने वॉर्म अप करत रहातो. यामुळे व्यायामाचं तंत्र बिघडतं.

* व्यायामानंतर कूल डाउन केलं नाही तर स्नायूंना त्रास होऊ शकतो. कूल डाउननंतर व्यायामामुळे झालेली शरीराची झीज भरून निघते.

* व्यायामानंतर शरीर ताणायला हवं. व्यायामादरम्यान स्नायूंमध्ये लॅक्टिक ॲसिड साचतं. यामुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. शरीर ताणल्यामुळे हा त्रास कमी होऊ शकतो. अर्थात स्ट्रेचिंगचं हे सत्र वेदनादायी नसावं. स्ट्रेचिंगमुळे त्रास होत असेल तर तज्ज्ञांची मदत घ्यावी.

* वॉर्म अपची सुरुवात धीम्या गतीने करावी. हे व्यायाम सौम्य असावेत. व्यायामाची गती हळूहळू वाढवायला हवी. अचानक तीव्र व्यायाम केला तर स्नायूंवर ताण येऊन टिश्यू फाटू शकतात.

* व्यायाम अचानक थांबवू नये. वॉर्म अपप्रमाणे कूल डाउनही धीम्या गतीने करावं. तुम्ही धावण्याचा व्यायाम करत असाल तर कूल डाउनसाठी आधी जॉगिंग करावं. मग ब्रिस्क वॉकिंगकडे वळावं आणि शेवटी हळू चालावं आणि थांबावं.

### कोकाटेंच्या राजीनाम्याची भाजप कडून मागणी

# ॲक्शन मॅन अजित पवारांनी तातडीने कारवाई करावी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :



विधिमंडळाच्या सभागृहात मोबाईलवर जंगली रमी खेळण्याचा आरोप असणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा अजित पवार यांनी राजीनामा घ्यावा, अशी मागणी भाजपचे सावनेरचे आमदार आशीष देशमुख यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना केली.

विधिमंडळाच्या सभागृहात जंगली रमी खेळताना महाराष्ट्राचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. रोहित पवार यांनी हा व्हिडिओ शेअर केल्यानंतर कोकाटे यांच्यावर तीव्र टीका होत आहे.

विरोधी पक्षांनी कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी केली असताना आता खुद्द सत्ताधारी भाजपचे आमदार आशीष देशमुख यांनीही अजित पवार यांनी कोकाटेंवर कारवाईची मागणी करून राजकीय वर्तुळात खबळ उडवून दिली आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे जंगली रमी खेळतानाचा त्यांचा व्हीडीओ व्हायरल झाल्याने त्यावर राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहे.

यासंदर्भात भाजपचे आमदार आशीष देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कृषीमंत्र्यांनी या मुद्यावर त्यांचे स्पष्टीकरण दिले आहे. यापूर्वीही त्यांनी अनेकदा शेतकऱ्यांच्या संदर्भात आक्षेपार्ह विधान केले आहे. आता जंगली रमीचा मुद्दा असेल. आता आता खुप झाले, अजित पवार यांची ओळख ॲक्शन मॅन अशी आहे, त्यांनीच त्यांच्यावर कारवाई करावी असे देशमुख म्हणाले.

## रेती तस्कराकडून पोलिसाला चिरडण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २१ :
वाळू चोरी रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसाच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रकार घडला. यामध्ये त्र्यंबक गायधने हे पोलिस कर्मचारी जखमी झाले. यात पोलीस कर्मचारी गायधने गंभीर जखमी झाले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अनेक ट्रॅक्टर जप्त केले असून आरोपी चालकाचा शोध सुरू आहे.

भंडारा जिल्ह्यातील बेलगाव फाटा येथे अंगावर ट्रॅक्टर आणल्याने पोलिस कर्मचारी जखमी झाल्याची घटना घडली. जखमी पोलिस कर्मचाऱ्याचे नाव त्र्यंबक गायधने (वय ३४) असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. रेती चोरी रोखायला- गेलेल्या पोलिसावर ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर चढवून चिरडण्याचा प्रयत्न केला. यात पोलीस कर्मचारी गायधने गंभीर जखमी झाले.

कारधा पोलिस ठाण्याचे पोलिस पथक वाळू चोरीस प्रतिबंध करण्यास गेले होते. बेलगाव फाटा येथे पोलिस कर्मचारी त्र्यंबक गायधने यांनी पळून जात असलेला ट्रॅक्टर अडविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने त्याच्या अंगावर वाहन आणले.

# केंद्रीय मंत्री गडकरी बाबा ताजुद्दीन यांच्या दर्ग्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
सूफी संत बाबा ताजुद्दीन यांचा वार्षिक ऊर्स ताजाबाद शरीफ येथे मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून दरबारी शाही संदल मंगळवारी काढण्यात येणार आहे.

संदल ताजाबादच्या बुलंदद्वार येथून निघाल्यानंतर उमरेड रोड, शीतला माता मंदिर, सक्करदरा चौक, अशोक चौकपासून महाल, इतवारी, गांधीबागच्या ज्या मार्गावरुन बाबा ताजुद्दीन आपल्या जीवनकाळात फिरले त्या मार्गाने फिरविण्यात येईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संत हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या १०३ व्या उर्सनिमित्त आयोजित उत्सवाला मोठा ताजबाग येथे रविवारी रात्री उशिरा भेट दिली. संत ताजुद्दीन बाबा यांचा आशीर्वाद घेण्यासाठी नागपुरात येतात. या परिसराचे सौंदर्यीकरण झाले, मात्र आता गोरगरीब रुग्णांच्या उपचारासाठी एक मोठे हॉस्पिटल व्हावे अशी इच्छा आहे, अशी भावना गडकरी यांनी व्यक्त केली.

हजरत बाबा ताजुद्दीन यांचा १०३ वा वार्षिक उरूस शुक्रवार १८ जुलैपासून सुरू झाला आहे. यानिमित्त ताजुद्दीन बाबांवर श्रद्धा असलेले लाखो भाविक नागपुरात आले आहे.

ताजबाग येथून मंगळवार २२ जुलैला शाही संदल निघणार आहे.



शाही संदल ज्या मार्गाने प्रस्थान करेल तो ताजबागचा रस्ता सक्करदरा चौक ते दिघोरी चौक वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केला जाणार आहे.

मिरवणुकीत वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून, या मार्गावरची सर्व प्रकारची वाहने पर्यायी मार्गावर वळवली जाणार आहेत. संदल मिरवणुकीदरम्यान तीननल चौक ते शहीद चौक एकेरी वाहतूक करण्यात येणार आहे.

या मार्गावर संदल मिरवणूक व दुचाकी वाहने सोडून इतर सर्व वाहनांना प्रवेश बंद राहील. बंद केलेल्या मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गावर वळवण्यात येत आहे.

संबंधित चौक येणारी वाहतूक ही वेळेनुसार इतरत्र पयार्यी मार्गावर वळवण्यात येईल. आवश्यकतेनुसार इतरत्र वाहतूक वळवण्याचे अधिकार वाहतूक शाखा पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त लोहित मतानी यांनी स्पष्ट केले.

### या मार्गावर वाहतूक बदल

नागपूरकडून उमरेडकडे जाणाऱ्या बसेस व इतर वाहतूक बैद्यनाथ चौक, मेडिकल चौक, क्रीडा चौक, तुकडोजी पुतळा चौक, मानेवाडा चौक, म्हाळगीनगर चौक, चामट चक्की चौक मार्गे उमरेड रोडचा वापर करतील.

उमरेड मार्गाकडून नागपूर शहरात येणारी वाहतूक दिघोरी नाका, चामट चक्की चौक डावे वळण घेऊन वळणरस्ता म्हाळगीनगर, मानेवाडा चौक, तुकडोजी पुतळा, मेडिकल, बैद्यनाथ चौक मार्गे वळवली जाईल.

बॉलीवूड सेंटरकडून चक्रधरनगर बगीचा, भांडे प्लॉट चौकाकडे जाणारी वाहतूक बंद करून ती छोटा ताजबाग चौक, सक्करदरा चौक, तिरंगा चौक, गुरुदेव नगर चौक मार्गे वाहतूक वळवली जाईल.

गुरुदेवनगर चौकतून भांडे प्लॉट चौकाकडे जाणारी वाहतूक तिरंगा चौक, सक्करदरा चौक, छोटा ताजबाग मार्ग जातील.

## : हॅलो डॉक्टर :



## डोळ्यांचे विकार आणि उपचार

लोकारोग्य

मानवी शरीराचा सर्वात नाजूक अवयव म्हणजे आपले डोळे.याच डोळ्यांनी आपण सा?्या सृष्टीचं दर्शन घेतो. किंबहुना मनुष्य डोळस असेल तरच त्याच जगणं सहजसाध्य असत,म्हणूनच आपले डोळे हे आपला अनमोल असा ठेवा आहेत.परंतु अनेकदा काही कारणांमुळे डोळ्यांचे आजार उद्भवतात.

अनेकांना दूरच किंवा जवळच न दिसू लागल्याने डोळ्यावर चष्मा देखील लागतो. काहींचे डोळे अकाली अंधुक होतात किंवा डोळ्यांमध्ये तिरळेपणा येतो. मुळातच डोळ्यांचे हे आजार नेमके कोणते असतात? आणि आपल्या डोळ्यांची काळजी नेमकी कशी घ्यायला हवी? डोळ्यांच्या आजारावर उपचार कोणते आहेत? यासंदर्भात नेत्रविकार तज्ञ डॉ. अभिजित भोंजाळ यांच्याशी साधलेला संवाद.

**डोळ्यांचे आरोग्य जपायचे म्हणजे काय?**

■ डोळ्यांच्या आरोग्याच्या बाबतीत अनेक लोकांचा गैरसमज हा असतो कि डोळ्यांमध्ये गुलाबपाणी टाकले किंवा एखादे औषध टाकले कि आपण डोळ्यांची योग्य काळजी घेतो. परंतु हे चुकीचे आहे.आपल्या सभोवताली जे वातावरण आहे ते प्रदूषित आहे.

याच वातावरणातील घाण डोळ्यात जाऊ नये म्हणून रोज सकाळ संध्याकाळ आपले डोळे हे थंड पाण्याने धुवायला हवेत. आपले डोळे हे चष्मावाल्याकडे नव्हे तर डोळ्यांच्या डॉक्टारांकडे जाऊन वेळच्यावेळी तपासायला हवेत. तसेच आपल्या डोळ्यांच्या सुधृढ आरोग्यासाठी आपल्या आहारात अ जीवनसत्वाची अत्यंत आवश्यकता असते. हे अ जीवनसत्व आपल्याला गाजर, पपई आणि हिरव्या पालेभाज्यांमधून मिळत म्हणूनच आपल्या आहारात या पालेभाजा आणि गाजर व पपईचा समावेश असायला हवा. यामुळेच डोळ्यांचं आरोग्य हे सुदृढ राहत.

**लहान मुलांच्या बाबतीत डोळ्यांची काळजी नेमकी कशी घ्यायला हवी?**

■ लहान मुलं जेंव्हा जन्माला येत त्यानंतर साधारणपणे ३ दिवसानंतर त्याला दिसायला लागत. हळूहळू रंगांची ओळख देखील होऊ लागते. पहिल्या ३ महिन्यात जर मुलाला अंधत्व असेल असं कळलं तर वेळीच उपचार सुरु करायला हवेत त्याच्या डोळ्यांची तपासणी करणे गरजेचं असत. शिवाय मुलाच्या डोळ्यांना दुखापत होऊ नये म्हणून देखील पालकांनी जपायला हवं.

लहान मुलांना चष्मा फार लवकर लागतो त्यांच्या डोळ्यांमध्ये तिरळेपणा येतो अनेकदा जन्मतः मुलाला काही आजार असतात त्याचा देखील डोळ्यांवर परिणाम होतो. लहान मुलांना ६ वर्षापर्यंत मोबाईल हातात देऊ नये कारण मोबाईलचा प्रकाश डोळ्यात गेल्याने डोळ्याची बाहुली आकुंचन पावते हे फार घातक असते. याशिवाय डोळ्यात काजळ घालणे,सुरमा घालणे असे अघोरी प्रकार करू नयेत त्यामुळे डोळ्यांना इजा पोहचू शकते.

**डोळ्यांची जळजळ होणे, काम करताना झोप आल्यासारखे वाटणे यावर उपचार काय?**

■ आपल्या डोळ्यात जर कोरडेपणा असेल तर अचानक डोळे लाल झाल्यासारखे वाटतात आणि डोळ्यांना थकवा आल्याने डोळे जळजळतात. याकरिता मेडिकल मध्ये आर्टिफिशिअल टियर्स किंवा रिफ्रेश टियर्स यासारखी औषध मिळतात हे औषध सकाळ दुपार संध्याकाळ डोळ्यांमध्ये घालावं आणि सकाळ संध्याकाळ डोळे थंड पाण्याने धुवावेत व डोळ्यांना आराम द्यावा.

**काम्पुटरचा किंवा मोबाईलचा डोळ्यावर थेट दुष्परिणाम होतो का?**

■ हल्लीच युग कम्युटर चे असल्याने कम्युटर वर काम करणे अपरिहार्य आहे. परंतु आपण कम्युटर समोर बसताना

कम्युटर आपल्या डोळ्यांपेक्षा २ ते ३ इंच खाली असेल असं बसावं जेणेकरून आपल्या डोळ्यांच्या भोवती जे पापण्यांचे आवरण असते त्यावर ताण पडत नाही. कम्युटर समोर सलग बसून काम न करता मध्ये ५ मिनिट ब्रेक घेऊन फिरून यावं आणि नंतर काम करावं. सतत कम्युटर समोर बसून काम केल्याने आपल्या डोळ्यांची बाहुली आकुंचन पावते त्यासाठी आपल्या डोळ्यावर दोन्ही हात ठेऊन १ मिनिट दाबून धरावेत त्यामुळे डोळ्याची बाहुली प्रसरण पावते.शिवाय डोळ्यांमध्ये आर्टिफिशील टियर्स टाकावेत मोबाईल वापरताना तो लाईट मध्ये वापरावा ज्यामुळे डोळ्यांना ताण पडणार नाही लाईट बंद करून अंधारात मोबाईल वापरल्याने मोबाईलचे लाईट थेट डोळ्यात जाऊन डोळ्यांना इजा पोहचते .

यासाठी कम्युटर समोर बसताना कम्युटरच्या पाठच्या बाजूला लाईट लावूंन काम करावं. त्यामुळे लाईट थेट आपल्या डोळ्यांमध्ये जात नाही.

**डोळ्यावर लागलेला चष्मा कालांतराने जातो का? त्यासाठी उपचार काय आहेत?**

■ डोळ्यावर चष्मा लागल्यानंतर अनेकजण नंबर कमी व्हावा आणि चष्मा कायमचा जावा याकरिता आयुर्वेदिक औषध घेत असतात. परंतु हे चुकीचे आहे आपल्या डोळ्यांची लांबी वाढल्याने किंवा बुबुळ वाकडीतिकडी झाल्याने चष्म्याचा नंबर लागतो जो कोणत्याही आयुर्वेदिक औषधाने जात नाही. मात्र लेसर किरणने शस्त्रक्रिया करून चष्मा काढून टाकता येतो.

■ ■ ■

### गुणकारी गुळवेल

गुळवेल एक वेलवर्गीय वनस्पती आहे. साधारणपणे ही मोकळं मैदान, रस्त्याच्या कडेला, जंगल, उपवन, बागा, झाडीझाडोऱ्यात तसंच भिंतीवरही उगवून येते. ज्या रुग्णांना टाईप-२ प्रकारचा मधुमेह आहे त्यांनी गुळवेलीच्या रसाचं नियमित सेवन केल्याने खूप प्रमाणात लाभ मिळू शकतो. गुळवेलीत पुष्कळ



प्रमाणात हायपोग्लेमिक एजंट असतात, ज्यांमुळे रक्तशर्करेवर नियंत्रण ठेवायला मदत मिळते. यूमेटाइड आर्थराइटिस याला मराठीमध्ये आमवातीय संधिशोथ म्हणतात. हा एक प्रकारचा ऑटो इम्यून आजार आहे.

गुळवेलीच्या रसाचे नियमितपणे सेवन केल्याने रयूमेटाइड आर्थराइटिसचे कित्येक रुग्ण लवकर बरे होताना दिसतात. गुळवेलीत अ‍ॅन्टी ऑर्थराइटिक आणि अ‍ॅन्टी इंफ्लेमेट्री गुण आढळून येतात. कोणी व्यक्ती जर वारंवार आजारी पडत असेल तर त्याचे मुख्य कारण मंदावलेली रोगप्रतिकार क्षमता हे असू शकते. ह्या समस्येच्या उपचाराकडे ताबडतोब लक्ष पुरवलं पाहिजे. शरीराला अपायकारक ठरणाऱ्या फ्री रॅडिकल्सशी लढून इम्यूनिटी वाढवता येणं शक्य आहे.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

### कुपोषित घटकांसाठी कार्यरत निरामय फाउंडेशनची रौप्य महोत्सवी वाटचाल

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील आणि आदिवासी पाड्यातील कुपोषित माता आणि मुलांच्या विकासासाठी त्यांच्या निरामय आरोग्यासाठी काम करण्याच्या उद्देशाने 25 वर्षापूर्वी डॉ.जानकी देसाई यांनी ज्या निरामय हेल्थ फाऊंडेशनचे य सामाजिक संस्थेची



स्थापना केली होती त्याच निरामय हेल्थ फाऊंडेशनची रौप्य महोत्सवी वाटचाल सध्या सुरू झाली असून हेच औचित्य साधून निरामया हेल्थ फाऊंडेशनने मुंबईत माटुंगा येथे पायनियर हॉलमध्ये एनजीओ मीटचे आयोजन केले होते. या अर्धदिवसीय कार्यक्रमामध्ये मुंबई तसेच आजूबाजूच्या शहरांतील ४० हून अधिक स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या. या कार्यक्रमाचा उद्देश जीवनचक्राच्या विविध टप्प्यांवर आहाराचा आरोग्य आणि एकूण कल्याणावर होणारा परिणाम, एनजीओंना भेडसावणाऱ्या सामान्य अडचणी, शाश्वत विकासासाठी शासन आणि एनजीओ यांच्यातील भागीदारीच्या रणनीती, तसेच क्षयरोगावरील नवीन हस्तक्षेप यावर चर्चा करणे हा होता.

कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून डॉ. दक्षा शाह (कार्यकारी आरोग्य अधिकारी, महापालिका) उपस्थित होते.

यावेळी मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. प्रसन्ना पाटील , डॉ. नेहा नलवडे (डब्ल्यूएचओ सल्लागार), डॉ. अल्का जाधव (बालरोगतज्ज्ञ), डॉ. सफला श्रॉफ (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. विनया वैशंपायन (प्रमुख, बीएमएन महाविद्यालय) आणि डॉ. वीणा यार्डी (पोषणतज्ज्ञ) यांचा समावेश होता. त्यांनी आपले अनुभव आणि अभ्याससिद्ध माहिती सहभागी संस्थांसोबत शेअर केली. निरामया हेल्थ फाउंडेशनच्या मानद संचालिका सौ. शुभलक्ष्मी पटवर्धन यांनी संस्थेच्या २५ वर्षांच्या उल्लेखनीय कार्ययात्रेची माहिती दिली आणि समाजातील वंचित घटकांसाठी आरोग्य व पोषण क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेतला. ■

# पीओपी मूर्तीवरील बंदी उठल्यानंतर नवी समस्या २३ ला जाहीर होणार विसर्जन धोरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
पर्यावरणवादी कार्यकर्ते डॉ. विजय घुगे व संजयजी सराफ यांच्या संकल्पनेतून "पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२५ व आपली भूमिका' या विषयावर नागपूर महानगरातील विविध स्वयंसेवी संस्थांची ओनलाईन बैठक घेण्यात आली.

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार हे बुधवार २३ रोजी पीओपी मूर्ती विसर्जनाचे धोरण जाहीर करणार आहे. तत्पूर्वी त्यांना निवेदन देण्याचे ठरल्याची माहिती घुगे यांनी दिली. १९९७ पासून शहरातील विविध संघटना-व्यक्तींना सोबत घेऊन पर्यावरणपूरक उत्सवाच्या चळवळीला सुरवात केली. होळी, दिवाळी, गणेशोत्सव ई. त्याला बऱ्यापैकी यशही आले.

१५ वर्षांपासून नागपूर जिल्हा पीओपी मूर्ती कारखाना मुक्त झाला. या चळवळीत सुरेश पाठक यांच्या हस्तशिल्पी बहुद्देशीय संस्थेने बहुमूल्य भूमिका पार पाडली व अजूनही या दिशेने सर्व पातळीवर त्यांचे मार्गक्रमण सुरु आहे. परंतु ९ जुलैच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाने पीओपीवरील बंदी उठवण्यात आल्याने १५ वर्षांपूर्वीची परिस्थिती व समस्या निर्माण झाली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी शेलार यांना निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सुरेश पाठक यांनी या चळवळीची संक्षिप्त पार्श्वभूमी स्पष्ट केली. २००२ पासून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या मोहिमेची विविध उपक्रमाच्या माध्यमातून सुरूवात केली. तत्कालिन महापौर अनिल सोले यांच्या कार्यकाळात २०११ ला पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी अधिसूचना तयार केली. २०१३ ला नगरविकास मंत्रालयाने मंजुरी प्रदान केली असे पाठक यांनी सांगितले. पीओपी समर्थकांचे लाड पूरविण्याच्या हेतूने आपला इगो जपण्यासाठी राज्यसरकार पुरस्कृत, राजकीय हेतूने प्रेरित गणेशोत्सवामुळे धर्म, संस्कृती, पर्यावरण, कला व रोजगाराची समस्या ऐरणीवर आल्याची टिका पाठक, घुगे, सराफ यांनी केली आहे.

अभिषेक गावंडे यांनी प्रदुषण टाळण्यासाठी प्रत्येकाने घरी वैयक्तिक पितळेची मूर्ती स्थापना करावी, अशी सूचना केली. प्रफुल्ल टापले यांनी पीओपी मूर्ती मार्केटमध्ये येऊ न देणे, त्यांची आयात थांबविणे व अन्य सूचना केल्या.

## अंध दिव्यांग विशेष शिक्षकांवर आंदोलनाची पाळी

### राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातील वास्तव

■ महासागर प्रतिनिधी, आर्वी/वर्धा, दि. २१ :
सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाने ८ आक्टोंबर २०२४ ला निर्गमीत केलेल्या आदेशान्वये शासकीय सेवेत नियमित तत्वावर समायोजीत करण्यात आलेल्या अंधदिव्यांग विशेष शिक्षकांची नियुक्ती न झाल्यामुळे त्यांचेवर आंदोलन करण्याची पाळी आली आहे. त्यांनी वर्धा जिल्हा परिषद कार्यालया समोर बुधवार (ता.३०) पासुन आमरण उपोषण करण्याचे निश्चत केले असुन वर्धा जिल्ह्याचे पालक मंत्री तथा शालेय शिक्षण मंत्री पंकज भोयर यांच्या जिल्ह्यातील अंध दिव्यांगावर होत असलेल्या या अन्यायामुळे जन सामान्यात आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

२०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचीकेवर दिलेल्या निर्देशानुसार अंध दिव्यांग विध्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समग्र शिक्षा (पुवीर्ची सर्व शिक्षा अभियान) अंतर्गत समावेशीत शिक्षण उपक्रमा मध्ये गत १४ ते २० वर्षा पासुन कार्यरत असलेल्या विशेष शिक्षकांचे शासनाने ८ आक्टोंबर २०२४ ला शासन सेवेत नियमीत तत्वावर समायोजन करुन घेतले आहे. ?

ासेच महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सच्छींद्र प्रतापसिंह यांनी ११ जुन ला वर्धा जिल्हा परिषदेला पत्र पाठवुन त्यांना समायोजीत करण्याचे स्पष्ट आदेश दिले. याला तब्बल ४० दिवस झाले मात्र वर्धा जिल्हा परिषदेचे प्रशासनाने नियुक्तीची कार्यवाही केली नाही. तर दुसरीकडे वारंवार चकरा मारल्या नंतर सुध्दा काहीच माहिती मिळत नाही. संतप्त अंध दिव्यांग विशेष शिक्षकांनी आंदोलनाची भुमीका घेतली आहे.

जर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व राज्याच्या शिक्षण आयुक्तांच्या आदेशानुसार मंगळवार (ता.२९) पर्यंत वर्धा जिल्हा परिषद प्रशासनाने विशेष शिक्षकांचे समायोजन केले नाही तर, बुधवार (ता.३०) पासुन आमरण उपोषणाच्या माध्यमातुन आंदोलन करण्यात येईल. यात काही अप्रीय घटना घडली तर याला अधिकारी जबाबदार राहिल अशी माहिती राष्ट्रीय दृष्टिहीन महाराष्ट्र राज्य संघटनेचे महासचिव गजानन राठोड यांनी दिली आहे.

वर्धेचं आमदार पंकज भोयर हे राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री असुन वर्धा जिल्ह्याचे पालक मंत्री सुध्दा आहेत. या समस्यकडे ते जातीने लक्ष पुरवणार काय? असा प्रश्न विचारलाजात आहे.

## छावा संघटनेची लातूर बंदची हाक

■ वृत्तसंस्था, लातूर, दि. २१ :
छावा संघटनेने रविवारी लातूर येथे संताप व्यक्त करत पत्ते उधळले. त्यानंतर सुरज चव्हाण यांच्यासह कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली. याचे पडसाद म्हणून छावा संघटनेने मंगळवारी लातूर बंदची हाक दिली आहे.

## आरोग्य व्यवस्था कोलमडली !

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २१ :
परिचारिकांना केंद्रानुसार भत्ता देण्यासोबतच अन्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्य परिचारिका संघटनेने आंदोलन छेडले आहे. दोन दिवसाचे धरणे आणि त्यानंतर एक दिवशीय लक्षवेधी आंदोलनाची दखल घेतल्या गेली नाही. त्यामुळे नाईलाजाने संघटनेला बेमुदत संप पुकारावे लागले अशी माहिती राज्य परिचारिका संघटनेच्या अध्यक्ष संगीता राठोड यांनी दिली.

परिचारिकांच्या विविध मागण्या प्रलंबित आहे. यावर ठोस पाऊले उचलली जावी यासाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने राज्यव्यापी कामबंद आंदोलन सुरु केले आहे.पाठ्यनिर्देशिका या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन त्रुटी निवारण करावे, राज्यातील परिचारिकांना केंद्राप्रमाणे नर्सिंग भत्ता सात हजार २०० रुपये मंजूर करावा, पात्र परिचारिकांना शैक्षणिक भत्ते मंजूर करावे, केंद्राप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामामध्ये बदल करावा, यासह अन्य मागण्यांसाठी आंदोलन सुरू आहे.



नागपूर
महासागर
वृत्तसागर
मंगळवार, दि. २२, जुलै २०२५

# पैशांच्या वादातून पत्नीवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

उसणे दिलेल्या पैशांवरून झालेल्या वादात पतीने आपल्या पत्नीवरच तीक्ष्ण शस्त्रांनी हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना नंदनवन ठाण्यांतर्गत हसनबाग परिसरात घडली. रेशमा समशेर शेख (32) असे जखमी महिलेचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी पती समशेर रमजान शेख (33) याला अटक केली आहे.

गत 6 महिन्यांपूर्वी समशेर याने घर बनविण्यासाठी रेशमाच्या बहिणीला 5 लाख रुपये उसणे दिले होते.

लवकरच पैसे परत करण्याचे आश्वासन मिळाले होते. मात्र समशेरला पैसे परत मिळाले नाही. त्यामुळे समशेर रेशमावर बहिणीकडून पैसे आणण्यासाठी दबाव टाकत होता. विरोध केल्यास मारहाण करीत होता. रविवारीही समशेरने रेशमाला शिविगाळ करीत वाद घातला. बहिणीकडे जाऊन पैसे आणण्यास सांगितले. यावरून दोघांमध्ये वाद झाला. हा वाद बराच वेळपर्यंत सुरू होता. या दरम्यान संतापलेल्या समशेरने घरीच ठेवलेला नारळ कापण्याचा तीक्ष्ण चाकू उचलून रेशमाच्या डोक्यावर मारला.

डोके फुटून रक्ताची धार लागली. नातेवाईकांनी रेशमाला उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती केले. रेशमाचा भाऊ जुबेर गुलाम शेखच्या तक्रारीवरून पोलिसांनी समशेरविरुद्ध खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

## सामाजिक प्रगल्भतेसाठी कलेला राजाश्रयाची आवश्यकता

# डॉ. वेद प्रकाश मिश्रा यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

कला ही व्यक्तिगत संपदा नाही किंवा छंद, संगोपन, संयोजन नाही तर ती एक जीवनाची साधना आहे. या कलेला प्रतिष्ठा मिळण्यासाठी कलेला दिला जाणारा राजाश्रय कलाकाराची आवश्यकता नाही तर समाजाच्या अंतर्गत प्रगल्भतेसाठी सामाजिक आवश्यकता आहे असे प्रतिपादन कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे प्रमुख सल्लागार व प्रख्यात वक्ते डॉ. वेद प्रकाश मिश्रा यांनी केले.



औचित्य होते बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित स्नेहलता दिगंबर मनोहर धीरोदत्त पुरस्कार व स्वर्गीय दिगंबर मनोहर कला सर्जन पुरस्काराच्या वितरणाचे. या वेळेचा स्नेहलता दिगंबर मनोहर धीरोदत्त पुरस्कार अनाथ व मतिमंद मुले व वृद्ध यांच्यासाठी उभे आयुष्य खर्ची करणाऱ्या सविता बेदरकर व स्वर्गीय दिगंबर मनोहर कला सर्जन पुरस्कार आपल्या लेखनातून व कुंचल्यातून आजच्या परिस्थितीचे चित्रण करणारे सुनील यावलीकर यांना डॉक्टर वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पंचवीस हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व मानवस्त्र हे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी मंचावर नागपूर विभागाचे विभागीय माहिती आयुक्त गजानन निमदेव अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर व सभागृहात डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते.

डॉ. वेद प्रकाश मिश्रा पुढे म्हणाले की समाज हा यंत्रगत व भौतिक अशा सोळा आयामांतून प्रगत होतो. समाजाच्या केवळ प्रगतीतून समाज निर्गमित होत नाही तर कला व संस्कृतीच्या उन्नतीतून तो प्रगल्भित होत असतो. कलाकाराची होणारी उपेक्षा ही सामाजिक उदासीनता संवेदन शून्यता व विवेक शून्यतेचा परिणाम आहे. आणि याची किंमत समाजाला चुकवावी लागेल. यावेळी गजानन निमदेव म्हणाले की राजाश्रयातून कलाकार कृत्रिमरित्या उन्नत होतो तर लोकाश्रम व रसिकाश्रयातून नैसर्गिकरित्या मोठा होतो. आणि आजच्या दोन्ही सत्कारमूर्तींना राजाश्रय व रसिकाश्रय प्राप्त झाला आहे. माध्यमांनी आपल्या लेखणीतून कोणाची बदनामी करणारे वृत्त छापू नये तर एखाद्याला मोठे सुद्धा करावे. यावेळी सविता बेदरकर म्हणाले की माझ्या पतीला नक्षल समर्थक म्हणून घोषित केल्यानंतर त्यांना तुरुंगात जावे लागले व मला सामाजिक प्रताडनेतून समाजाच्या जेलमध्ये जीवन व्यतीत करावे लागले. या सामाजिक संघषार्ला मी ठामपणे सामोरे जात माझे जीवन मी अनाथ व वृद्धांना आश्रय देण्यात व्यतीत करत आहे. यावेळी सुनील यावलीकर यांनी मनोगत व्यक्त केले की एखाद्या कलाकाराची कला किती किमतीत विकल्या जाते यातून तो मोठा होत नाही. पिकासो, वासुदेव गायतोंडे यांसारखे कलाकार अतिशय दरिद्री जीवन जगले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वाती हुद्दार, संचालन रेखा दंडीगे घीया व आभार श्रीराम काळे यांनी मानले.

# आज सफाई कर्मचारी महोत्सव

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

सफाई कर्मचाऱ्यांना सामाजिक प्रवाहामध्ये आणून त्यांना सुरक्षित व चांगले जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देणे, त्यांचे जीवनमान योग्यरित्या चांगले करणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या विविध शासकीय योजना जनतेपर्यंत कशा पोहोचतील आणि त्या योजनांव्दारे सफाई कर्मचा-यांचा विकास होईल या दृष्टीने "सफाई कर्मचारी महोत्सवाचे" आयोजन २२ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पाटीदार समाज सभागृह, खन्ना बिल्डिंग, रामबाग, सरदार पटेल चौकाजवळ, इमामवाडा येथे करण्यात आले आहे.

शेरसिंग डागोर, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सफाई कर्मचारी महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्हयातील लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहे.

सफाई कर्मचारी महोत्सवानिमित्त विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचे स्टॉल लावण्यात येणार आहे. त्यात जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र, उपविभागीय अधिकारी (शहर), उपविभागीय अधिकारी (ग्रामीण), तहसिलदार, संजय गांधी निराधार योजना नागपूर, तहसीलदार (ग्रामीण), जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, नागपूर, इतर मागास बहुजन कल्याण, नागपूर, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), नागपूर, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती) नागपूर अशा विविध विभागाच्या योजनांचे स्टॉल लावण्यात येणार आहे.

या स्टॉलवर योजनांची माहिती तसेच अजार्चे नमुने, आवश्यक कागदपत्रांची सूची, अर्ज कशाप्रकारे करावा यासबंधी माहिती एकाच ठिकाणी जनतेला उपलब्ध होणार आहे व विद्यार्थी व जनतेच्या वेळेची बचत होणार आहे.

तरी नागरिकांनी सफाई कर्मचारी महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

# गुंतवणुकीच्या नावावर ७.३४ लाखांचा चुना

## फसवणुकीचा आकडा ५० लाखांवर

आतापर्यंत संगीताकडे पैसे जमा करणाऱ्या 19 महिला पुढे आल्या आहेत. या सर्व महिलांचे एकूण 7 लाख 34 हजार रुपये संगीताकडे आहेत. एकता यांच्या तक्रारीनुसार, संगीताने कमितकमी 60 जणांना जाळ्यात अडकविले होते. यानुसार फसवणुकीचा आकडा 50 लाखावर आहे. पोलिसांनी संगीता विरुद्ध फसवणूक आणि एमपीआयडी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून तिचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणात आणखी पीडित पुढे येण्याची शक्यता आहे.

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

महिलांना गुंतवणुकीवर बक्कळ नफ्याचे दाखवून फसवणूक करणाऱ्या महिलेविरुद्ध मानकापूर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. आरोपी महिलेच्या आमिषाला बळी पडून अनेकांनी तिच्याकडे पैसे गुंतविले होते. मात्र ना कोणाला नफा मिळाला आणि ना गुंतवलेली रक्कम परत मिळाली. आरोपी महिला कुटुंबासह फरार झाली असून पोलिस तिचा शोध घेत आहेत. संगीता शैलेंद्र बडगैया (43) रा. गायत्रीनगर, झिंगाबाई टाकळी असे आरोपी महिलेचे नाव आहे.

फियार्दी एकता अनिरुद्ध टेकाडे (35) आणि आरोपी संगीता एकाच परिसरात राहतात. 2022 मध्ये संगीताने परिसरातील महिलांची एक बैठक बोलावली होती. या बैठकीत तिने तिच्या साईकृपा फंड योजनेबाबत लोकांना सांगितले होते. एक वर्षापर्यंत निश्चित रक्कम जमा केल्यास दोन महिन्यांची अधिकची रक्कम नफ्यासह देण्याची बतावणी केली होती. या आमिषाला बळी पडून एकता यांच्यासह अनेक महिलांनी तिच्याकडे पैसे जमा करण्यास सुरूवात केली. सुरूवातीला तिने दिलेल्या आश्वासनानुसार पैसेही परत केले.

एकता यांनी ऑक्टोबर 2024 ते जुलै 2025 पर्यंत तिच्याकडे एकूण 35 हजार रुपये जमा केले. केवळ दोन महिन्यांचा हप्ता शिल्लक होता. या दरम्यान 14 जुलैला संगीताकडे पैसे जमा करणाऱ्या महिलांपैकी एक महिला एकता यांच्याकडे आली. तिने सांगितले की, दोन दिवसांपासून संगीताच्या घराला कुलूप असून तिच्याबाबत कोणाकडे कुठलीही माहिती नाही. संगीताच्याच नातेवाईकांनी तिच्या घराचे कुलूप तोडले असता घर रिकामे होते. संगीता ही पती, मुलगा आणि सामानासह गायब झाली होती. तिचा फोनही बंद होता. यावरून संगीता सर्व गुंतवणूकदारांचे पैसे घेऊन फरार झाल्याचे स्पष्ट झाले.

# झुडपी जंगलाबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

झुडपी जंगलाबाबत सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर झुडपी जंगलाखालील जमीनीच्या स्थितीबाबत माहिती जाणून घेण्यासाठी आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्यासह नागपूर विभागातील जिल्हाधिकाऱ्यांची बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी यावेळी सादरीकरण करून झुडपी जंगला विषयी सविस्तर माहिती दिली.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर येत्या काळात सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशांचे पालन करून झुडपी जंगलाच्या जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकुल होण्यासाठी गतीने कार्यवाही करण्यासह महत्वाचे निर्देश दिले. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी नरेश झुरमुरे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, विभागीय आयुक्तालयातील महसूल अपर आयुक्त राजेश खवले यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोलीचे जिल्हाधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे याबैठकीस उपस्थित होते.

# शस्त्रासह दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

पाचपावली पोलिसांनी गस्ती दरम्यान ठाण्यांतर्गत शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालत असलेल्या दोन गुंडांना अटक केली. निखिल राजेश नंदेश्वर (20) रा. बारसेनगर आणि अनूप देवा वाकडे (19) रा. लष्करीबाग, पसीयारीपुरा अशी अटकेतील गुंडांची नावे आहेत.

सोमवारी सकाळी 8.40 वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांचे पथक वैशालीनगर परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान परिसरातील आंबेडकर उद्यानामागे एक गुंड शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस तेथे पोहोचले असता निखिल हातात चाकू घेऊन धामधुम करीत होता. पोलिसांनी घेराबंदी करून निखिलला पकडले आणि चाकू जप्त केला. पोलिस निखिलला घेऊन कोलकाता रेल्वे लाईन मार्गे ठाण्यात जात असताना अनूप संशयास्पदरित्या जाताना दिसला. पोलिस त्याची चौकशी करणार तोच त्याने तेथून पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ एक फोल्डिंग चाकू मिळाला. तो काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे फिरत असल्याचा संशय पोलिसांना आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली.

# शरीफ टोळीविरुद्ध १३,०४८ पानांचे आरोपपत्र

## सदर पोलिसांनी नोंदविले होते प्रकरण

तसेच, गटशिक्षणाधिकारी कवडू दुर्गा यांच्या तक्रारीवरून सदर पोलिसांनी हेडाऊ, बुवाडे यांच्याविरुद्ध सरकारची दिशाभूल आणि फसवणूक केल्याबद्दल गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली. निरीक्षक मनीष ठाकरे आणि त्यांच्या पथकाने या प्रकरणाच्या तपासात भक्कम पुरावे गोळा केले. या रॅकेटचा सूत्रधार आणि प्रमुख आरटीई कार्यकर्ते शाहिद शरीफ असल्याचे निष्पन्न झाले, जो गुन्हा दाखल झाल्यापासून फरार आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध लूकआउट नोटीस जारी केली आहे. सदर प्रकरणातील आरोपींविरुद्ध केलेल्या तपासात पोलिसांनी पुरेसे पुरावे, कागदोपत्री पुरावे आणि तांत्रिक पुरावे गोळा केले आहेत. त्यामुळे पुरावे सादर करण्यासाठी आणि आरोपींना न्यायालयात उभे करण्यासाठी, एकूण 13,048 पानांचे आरोपपत्र तयार करून दाखल करण्यात आले आहे.

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

बनावट कागदपत्रांच्या आधारे शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत मुलांना दिल्या जाणाऱ्या मोफत शिक्षणात श्रीमंत कुटुंबातील मुलांना प्रवेश मिळवून देणाऱ्या शाहिद शरीफ टोळीविरुद्ध सदर पोलिसांनी तपास पूर्ण केला आहे. पोलिसांनी एकूण 9 आरोपींविरुद्ध 13048 पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. आरोपपत्रात प्रशांत हेडाऊ, राजेश बुवाडे, राजा जमशेद शरीफ, रुपाली धमगाये उर्फ रुख्सार सय्यद, रोहित पिल्ले, शुभम बुटे, अनिल मेश्राम, मंगेश झोटिंग आणि प्रदीप भांगेचा समावेश आहे.

सरकारने सुरू केलेल्या आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रियेत वरील आरोपींनी गैरप्रकार केला. आरटीई अंतर्गत पालकांची निवड झाल्यानंतर, सदर पालकांनी त्यांच्या मुलांच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे गट संसाधन केंद्र पंचायत समिती, नागपूर येथे सादर केली. प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या संचालकांनी 20 जानेवारी 2023 रोजी दिलेल्या आदेशानुसार, तालुका पडताळणी समितीमार्फत कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज क्रमांकाची माहिती देण्यात आली. चौकशीदरम्यान, पडताळणी समितीला असे आढळून आले की पालक प्रशांत हेडाऊ यांनी वेळाहरी परिसरातील पोद्दार शाळेत बनावट निवास प्रमाणपत्र सादर केले होते आणि राजेश बुवाडे यांनी ऑनलाइन अर्ज क्रमांक 23NG039949 मध्ये नागपूर येथील रॉयल गोंडवाना पब्लिक स्कूलमध्ये बनावट निवास प्रमाणपत्र सादर केले होते. तालुका पडताळणी समितीने नमूद पालकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली आणि मुलांचा प्रवेश तात्काळ रद्द केला.

वरील गुन्ह्याच्या तपासादरम्यान, पोलिसांना माहिती मिळाली की शाहिद आणि त्याचा भाऊ राजा शरीफ यांनी त्यांच्या घरी घातक शस्त्रे ठेवली आहेत. त्यांच्याविरुद्ध गिट्टीखदान पोलिस ठाण्यात शस्त्रास्त्र कायद्यासह विविध कलमांखाली दोन गुन्हे दाखल करण्यात आले.

# बाबा ताजुद्दीन यांचे शाही संदल

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

सूफी संत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या १०३ व्या वार्षिक उर्सच्या २६ व्या शरीफ निमित्त, २२ जुलै २०२५ रोजी शाही दरबारी संदल काढण्यात येईल. शाही दरबारी संदल हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून सकाळी १० वा. निघेल. संदल निघण्यापूर्वी, ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकर, विश्वस्त फारूखभाई बावला, हाजी इम्रान खान



ताजी, गजेंद्रपाल सिंह लोहिया, मुस्तफाभाई टोपीवाला यांच्या उपस्थितीत दस्तरबंदीचा पारंपारिक विधी हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या सन्मानार्थ मेहफिल शमा आयोजित केली जाईल.

# श्रीमद् भगवत गीता : एक चिकित्सा

## संपादक व विचारवंत सुरेश द्वादशीवर यांचे व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

वनराई फाउंडेशन व राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.गिरीश गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीमद् भगवत गीता : एक चिकित्सा या व्याख्यानाचे आयोजन आज 22 जुलै ला सायंकाळी 5:30 वाजता वसंतराव नाईक सभागृह वनामती धरमपेठ येथे आयोजित केले आहे. ज्येष्ठ संपादक व विचारवंत प्राध्यापक सुरेश द्वादशीवर वक्ते म्हणून लाभणार आहेत.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने साहित्यप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आलेले आहे.

# मंडल रेल प्रबंधक दीपक कुमार गुप्ता यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

मोतीबाग रेल्वे कॉलनीमध्ये सुमारे 200 वर्षांपूर्वी भोसले काळात बांधण्यात आलेल्या ऐतिहासिक विहिरीची स्वच्छता यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. या महत्त्वपूर्ण कायासाठी दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागाचे मंडल रेल प्रबंधक दीपक कुमार गुप्ता यांची मोलाची भूमिका राहिली. त्यांच्या मार्गदर्शनाने आणि पुढाकारामुळे अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेली ही ऐतिहासिक विहीर पुन्हा आपल्या वैभवशाली रूपात परत आली आहे.



या योगदानाबद्दल माजी ZRUCC सदस्य, ज्येष्ठ पत्रकार, नियोग थेरपिस्ट आणि सामाजिक कार्यकर्ता डॉ. प्रवीण डबली यांनी प्राचीन श्री शिव मंदिर मोतीबाग तसेच परिसरातील नागरिकांच्या वतीने DRM दीपक कुमार गुप्ता यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व आभार मानले. हा सन्मान समारंभ DRM कार्यालयात पार पडला, ज्यामध्ये ज्येष्ठ नागरिक पी. सत्याराव आणि प्रकाश (गुंडुराव) यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुप्ता यांनी डॉ. प्रवीण डबली यांच्या निःस्वार्थ प्रयत्नांचे कौतुक करत म्हटले की, "त्यांचे जागरूकता, दृढनिश्चय आणि वारसा संरक्षणाबाबतचे योगदान प्रेरणादायी आहे."

या प्रसंगी गुप्ता यांनी सांगितले की, "ही विहीर केवळ ऐतिहासिक नाही, तर उपयुक्त देखील आहे. तिच्या पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करून ते मोतीबाग रेल्वे कॉलनी, रेल संग्रहालय आणि अन्य ठिकाणी वापरले जाईल. परिसराचेही सौंदर्यीकरण करण्यात येईल."

तसेच, रेल्वे हद्दीत इतरही असे ऐतिहासिक जलस्त्रोत असल्यास त्यांचेही जतन आणि संवर्धन केले जाईल, असे त्यांनी सांगितले. त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना आवाहन केले की, "ऐतिहासिक वारशाला पुन्हा न घाण करता, त्यांचे संरक्षण सर्वांनी मिळून करणे ही आपली जबाबदारी आहे." हा क्षण नागपूरसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरला, जिथे एका पुरातन धरोहराला नवजीवन मिळाले आणि नागरी- प्रशासकीय सहकार्याचे उदाहरण साकार झाले. इतिहासापासून वर्तमानापर्यंत - मोतीबागची ऐतिहासिक विहीर भोसले शासनकाळात बांधलेली ही विहीर कधी काळी मोतीबाग परिसराच्या पाण्याची मुख्य सोय होती. अनेक वर्षांच्या उपेक्षेमुळे ही विहीर झुडपांनी आणि घाणीत झाकली गेली होती. आता तिची स्वच्छता झाल्यानंतर ती केवळ जलस्त्रोत म्हणून नव्हे, तर स्थानिक ऐतिहासिक ठेवा म्हणूनही सन्मानित होत आहे.

# सागर लोखंडेवर लावला एमपीडीए

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

अनेक वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय गुंड सागर सूरज लोखंडे (24) रा. रामबागविरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावला आहे. सागरविरुद्ध खुनाचा प्रयत्न, लुटपाट, मारहाण, गुन्हेगारी कट रचणे, आर्म्स ॲक्ट, दरोड्याची तयारी आणि शांतता भंग करण्यासह अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. गतवर्षी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध सीआरपीसीच्या कलम 110 (ई) (ग) अंतर्गत प्रतिबंधक कारवाई करून दोन वर्षांपर्यंत चांगली वागणूक ठेवण्याचे बंधपत्र लिहून घेतले होते. त्यानंतरही सागर गुन्हेगारीत सक्रीय होता. त्याची लगाम कसण्यासाठी इमामवाडा पोलिसांनी त्याचा गुन्हेगारी रेकॉर्ड गोळा करून गुन्हे शाखेमार्फत एमपीडीएचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठवला. पोलिस आयुक्त सिंगल यांनी त्याला एक वर्षासाठी पुणेच्या येरवडा कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले आहेत.

# पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे तीन ठिकाणी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

जिल्हयातील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नागपूर, मॉडेल करिअर सेंटर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने मंगळवार दि. २२ जुलै रोजी सकाळी 10 ते 4 वाजेपर्यंत रोजगार मेळाव्याचे आयोजन व्ही. एम. व्ही. कॉमर्स, जे. एम. टी. आर्टस आणि जे. जे. पी. सायन्स महाविद्यालय वर्धमान नगर, दादासाहेब कुंभारे मल्टीपर्पज ट्रेनिंग इन्स्टिट्युट, ड्रॅगन पॅलेस कॅम्पस कामठी येथे करण्यात आले आहेत तर श्री. बिंझाणी सिटी कॉलेज, सक्करदरा येथे सकाळी 10 ते दुपारी 12 वाजेपर्यंत येथे समुपदेशन मेळावा असे तीन मेळावे वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.

व्ही. एम. व्ही. कॉमर्स, जे. एम. टी. आर्टस आणि जे. जे. पी. सायन्स महाविद्यालय वर्धमान नगर येथील रोजगार मेळाव्यामध्ये अभिनव इंस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, सहयोग मल्टीस्टेट क्रेडीट कॉ-ऑप सोसायटी, एसबीआय, सेवा ॲटोमोटीव्ह, इफीमेन सर्व्हिस, बरबटे अटोमोटिव्ह, टॅलेनस्ट्राईज टेक्नोक्रेट, इरोस ग्रुप, ग्राम प्रो बिझनेस, मनशा टूर, वैभव एन्टरप्रायझेस, युनिर्व्हसल ग्रुप असोसिएट इत्यादी विविध कंपन्यांमार्फत 800 पेक्षा जास्त जागांसाठी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, आटीआय, डिप्लोमा इत्यादी पात्रताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन उमेदवारांची प्राथमिक निवड केली जाणार आहे.

दादासाहेब कुंभारे मल्टीपर्पज ट्रेनिंग इन्स्टिट्युट, ड्रॅगन पॅलेस कॅम्पस कामठी येथील रोजगार मेळाव्यामध्ये मुथ्योट मॅक्रोफीन, सहयोग मल्टीस्टेट क्रेडीट को ऑप सोसायटी, एसबीआय लाईफ, फ्लीपकार्ट, वैभव एन्टरप्रायझेस लि. यासारख्या विविध कंपन्या 600 रिक्त पदांसह उपस्थित राहणार आहेत. यामध्ये दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, आयटीआय डिप्लोमा पात्रताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

बिंझाणी सिटी कॉलेज, सक्करदरा या समुपदेशन मेळाव्यामध्ये चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. 18 ते 35 वयोगटातील युवक व युवतींनी जास्तीत जास्त संख्येने या रोजगार मेळाव्यामध्ये उपस्थित राहून रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे. मेळाव्याच्या ठिकाणी विविध महामंडळ उपस्थित राहून स्वयंरोजगाराची माहिती देणार आहे

# सक्रिय विद्यार्थी करियर संसदेचा शपथविधी



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २१ :

राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, कुही येथे तिसऱ्या सक्रिय विद्यार्थी करिअर संसदेचा शपथविधी सोहळा ऑनलाईन पद्धतीने व प्रत्यक्ष उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करियर कट्टा' अंतर्गत करण्यात आले.

शपथविधी सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गजानन मांडेकर, प्रमुख अतिथी पत्रकार शरद शहारे, पत्रकार गजानन लांजेवार, मागील दोन सत्रातील महाविद्यालयातील माजी मुख्यमंत्री कु. अश्विनी भिवगडे व कु. साक्षी रोहाड (करियर कट्टा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य) उपस्थित होते. सत्र २०२५-२६ मध्ये कार्यरत राहणाऱ्या संसदेच्या निवडीसाठी महाविद्यालयातील द्वितीय व अंतिम वर्षातील इच्छुक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवण्यात आले. प्रत्यक्ष मुलाखतीनंतर एकूण ११ पदाधिकारी व सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यात मुख्यमंत्री कु. श्रुती तलवारे, नियोजन मंत्री कु. स्नेहा भिवगडे, कायदे व शिस्तपालनमंत्री कु. साक्षी लांजेवार, सामान्य प्रशासन मंत्री कु. योगेश्वरी देशमूख, माहीती व प्रसारन मंत्री कु. वैष्णवी भूडे, उद्योजकता विकासमंत्री कु. तेजस्वी आरीकर, रोजगार स्वयंरोजगार मंत्री कु. आचल उईके, कौशल्य विकासमंत्री कु. साहीता राउत, संसदिय कामकाज मंत्री कु. साक्षी भिवगडे, महिला व बालकल्याणमंत्री कु. प्रगती गाडगे, समिती सदस्य कु. काजल सावरकर या 11 सदस्यांना शपथ देण्यात आली. या विद्यार्थ्यांना त्यांच्या पदांचे नियुक्तीपत्र, प्रमाणपत्र, करिअर डायरी देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसंगी उपस्थित महाविद्यालयातील प्रा. डॉ. सिरास कटमुसरे, प्रा. डॉ. दीपक केने, प्रा. डॉ. मीनाक्षी झाडे, प्रा. डॉ. संजय चव्हाण, ग्रंथपाल दिनेश घाटोळ यांच्यासह इतर प्राध्यापक व कर्मचारीही उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व संचालन करियर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण लामखाडे व प्रा. डॉ. गायत्री कुकडे, छायांकन संजय टेकाम यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग दर्शविला व सर्व मंत्रिमंडळांना पुढील कार्याकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

## नागपूर आणि अजनी स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

ताजबाग, नागपूर येथे होणाऱ्या उर्स निमित्त स्थानकांमध्ये संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची सुरक्षित आणि सुरळीत हालचाल सुनिश्चित करण्यासाठी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने नागपूर व अजनी रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी लागू केली आहे. ही बंदी मंगळवार, २२ जुलै २०२५ ते शुक्रवार, २५ जुलै २०२५ या कालावधीसाठी असेल.

या पुढाकाराचा उद्देश म्हणजे प्लॅटफॉर्मवरील गर्दी नियंत्रित करणे आणि धार्मिक कार्यक्रमाच्या काळात खऱ्या प्रवाशांना होणारा त्रास कमी करणे, कारण या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. तथापि, विशेष परिस्थितींमध्ये ज्येष्ठ नागरिक, आजारी प्रवासी, महिला प्रवासी, मुले, अशिक्षित प्रवासी व अशा इतर प्रवाशांना मदतीसाठी येणाऱ्या व्यक्तींना प्लॅटफॉर्म तिकिटे दिली जातील. याबाबत स्थानक अधीक्षकांना योग्य निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सार्वजनिक जनजागृतीसाठी आवश्यक घोषण्या केल्या जातील तसेच सर्व बुकिंग विंडोंवर प्रवासी माहिती फलकांवर सूचनाफलक लावले जातील. स्थानक कर्मचारी व अधीक्षकांना हे उपाय प्रभावी व सौजन्यपूर्ण रीतीने राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या कालावधीत सर्व प्रवासी व नागरिकांनी सहकार्य करावे व अनावश्यकपणे प्लॅटफॉर्मवर गर्दी करू नये, असे मध्य रेल्वेचे आवाहन आहे. सर्व प्रवाशांचे सुरळीत संचालन आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यात आपला सहभाग महत्त्वपूर्ण ठरेल.

# सेंटर पॉईंट शाळेचा पदग्रहण समारंभ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

वर्धमाननगर येथील सेंटर पॉईंट शाळा येथे विद्यार्थी प्रतिनिधींचा पदग्रहण समारंभ घेण्यात आला. या समारंभात नव्याने निवड झालेल्या मुख्य शाळा प्रतिनिधी श्रेया झोडे, मुख्य शाळा उपप्रतिनिधी ब्रिजेश पुन्यानी यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे निळा, हिरवा, लाल, पिवळा गटप्रमुख, उपगटप्रमुख, विशेष प्रकल्प प्रतिनिधी, क्रीडा प्रतिनिधी, सुवर्ण नियम प्रतिनिधी यांचीही निवड करण्यात आली. रिया सेदानी, अनिघा नारनवरे, दिव्यम खंडेलवाल, याशिका जैन, आर्या कुंभारे, दिव्या अग्रवाल निळा गट, सुमती खुंगर, ओवी घोडे, मानवीरसिंग चावला, आभीर वासनिक, देव अग्रवाल, कल्प जैन, दर्श कोठारी लाल रंग, अर्जुन मिसाळ, सारंग यादव, ईशान केजडीवाल, मुस्तफा इरानी, प्रियंका दळवी, सिमरन भावनानी हिरवा गट आणि उर्वी हुदिया, अनन्य गोयंका, मित सिन्हा, अयानिका दास, मोहसिना चिमथानवाला, गीत शाहू, सिद्धांत मालू यांची पिवळ्या गटात निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे उदघाटन मुख्यध्यापिका कांचन उके, उपमुख्यापिका दीपा चक्रवर्ती, जयंती चक्रवर्ती यांनी दीपप्रज्वलन करून केले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी डॉ. श्रेया प्रसाद आणि बीएमसीचे अभियंता शुभम राठी होते. पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी जबाबदारीचे भान ठेवून नेतृत्व करावे. शाळा आपल्या जीवनाचा पाया आहे. शाळेत ज्ञानच नाही तर जीवन जगण्याचा मार्ग मिळतो असाही सल्ला पाहुण्यांनी दिला. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार राशी बोधे यांनी मानले.

# नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना 90 टक्के अनुदानावर 9 ते 18 अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. चालू वर्षाकरीता पात्र ठरलेल्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टर वाटप करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

योजनेच्या अटी व शर्ती - अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान 80 टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमला मयार्दा ३.५० लाख रुपये इतकी राहील. स्वयंसहायता बचत गटांनी वरील कमाल मयार्देच्या रक्कमेच्या 10 टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर 90 टक्के शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. सन 2025-26 या आर्थिक वषार्तील बचत गटांची निवड केल्यानंतर लाभार्थी बचत गटाने किमान 9 ते 18 अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करावी. परंतु जे लाभार्थी बचत गट मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अधिक अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करु इच्छित असतील, असे पात्र ठरलेल्या बचत गटांना ते खरेदी करता येतील.

या योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्वावर देऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याला मिनी टॅक्ट्रर विकता येणार नाही अथवा सावकार किंवा अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवता येणार नाही. ज्या लाभार्थ्यांना पावर टिलरचा लाभ दिला आहे त्या लाभाथीर्ना या योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही. यापूर्वी ज्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आलेले आहे त्यांना अर्ज करता येणार नाही. इच्छुक स्वयंसहाय्यता गटांनी अर्ज समाज कल्याण कार्यालयात 31 जुलैपर्यंत पाठवावा.

# विदर्भस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

ओबीसी युवा अधिकार मंच आणि बळीराजा क्लब नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या विदर्भस्तरीय वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वक्तृत्व स्पर्धा २०२५ च्या पहिल्या टप्प्याचे आयोजन नागपूर येथे करण्यात आले होते. आयोजकांच्या अपेक्षेपेक्षा अधिक म्हणजे एकूण ७८ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला, ज्यामुळे कार्यक्रम सात तासांहून अधिक काळ रंगला.

ही स्पर्धा "जातीनिहाय जनगणना, समृद्ध भारत, आरक्षण, सामाजिक न्याय आणि संविधान" या अत्यंत महत्त्वाच्या व सामाजिकदृष्ट्या जागरूकतेच्या विषयांवर आधारित होती. स्पर्धेत विदभार्तील ९ जिल्ह्यांमधून अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, नागपूर आणि वर्धा आलेल्या वक्त्यांनी उत्साहात सहभाग घेतला.

पूर्वनियोजित योजनांनुसार या स्पर्धेत प्रथम फक्त ६ बक्षिसे, तीन मुख्य आणि तीन उत्तेजनार्थ ठेवण्यात आली होती. मात्र, स्पर्धकांची संख्या, त्यांची अभ्यासपूर्ण मांडणी, विचारसंपन्न भाषणं आणि त्यांच्या विषयातील सखोलता लक्षात घेता बक्षिसांची संख्या वाढवून एकूण १८ पारितोषिके देण्यात आली. यात तीन मुख्य विजेते आणि पंधरा उत्तेजनार्थ बक्षीसार्थींचा समावेश होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. संजय शेंडे यांनी भूषवले होते. प्रमुख अतिथी म्हणून ॲड. दीपक चटक, ज्ञानेश्वर रक्षक आणि प्रा. रमेश पिसे उपस्थित होते. परीक्षक म्हणून राजेश्वर ठाकरे, ऋषभ राऊत आणि पाटील यांनी अत्यंत निष्पक्षपणे परीक्षण करून योग्य निकाल लावण्यात मोलाची भूमिका बजावली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये मुकुंद अडेवार (विदर्भस्तरीय स्पर्धा समन्वयक), सुरज दहागावकर, कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालक चंद्रशेखर चौधरी, संयोजक यजुर्वेद सेलोकर, तसेच ओबीसी युवा अधिकार मंचचे पीयूष आकरे, कृतल आकरे, डॉ. प्रगती सेलोकर, आकाश वैद्य, विनीत गजभिये, प्रतीक बावनकर, प्राची निंबेकर, निकेश पिने, अंकित आणि संपूर्ण संघटनेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वाहन चोर पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

गिट्टीखदान पोलिसांनी ठाण्यांतर्गत 5 दिवसांपूर्वी झालेल्या वाहन चोरीच्या घटनेचा छळा लावून आरोपी तरुणाला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून ठाण्यांतर्गत आणखी दोन वाहन चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून तिन्ही वाहनांसह 1 लाख 5 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. अंकुश बाबुलाल उईके (33) रा. जगदीशनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

गिट्टीखदानच्या विश्वासनगर परिसरात राहणारे हिरालाल गजभिये यांनी गत 13 जुलैच्या रात्री त्यांची एमएच-31/एफएन-8995 क्रमांकाची मोटारसायकल घरासमोर पार्क केली होती. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने त्यांची मोटारसायकल चोरून नेली. दुस ?या दिवशी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमऱ्यांची फुटेज तपासण्यासह खबऱ्यांना कामावर लावण्यात आले. या चोरीत अंकुशचा हात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गजभिये यांची मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी अंकुशला अटक केली. पोलिस कोठडी घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने ठाण्यांतर्गत आणखी दोन वाहन चोरी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी अंकुशकडून तिन्ही मोटारसायकल जप्त केल्या.

## रेल मदत आणि हेल्पलाइन १३९ बाबत जनजागृती मोहीम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

मध्य रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रवासी हित अनुकूल सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. याचाच भाग म्हणून 1 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट दरम्यान रेल मदत - भारतीय रेल्वेची एकत्रित तक्रार निवारण प्रणाली आणि राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांक 139 याचा प्रचार करण्यासाठी एक विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. रेल मदत हे एक केंद्रीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म आहे ज्याद्वारे प्रवासी रेल्वेच्या सेवा, स्वच्छता, खाद्यसेवा, डब्यांची स्थिती आणि इतर सोयी-सुविधांबाबत आपली तक्रार रीयल टाइम मध्ये नोंदवू शकतात व तिचे निराकरण मिळवू शकतात.

प्रवासी 139 या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल किंवा स्टर करून, मोबाईल ॲप, अधिकृत वेबसाइट, ई-मेल तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून तक्रारी नोंदवू शकतात. यामध्ये हेल्पलाइन 139 हा सर्वाधिक सोपा व वापरण्यास सुलभ पर्याय ठरलेला आहे. या अंतर्गत महत्त्वाच्या स्थानकांवर व गाड्यांमध्ये माहितीपत्रके, सार्वजनिक घोषणांद्वारे तसेच थेट संवादाद्वारे प्रवाशांपर्यंत माहिती पोहोचवण्यात येईल.

# बैलवाडात एक पेड़ माँ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

नागपूर तालुक्यातील बैलवाडा ग्रामपंचायतीच्या वतीने एक पेड़ माँ के नाम या सामाजिक उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सरपंच निकिता सचिन शेटे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या वेळी उपसरपंच गिरीधर जुमडे, ग्रामसेवक ज्ञानेश्वर धारपूरे, ग्रामपंचायत सदस्य मनोज उचके, प्रिया ढोके, जयश्री ढवळे, मंगला ठाकरे, मंजुषा नागपूरे, राहुल जुमडे,ग्रामपंचायत कर्मचारी फारूक शेख, करण काकडे, अंगणवाडी सेविका शालू निस्ताने, माजी सरपंच



सचिन शेटे, दत्तू काकडे उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विविध प्रकारची झाडे लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी वृक्षांची काळजी घेण्याची जबाबदारी स्वीकारली. या उपक्रमामुळे गावात पर्यावरणविषयी जनजागृती होत असून ग्रामस्थांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

# जुगार अड्ड्यावर कन्हान पोलीसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २१ :

## नऊ आरोपी अटक, मोबाइल व नगद रोख रक्कम सह ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

कन्हान - पिपरी जुन्या नगरपरिषद इमारत मागे सोनु पिजनालय समोर न्यु मार्केट येथे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर कन्हान पोलीसांनी धाड टाकुन नऊ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचा जवळुन ७०,०३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शनिवार (दि.१९) जुलै रोजी पोलीस निरीक्षक वैजयंती मांडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस प्रोव्हीशन , जुगार रेड व अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली कि जुना नगर परिषद मागे सोनु पिजनालय समोर न्यु मार्केट येथे काही युवक खुल्या जागेवर ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लाऊन हार जीतचा जुगाराचा खेळ खेळीत आहे.

कन्हान पोलीसांनी सापळा रचुन धाड टाकली असता काही युवक घोळका करुन जुगार खेळतांनी मिळुन आले. कारवाईत पोलीसांनी शुभम नामदेव रंगारी (२२) , मुशहीद रजा अब्दुल सलाम शेख (३०), कुणाल बादास फुलझेले (३१), जुम्मन बशीर खान पठान (२२), विक्की प्रकाश मेश्राम (२८), प्रमोद नामदेव रंगारी (३२) \, प्रशांत वंशभुषण तिवारी (३६) \, पियुष अजीत शेंडे (२३) धर्मेंद्र अरविंद श्रोते (३०) सर्व रा.कन्हान यांना ताब्यात घेऊन त्यांचा जवळुन सहा मोबाइल किंमत ६९,००० रुपए आणि रोख रक्कम १०३० असा एकुण ७०,०३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक रोशन बावनकर, हरिष सोनभद्रे, अमोल नागरे, जिवन विघे, मोहित झाडे, अश्विन गजभिए सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

# गरजूंसाठी घरकुलाची संधी : प्रधानमंत्री व रमाई आवास योजनांचा लाभ घ्या

## मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २१ :

वाडी नगरपरिषद हद्दीतील गरजू व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना स्वतःचे घर मिळावे यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (टप्पा-२) आणि रमाई आवास योजनेअंतर्गत विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांनी केले आहे. या योजने अंतर्गत शहरातील गरीब, गरजूंना योजनेचा लाभ मिळावा यासाठी मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांनी कर्मचाऱ्यांसह शनिवारी शहरात फेरफटका मारून नागरिकांशी संवाद साधत योजनेची माहिती देऊन लाभ घेण्याचे आवाहन केले. प्रधानमंत्री



आवास योजना-२.० व रमाई आवास योजनेच्या लाभासाठी लाभार्थी तसेच कुटुंबातील इतर सदस्याचे नावे पक्के घर नसावे, लाभार्थ्यांनी मागील २० वर्षात कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेल्या नसावा, कुटुंबाचे उत्पन्न ३ लाखापेक्षा कमी असल्याचा उत्पन्नाचा दाखला,आधार कार्ड-मोबाईल क्रमांक लिंक असलेले,अर्जदार कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड, अर्जदार, आई-वडील त्यांचे आधार कार्ड, हयात नसल्यास मृत्युपत्र, चालू वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, सिटीसर्वे उतारा, नकाशा, शासकीय जागेचा पट्टा रजिस्ट्री असेसमेंट, कराची पावती आदी आवश्यक कागदपत्रे वाडी नगरपरिषद कार्यालयातील प्रधानमंत्री आवास योजना मदत कक्ष येथे नोडल अधिकारी मयूर झाडे ( संपर्क-7028653675) यांच्याकडे जमा करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५९ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २१ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. सोमवार (ता.21) रोजी शोध पथकाने 59 प्रकरणांची नोंद करून 49,600/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 34 प्रकरणांची नोंद करून 12,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.400/-दंड) या अंतर्गत 02



प्रकरणांची नोंद करून 800/- रूपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डीग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 2,000/-रुपयांची वसुली करण्यात आली.वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 12 प्रकरणांची नोंद करून 18,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 02 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 35 प्रकरणांची नोंद करून 7,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 07 प्रकरणांची नोंद करून रु.7,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे.विठोबा अपार्टमेंट यांच्यावर बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. तसेच मे.रूटस कंस्ट्रक्शन्स यांच्यावर सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रू.5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.मे.डायनामिक टीव्हीज शॉप यांच्यावर दुचाकी गाडयांमुळे फुटपाथ गुंतवून ठेवल्यामुळे रू.5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.धरमपेठ झोन अंतर्गत मे.एम डी कंस्ट्रक्शन यांनी जवळच्या फुटपाथवर कंटेनरने जागा गुंतविल्यामुळे रु. 10,000/- चे दंड वसुल करण्यात आले. हनुमान नगर झोन अंतर्गत लक्ष्मीकांत तायडे यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.मे. इंगळे करियर इन्स्टिटयूट यांनी विनापरवानगी विद्युत खांबावर जाहिरातीचे फलक लावल्याने रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.तसेच मे. श्री.गजानन इंन्फ्रा व मे. निवार्ना डेव्हलपर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल प्रत्येकी रु. 10,000/- या प्रमाणे रू.20,000/- चे दंड वसूल करण्यात आले. नेहरूनगर झोन मे.साई रेसिडेंसी बिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे.अमोल डेअरी यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. माया स्वीटस यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.आशीनगर झोन अंतर्गत मे. प्रतीक्षा ईपेरियल यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले.तसेच मे.हाजी हॉटेल यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने 13 प्रकरणांची नोंद करून रू. 95,000/- दंड वसूल केला.

### कोर्ट विद्यमान रमेश कोळपे
### तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र./एम आर सी-८१/२०२४-२५
मौजा कांद्री, ता. रामटेक
जिल्हा-नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी जगदीश मंसाराम उईके रा. कांद्री वस्ती ता. रामटेक, जि. नागपूर यांनी त्यांचे आजोबा नामे मनसुक सुखा उईके यांचा मृत्यु दिनांक १३.०६.१९६२ रोजी मौजा कांद्री येथे झाला असून मृत्युची नोंद गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) येथे केली नाही. त्याबाबत मुख्याधिकारी/सचिव गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) यांनी दिनांक २८.०४.२०२५ रोजी मृत्यु नोंद नसल्याचे अनुपलब्धता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे मनसुक सुखा उईके यांचा दिनांक १३.०६.१९६२ रोजी मृत्यु नोंद बाबत गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) येथे घेणेबाबत आदेश पत्र मिळणेकरिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद मनसुक सुखा उईके यांचा मृत्यु दिनांक १३.०६.१९६२ बाबत गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २३.०७.२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरूपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजित तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांना नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०८.०७.२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ : रामटेक
दिनांक : ०८/०७/२०२५

(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक

### कोर्ट विद्यमान रमेश कोळपे
### तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र./एम आर सी-८१/२०२४-२५
मौजा कांद्री, ता. रामटेक
जिल्हा-नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी जगदीश मंसाराम उईके रा. कांद्री वस्ती ता. रामटेक, जि. नागपूर यांनी त्यांचे मोठे वडील नामे इमरत मनसुख उईके यांचा मृत्यु दिनांक ०४.०५.१९७२ रोजी मौजा कांद्री येथे झाला असून मृत्युची नोंद गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) येथे केली नाही. त्याबाबत मुख्याधिकारी/सचिव गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) यांनी दिनांक २४.०४.२०२५ रोजी मृत्यु नोंद नसल्याचे अनुपलब्धता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे इमरत मनसुख उईके यांचा दिनांक ०४.०५.१९७२ रोजी मृत्यु नोंद बाबत गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) येथे घेणेबाबत आदेश पत्र मिळणेकरिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद इमरत मनसुख उईके यांचा मृत्यु दिनांक ०४.०५.१९७२ बाबत गट ग्रामपंचायत कांद्री (खदान) येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २३.०७.२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरूपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजित तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांना नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०८.०७.२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ : रामटेक
दिनांक : ०८/०७/२०२५

(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक

# स्वच्छ सर्वेक्षणात हिंगणा नगरपंचायत प्रथम

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २१ :

स्वच्छतेकडे वाटचाल ही फक्त प्रशासनाची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे हे हिंगणा नगरपंचायतीने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

स्वच्छ सर्वेक्षण ही भारत सरकारच्या स्वच्छ भारत मिशन (शहरी) अंतर्गत दरवर्षी घेतली जाणाऱ्या स्वच्छता स्पर्धेत नगरपंचायतमधुन नागपूर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. भारत सरकारच्या गृह व शहरी कार्य मंत्रालय यांच्याद्वारे स्वच्छ भारत मिशन (शहरी) अंतर्गत घेण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये हिंगणा नगरपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर या श्रेणीत हिंगणा नगरपंचायतीने विभागीय स्तरावर सर्व नगरपालिका मधून तृतीय पुरस्कार व नगरपंचायती मधून प्रथम पुरस्कार मिळविला आहे. सदर सर्वेक्षणामध्ये हिंगणा नगरपंचायतीने १२,५०० गुणांपैकी ९,८०० गुण मिळविले असून, नगरपंचायतीला गार्बेज फ्री सिटी मध्ये १ स्टार मानांकन व ओडीएफ ++ दर्जा देखील प्राप्त झाला आहे. या यशामध्ये मुख्याधिकारी धनंजय सरनाईक,आरोग्य व स्वच्छता अभियंता विरेंद्र ढोके, स्वच्छता निरीक्षक धनंजय गोतमारे, शहर समन्वयक जागृती लोहारे यांचे परिश्रम आणि मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे राहीले. त्यांनी नियोजनबद्ध कार्यक्रम, प्रभावी अंमलबजावणी व जनजागृतीच्या माध्यमातून संपूर्ण स्वच्छता यंत्रणा सशक्तपणे कार्यरत ठेवली. अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, तसेच शहरातील नागरिक यांनी एकसंघ प्रयत्नांतून शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान दिले. मुख्याधिकारी धनंजय सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगणा शहरात विविध पातळ्यांवर प्रभावी उपक्रम राबवले गेले, त्यात १०० टक्के डोअर टू डोअर कचरा संकलन, ओल्या-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्यावर आधारित कंपोस्ट निर्मिती यंत्रणा, प्लास्टिक विरोधी मोहीम,जनजागृती रॅली, शालेय विद्यार्थ्यांद्वारे प्रचार व स्पर्धा, सफाई मित्रांचे सन्मान यांसारखे उपक्रम यशस्वीपणे पार पडले. यामुळेच नगरपंचायतीला स्वच्छतेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. शहर आणखी स्वच्छ, सुंदर आणि टिकाऊ करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने माझे शहर, माझी जबाबदारी या भावनेने पुढे यावे. भविष्यात ५ स्टार गार्बेज फ्री सिटी आणि पाणी + मानांकन मिळवणे नगर पंचायतीचे उदिष्ट असेल, असे मत मुख्याधिकारी धनंजय सरनाईक यांनी मांडले.

हिंगणा नगर पंचायतीच्या यशामागे मुख्याधिकारी, आरोग्य व स्वच्छता अभियंता, स्वच्छता निरीक्षक, शहर समन्वयक, नगर पंचायतीचे कर्मचारी प्रीती चकोले, आकाश धावले,पवन ढवळे, तसेच गोदरेज प्रोपर्टी आणि फीडबॅक फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट यांचे सहकारी हिमांशू त्रिपाठी, तसेच नगर पंचायती चे स्वच्छता कर्मचारी यांचे सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. या सर्वांच्या समन्वय, कठोर मेहनत व सेवाभावातूनच हिंगणा शहर आज स्वच्छतेच्या दिशेने मोठी झेप घेता आली.



आमदार समीर मेघे यांनी शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून यामुळे शहराच्या स्वच्छतेसाठी मोठा हातभार लागला आहे पुरसकार मिळणे ही अत्यंत समाधानाची बाब आहे. हे यश फक्त नगरपंचायतीचे नाही, तर शहरातील प्रत्येक नागरिकाचे आहे. यापुढेही अशाच प्रकारे नागरिकांच्या सहभागातून शहराला स्वच्छतेच्या बाबतीत नंबर वन करण्याचा संकल्प करत आहोत.

**लता गौतम ( नगराध्यक्ष), नगरपंचायत, हिंगणा.**

# वार्षिक उर्सच्या निमित्ताने मध्य रेल्वेकडून स्पेशल ट्रेन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या वार्षिक उर्सच्या निमित्ताने मध्य रेल्वेकडून ४ स्पेशल ट्रेन सोडण्यात येणार आहेत. मुंबई, भिवंडी, मालेगाव, नाशिक येथून येत असलेल्या भाविकांची संख्या लक्षात घेता आणि २४ जुलैला दोन स्पेशल ट्रेनची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती मध्य रेल्वेचे , विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी दिली आहे.

हजारो भाविकांची गर्दी लक्षात घेता रेल्वे स्थानकावर प्रशासन आणि पोलिस यंत्रणांनी मोठी तयारी केली आहे. रेल्वे स्थानकावर सोयी-सुविधा निर्माण केल्या जात आहेत. स्थानकाची स्वच्छता, पिण्याचे पाणी, माहिती कक्ष सुविधांमध्ये वाढ करण्यात आली आहे. गदीर्चा गैरफायदा घेऊन समाजकंटकांनी उपद्रव करू नये किंवा चोर भामट्यांकडून भाविकांच्या मौल्यवान चिजवस्तू लांबविल्या जाऊ नये, यासाठी रेल्वे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.

रेल्वे स्थानक परिसरात गर्दीच्या आडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून रेल्वे पोलिस, रेल्वे सुरक्षा दल श्वानांसह बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाने चोख बंदोबस्त लावला आहे. जीआरपीचे पोलिस अधीक्षक मंगेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गौरव गावंडे यांच्या नेतृत्वात ४ पीएसआयसह रेल्वे पोलिस २४ तास रेल्वे स्थानकावर बंदोबस्त करीत आहेत. याशिवाय साध्या वेषातील कर्मचारी गर्दीवर लक्ष ठेवून आहेत.



# काटोलचा चेतन बाळबुधे यांची जर्मनी येथे स्पर्धेकरिता निवड

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २१ :

येथील खेळाडूची आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्पर्धेसाठी भारतीय हॉलीबॉल संघात निवड आई व वडीललाचे स्वप्न शेवटी मुलाने पूर्ण केले. युथ स्पोर्ट्स हॉलीबॉल क्लब काटोलचा खेळाडू चेतन राजू बाळबुधे यांची 21 ते 27 जुलाई 2025 या कालावधीत जर्मनी या देशात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय आंतर विद्यापीठ बीच हॉलीबॉल स्पर्धेकरिता भारतीय विद्यापीठ हॉलीबॉल संघात निवड झाली आहे.

चेतन हा सामान्य कुटुंबातीला मुलगा असून आपल्या आईवडीलाचे स्वप्न व काटोलचे नाव लौकिक केले आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ हॉलीबॉल स्पधेर्तील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे त्याची निवड भारतीय हॉलीबॉल संघात करण्यात आली आहे.

चेतनच्या भारतीय हॉलीबॉल संघात निवडी बद्दल त्यांची आई आशाताई बाळबुधे व त्यांचे वडील राजू बाळबुधे, त्यांचे भाऊ विशाल शिवणकर, सागर शिवणकर, भवन्या शिवणकर, विजुभाऊ ताटे अजितभाऊ लाडसे संदीपजी ठाकरे राकेश ढोरे, ज्ञानेश्वर तेलंते, प्रतिक वाळके,तसेच मित्रपरिवार काटोल यांनी अभिनंदन व कौतुक केले व आंतरराष्ट्रीय हॉलीबॉल स्पधेर्साठी चेतन यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



# आग्नेय मध्य रेल्वेमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी नवीन उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

आग्नेय मध्य रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देते, तंत्रज्ञानाचे सतत अपग्रेडिंग करून आणि नाविन्यपूर्णतेच्या दिशेने काम करत आहे. या क्रमात, एका महत्त्वाच्या उपक्रमांतर्गत, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने तीन विभाग सुरू केले आहेत- बिलासपूर, रायपूर आणि नागपूर येथून धावणाऱ्या विविध गाड्यांच्या एकूण १०५२ प्रवासी डब्यांमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी हे बसवले जात आहेत. हा उपक्रम माननीय पंतप्रधानांच्या 'सुरक्षित आणि स्मार्ट रेल्वे' या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे ज्या अंतर्गत भारतीय रेल्वे वेगाने आपला विस्तार करत आहे. २०१५ पासून आधुनिकीकरण केले जात आहे. अलिकडेच, रेल्वे बोर्डाने देशभरातील ७४,००० प्रवासी कोच आणि १५,००० लोकोमोटिव्हचे आधुनिकीकरण करण्याचे काम दिले आहे. लोकोमोटिव्हमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे.

हे कॅमेरे आग्नेय मध्य रेल्वेकडून डब्यांच्या महत्त्वाच्या भागांमध्ये जसे की प्रवेश आणि निर्गमन दरवाज्याजवळ बसवले जात आहेत.

हे देखरेखीच्या उद्देशाने बसवले जात आहेत. आरक्षित कोचमध्ये ४ कॅमेरे आणि अनारक्षित कोचमध्ये ६ कॅमेरे बसवले जातील. अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवताना उच्च दर्जाची उपकरणे निवडणे, स्पष्ट व्हिडिओ फुटेज रेकॉर्ड करणे आणि कमी करणे रोशनीमध्येही प्रभावी देखरेख सुनिश्चित करण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल. यासोबतच, रेल्वे मंत्रालयाने 'इंडियाएआय' मिशन सुरू केले आहे. कॅमेऱ्यांमधून मिळालेल्या डेटाचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याच्या शक्यतांचाही गांभीर्याने शोध घेतला जाईल.

# ९७१ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 971 वाहन चालकांवर कारवाई करून 3,46,700 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये 2 व एनडीपीएस कायद्यान्वये 5 अशा 7 प्रकरणात 8 आरोपींवर कारवाई करून 41,62,180 रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये 2 प्रकरणात 2 आरोपींवर कारवाई करून 12,050 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# रातुम नागपूर विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेचा 'कॅरी ऑन' विरोधात निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेने 'कॅरी ऑन' योजनेला परवानगी न देण्याचा निर्णय घेतला आहे. 'कॅरी ऑन' ला परवानगी दिल्याने शिक्षणाचा दर्जा घसरेल असे सदस्यांनी एकमताने मत व्यक्त केले आहे. रातुम नागपूर विद्यापीठाचे अधिकारी दररोज ही योजना सुरू करण्याची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी व्यवहार करत आहेत. हे गट रातुम नागपूर विद्यापीठावर 'कॅरी ऑन' सुरू करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. विशेष म्हणजे, मुंबई, पुणे, अमरावती आणि इतर काही विद्यापीठांनी 'कॅरी ऑन' लागू केले आहे. या दबावादरम्यान, कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे यांच्या नेतृत्वाखालील शैक्षणिक परिषदेने जोरदार भूमिका घेतली आहे.

विद्यापीठातर्फे पूर्वी मंजूर केलेल्या 'कॅरी ऑन' योजनेनुसार विद्यार्थ्यांना काही विषयांमध्ये अनुत्तीर्ण झाले असले तरी पुढील सत्रात किंवा वर्षात प्रवेश घेता येत होता. त्यानंतर त्यांना ते अनुत्तीर्ण विषय नंतर उत्तीर्ण करावे लागायचे. हे स्पष्टपणे शिक्षणाच्या गुणवत्तेला क्षीण करणारे आहे. म्हणूनच नागपूर विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेने ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

अर्थातच, पुढील सत्रात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे सर्व विषय उत्तीर्ण करने आता अनिवार्य झाले आहे. त्यामुळे यावर्षी अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे 'कॅरी ऑन' सुरु ठेवण्याची मागणी करत आंदोलन पुकारण्याचा इशाराही दिला आहे. मात्र, विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेने शिक्षणाची योग्य गुणवत्ता जोपासून ठेवण्याच्या उद्देशाने 'कॅरी ऑन' योजनेला परवानगी न देण्याचा ठाम निर्णय जाहीर केला आहे.

# इंद्रायणी नगर शाखेचा गुरुपूजन उत्सव उत्साहात पार



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

येथील इंद्रायणी नगरमधील श्री हनुमान मंदीरात इंद्रायणी नगर शाखेचा गुरुपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून उमरेड जिल्हा संघचालक दीपक दुधाने होते. तर प्रमुख पाहूणे अशोक शिंदे होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने करण्यात आली. सामूहिक गीत लीलाधर आखरे यांच्या मार्गदर्शनात सादर करण्यात आले. यावेळी एकूण २८ स्वयंसेवकांनी गुरुपूजन करून आपल्या श्रद्धेची अभिव्यक्ती केली.संचालन प्रवीण शिंदे यांनी केले. सुभाषित विजय शिरसागर यांनी सादर केले. अमृतवचन संदीप भिवगडे यांनी वाचून दाखवले. प्रमुख अतिथींनी सर्व स्वयंसेवकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर सर्व स्वयंसेवकांना प्रसाद वितरित करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जबाबदारी अतुल भट्टलवार, स्वप्निल कारंडे, उत्तम मात्रे, लीलाधर आखरे, विजय देशपांडे, संदीप भिवगडे यांनी सहकार्य केले.

# हायवेचे अवैध धाबे बनले बियर बार....

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २१ :

सरकारने कायदायने दारू विकण्यासाठी बियर बार परवाना दिला आहे. त्या द्वारे कायदायने दारू विक्री करण्याचे अधिकार त्यांना मिळाले आहे. धाब्यावर कोणता कर, महसूल लागत नाही. पण खुले आम नागपूर भंडारा हायवे वर रात्र भर जेवण व दारू मिळत असते नुकताच शासनाने दारू वर 10 टक्के वॅट व 60 ते 70 रुपयांनी दारू च्या किमतीत वाढ झाली व परवाना फी वार्षीक 15 टक्के वाढवली. त्यामुळे बियर बार वाल्यांची पूर्ण कमर तोढली आहे. इकडे काही ग्रामीण भागातील बियर बार बंद होण्याच्या मार्गावर आहेत कारण किंमती व वॅट वाढल्या मूळे मालकाचे उत्पन्न कमी होणार यामुळे आज बारमध्ये लाखो कर्मचारी काम करतात त्यांच्यावर उपास मारीची वेळ येणार आहे.

बियर बार नुसतं दारू विकत नाही तर सरकारला सुद्धा महसूल देऊन त्यांची तोजोरी भरत असते त्यामळे सरकार अनेक योजना राबवित असते. सरकारने लाढली बहीण योजना आणली. त्यामुळे महिन्याला 1500 रुपये धावे लागते यामुळे सरकारच्या तिजोरी करोड लाखो चा भार पडत आहे.

त्यामुळे दारू दुकान एकमेव लक्ष करून त्यांनचा मणगुटा पकडला आहे. त्यामुळे बियर बार आता न परवडणारे दुकान झाले आहे. बियर बार दुकानावर भाजीपाला, चकणा, किराणा, चिकन मटण वेटर, मॅनेजर व इतर लोकांचे कुटुंब अवलनबुन आहे. ये रत्यावर येण्याच्या मार्गावर आहेत.

नागपूर ते भंडारा रोडवर भरपूर धाबे आहेत आणी धाबे वाले दारू वाईन शॉप मधून विकत आणतात त्यामुळे बियर बार यांना खूप मोठा फटका बसत आहे, हे सर्व सुरू आहे पोलीस यांच्या मदतीने आर्थिक देवाण घेवाण मुळे धाब्यावर कोणतीच कारवाई होत नाही व नंबर एक मध्ये धंद्या करणारे आता रत्यावर येण्याच्या मार्गावर आहेत.




हायवे वरील धाबे वर अवैध विक्री व सरकारने वाढवलेले वॅट रेट यामुळे परमिट रूम धोक्यात आली आहे. सरकारने वॅट कमी नाही केले तर आम्ही सर्व परमीट धारक परमिट रूमला चाबी लावून चाबी जिल्हाधिकारी यांना देऊ.
**गुड्डू जयस्वाल, सचिव मौदा बार असोसिएशन**

# शाहीर खुशाल बेले यांचा सन्मान सोहळा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

गुरुशिष्य कार्यशाळा स्नेहमिलन व पारंपरिक सांस्कृतिक लोककला महोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मी मंगल कार्यालय, कुही येथे एक भव्य कलावंत व शाहीर संमेलन पार पडले. या संमेलनात महाराष्ट्रातील लोककलावंतांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला, तसेच समाजप्रबोधनासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या शाहीर खुशाल लक्ष्मण बेले यांचा जाहीर सत्कार सोहळा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

गेल्या अनेक दशकांपासून शाहीर बेले यांनी सामाजिक प्रश्नांवर आधारित शाहिरीच्या माध्यमातून लोकजागृतीचे कार्य केले आहे. त्यांच्या सडेतोड शैलीतील पोवाडे, भारूड व शाहिरी सादरीकरणांनी ग्रामीण जनतेच्या मनात जागृती निर्माण केली. त्यांच्या या कार्याची दखल घेत आयोजकांकडून त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि सील प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित कलावंत, मान्यवर व रसिक प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात उभं राहून शाहीर बेले यांना मानवंदना दिली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनेने झाली. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या स्वागतानंतर विविध लोककलावंतांनी मराठी लोककलेचे सादरीकरण केले. पोवाडा, तमाशा, भारूड, शाहिरी अशा विविध कला प्रकारांनी सभागृहात रंगत निर्माण केली. संमेलनात सहभागी झालेल्या कलाकारांनी शाहीर बेले यांच्या कायार्चा गौरव करत त्यांच्या अनुभवातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. समाजप्रबोधन करणाऱ्या अशा कलावंतांचा सन्मान ही काळाची गरज असल्याचे अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून नमूद केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आयोजकांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व भविष्यात असेच कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला. हा मेळावा केवळ एक सांस्कृतिक सोहळा नव्हता, तर समाजासाठी कार्य करणाऱ्या कलाकारांच्या कायार्चा गौरव करणारी एक प्रेरणादायी घटना ठरली.

# नागद्वार यात्रेसाठी एसटी बसेस उपलब्ध

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

नागद्वार यात्रेला जाण्यासाठी गणेशपेठ बसस्थानकावरून विशेष बस सेवा सुरू करण्यात आली आहे. रविवार पासून दुपारी दर अर्धा तासानंतर तर रात्री दर १५ मिनिटांनंतर एसटीची लालपरी भाविकांसाठी उपलब्ध आहे.

मध्य प्रदेशातील पचमढी येथील नागद्वार यात्रेकरिता महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बसेसला परवानगी देण्यासंदर्भात मध्यप्रदेशने नकारघंटा सुरू केली होती. राज्य मार्ग परिवहन महामंडळाला परवानगी मिळत नसल्याने यंदा यात्रेबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्याशी संपर्क साधल्यानंतर परवानगी मिळाली.

एसटी महामंडळाच्या नागपूर विभागाने नागद्वार यात्रेसाठी स्पेशल बसेस चालविण्याचे वेळापत्रक जाहीर केले असून ३० जुलैपर्यंत गणेशपेठ बसस्थानकावरून भाविकांना रोज २४ बसेस नागद्वार यात्रेसाठी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे परत आणण्यासाठीही दररोज २४ बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. या बसेस नागपूर ते नागद्वार यादरम्यान दुपारी ४ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुटतील. त्याचवेळी या बसेस दुपारी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत दर अर्ध्या तासाने पचमढीहून नागपूरला परत येतील. नागद्वार यात्रेकरिता जाणाऱ्या भाविकांसाठी गणेशपेठ बसस्थानकावर आगाऊ तिकीट आरक्षण सुविधा एसटीने करून दिली आहे.

बसेसच्या वेळा : दुपारी ४ वाजता, ४.३० वाजता, सायंकाळी ५ वाजता, ५.३०, ६ वाजता, ६.१५ ६. ३०, ६. ४५ वाजता, रात्री ७ वाजता, ७. १५, ७.३०, ७.४५, ८ वाजता, ८.१५. ८.३०, ८.४५, ९ वाजता, ९.३०, ९.४५, १० वाजता, १०.१५, १०.३०, आणि रात्री ११ वाजता जत्रा स्पेशल बस भाविकांसाठी उपलब्ध राहणार आहेत.

दुपारी ३ वाजता, ३.१५, ३.३०, ४ वाजता, ४.४०, ५ वाजता, ५.३०, ५.४५, ६ वाजता, ६.३०, रात्री ७ वाजता, ७.१५, ७.३०, ७.४५, ८ वाजता, ८.१५, ८.३०, ८.४५, ९ वाजता, ९.१५, ९.३०, ९.४५, १० वाजता, १०.१५ रात्री १०.३० वाजता. तर दुसरीकडे दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभाग उपभोक्ता सल्लागार समितीची झालेल्या दुसऱ्या बैठकीत प्रवाशांच्या सुविधांसह विविध मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. दपूम रेल्वे नागपूर विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक बैठकीत प्रवाशांच्या सुविधेसाठी गोंदिया-रायगड जनशताब्दी एक्स्प्रेसचा आमगाव येथे थांबा द्यावा, स्थानकावर वयोवृद्ध व दिव्यांग प्रवाशांसाठी बॅटरी कारची सोय करावी, पुणे-हावडा दुरंतो एक्स्प्रेसचा गोंदिया येथे थांबा द्यावा, एक्स्प्रेसला कामठीमार्गे दररोज चालविण्यात यावे.

# सालई ग्राम पंचायत येथे वृक्षारोपण कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २१ :

सालई येथे मोठ्या उत्साहात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.हिवरा बाजार सालई परिसरातील सर्व सरकारी इमारती परिसरात व शाळेचा परिसर व ग्राम पंचायत परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. जवळपास ९०० वेगवेगळ्या जातीचे वृक्ष चीच, आवळा, आंबा, बेल, अशोका अशा विविध जातीचा झाडांची लागवड करण्यात आली. या वर्षात जवळपास ५ ते ७ हजार विविध जातीचा झाडांची लागवड, स्मशान घाट परिसर व आजूबाजूच्या परिसरात करणार असल्याची माहिती सरपंच उत्तम धराडे यांनी दिली. यावेळेस सालई ग्रामपंचायतचे सरपंच उत्तम धराडे, ग्रामविकास अधिकारी मायावती देशपांडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अमोल नेवारे, सुधीर चौधरी, नामदेव सोनवणे व गावातील नागरिक उपस्थित होते.

# राज्यातील शालेय शिक्षणाच्या सद्यस्थितीची काढावी श्वेतपत्रिका

## मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन 65 वर्ष लोटूनही अद्याप 8 हजार 213 गावात एकही शाळा नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली. त्याचप्रकारे परॉर्मिंग ग्रेडिंग इंडेक्सच्या अहवालातही राज्यातील शिक्षण व्यवस्थेचा दर्जा खालावल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या सर्व परिस्थितीन जबाबदार कारणांचा शोध घेत राज्य शासनाने शालेय शिक्षणाबाबतच्या सद्यस्थितीची अध्ययनाधारित श्वेतपत्रिकाच काढावी अशी मागणी मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीचे प्रमुख संयोजक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्र्यांना पत्राद्वारे केली आहे. राज्यातील 8 हजार 213 गावांत अद्यापही शाळाच नसल्याचा मुद्दा विधिमंडळात नुकताच गाजला. या गावांमध्ये शाळा न देता येथील मुलांना दुसऱ्या गावाला शिकण्यासाठी पाठविले जात असल्याचेही निदर्शनास आहे. विशेष म्हणजे जनप्रतिनिधींनी याबाबत विचारलेल्या प्रश्नाला विधीमंडळात ठोस उत्तरही शालेय शिक्षण मंत्र्यांना देता आलेले नाही. त्यामुळे गावांमध्ये शाळेची सुविधा उपलब्ध करून देण्याचे सोडून मुलांना दुसऱ्या या प्रकाराला कोणकोणत्या यंत्रणा जबाबदार आहेत.

# आज वाडीत रक्तदान शिबीराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

दत्तवाडी येथील गजानन सोसायटी मधील श्री संत गजानन महाराज मंदीरांच्या प्रगणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार २२ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजता पर्यत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे.

तरी रक्तदात्यानी रक्तदान करण्याचे आवाहन भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष कैलाश मंथापूरवार, भाजपा महीला आघाडी वाडी मंडळ अध्यक्ष कल्पना सगदेव तसेच भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आदींनी केले आहे.

# कुहीत गुरुशिष्य कार्यशाळा, लोककला महोत्सव कलाकारांचा सत्कार



**कुही :** मानसी सांस्कृतिक कला मंडळ मुसळगाव व ऑरेंज सिटी बहुउद्देशीय संस्था विहीरगाव, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने कुही येथील येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात गुरुशिष्य कार्यशाळा स्नेहमिलन व पारंपारिक सांस्कृतिक लोककला महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

महोत्सवाचे उद्घाटक भाजपा युवा मोचार्चे तालुका अध्यक्ष सौरभ दंडारे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे तहसीलदार अमित घाडगे, गटविकास अधिकारी डॉ. स्वप्निल मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील गोपाले, पत्रकार प्रदीप घुमडवार, माजी जि.प.सदस्य अरुण हटवार, मानधन समिती सदस्य डॉ.आनंद खडसे, डॉ. चिंतामण भुजाडे, सपना राऊत, किशोर येळणे, अलंकार टेंभुर्णे, भाऊराव शेंडे मंचकावर उपस्थित होते.विदभार्तील जिल्ह्यातून अनेक कलावंतांनी या कार्यक्रमात भाग घेऊन आपली कला सादर केली. कीर्तन, पोवाडे, भारुड, भजन, दंडार ,गोंधळ सहविविध लोककलेच्या माध्यमातून सादर कला करून समाजात जनजागृती करण्याचे काम करण्यात आले. प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते कलावंतांचा मानसन्मान व सत्कार करून उत्कृष्ट सन्मान प्रमाणपत्र देउन गौरव करण्यात आला. प्रसंगी कार्यक्रमात गोविंद राऊत, निशिगंधा राऊत, मंजुषा बागडे, संदेश गणवीर, रोशन बावणे, अशोक लोणारे, रोमदेव शेबे, नंदू वंजारी, पियुष खडसे, बादल खांडेकर, रामदास मानेराव, राजू भोयर हे सर्व मंडळी आपापल्या मंडळासमवेत उपस्थित होते. प्रास्ताविक शाहीर कालीचरण शेंडे, आभार पत्रकार निखिल खराबे यांनी मानले. शाहीर पुरुषोत्तम खांडेकर निनाद बागडे निशांत सुखदेवे सुरज नवघरे भगवान वानखेडे उपस्थित होते.

## देवळी परिसरातील बोर नदीत रसायनयुक्त लाल पाणी.... रसायने नदीत सोडणा?

**हिंगणा (ता २१)** तालुक्यातील देवळी (काळबांडे) गावालगत वाहणा?्या बोर नदीच्या जलपात्रात काही कारखान्यामधून रसायनयुक्त पाणी सोडल्याने या नदीचे पाणी लालसर झाले आहेत. या प्रकाराची चौकशी करून रसायने नदीत सोडणा?्यांवर तात्काळ कार्यवाईची मागणी येथील सरपंचासह नागरिकांनी केली आहे. या नदीचे पाणी काही गावात वापरतात तर जनावरांना सुद्धा पिण्यासाठी या नदीचे पाण्याचा वापर होतो. मात्र काही दिवसांपासून या नदीच्या पाण्यात कोणत्यातरी कंपणीने रसायनयुक्त दुषीत पाणी सोडले असल्याने नदीतील पात्रातील पाणी पुण:र्ता दुषीत होवुन लाल पाणी झाले आहे.

# पाटणकर रंगमंच आणि बालोद्यानची सफाई नाही

**प्रभू गजभिये**
**नागपूर, दि. २१**

उत्तर नागपुरातील प्रभाग क्र. २ तथागत कॉलनी, पाटणकर चौकातील नागोराव पाटणकर खुले रंगमंच आणि बालोद्यान येथे साफसफाईचा अभाव असून काही दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. प्रसिद्ध कव्वाल नागोराव पाटणकर यांच्या नावाने हे रंगमंच आणि बालोद्यान तयार करण्यात आले आहे. मात्र, मागील अनेक दिवसांपासून या बालोद्यानची साफसफाई होत नसल्याने रंगमंच परिसरात कचऱ्याचे ढिगारे जमा झाले आहेत. बालोद्यानात येणाऱ्या लोकांना आणि लहान मुलांना नाकावर रुमाल बांधून फिरावे लागते. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे बालोद्यानचे विद्रूपीकरण होत असून



त्यामुळे लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. सफाई कर्मचारी आणि कचरा उचलणाऱ्या गाडीचालकाला कचरा उचलण्यास सांगितले असता ये हमारा काम नही अशी अरेरावीची भाषा वापरतात असे चंद्रकांत रामटेके यांनी सांगितले.

बालोद्यानसमोरच काही दुकानदारांनी अतिक्रमण करून तेथे आपली दुकाने थाटली आहेत. त्याचाही उपद्रव लोकांना सहन करावा लागतो. रात्रीच्या वेळी काही असामाजिक तत्व येथे मद्य प्राशन करायला येतात. तेथेच मद्य, पाण्याच्या बाटल्या आणि खाण्याचे पदार्थ फेकून निघून जातात. काहीजण तर तेथेच मुत्रालय म्हणून वापर करतात असे नरेश बोरकर यांनी सांगितले. बालोद्यानसमोरच काही ट्रकचालक आपली अवजड वाहने उभी करतात. त्यामुळे या मार्गाने जाताना बराच त्रास होतो अशी तक्रार सुदेश शेंडे यांनी केली. मनपा प्रशासनाने बालोद्यानची साफसफाई करून, उद्यानात येणाऱ्या असामाजिक तत्वांना आवर घालावा अशी मागणी सुदर्शन मून, सुरेश सिरसाट, प्रकाश पाटील, आनंद वानखेडे, दीपक गायकवाड यांनी केले आहे.

महासागर
प्रभाग वार्ता

## पाईप लाईन टाकण्यासाठी चक्क सिमेंटचा रस्ताच खोदला

**महासागर प्रभाग मित्र**
**नागपूर, दि. २१**

मध्य नागपुरातील अंसारनगर परिसरात नवीन गडर लाईन टाकण्यासाठी काम करणाऱ्या ठेकेदाराने चक्क सिमेंटचा रस्ता खोदून ठेवल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

अंसारनगर येथील मुख्य रस्त्याला लागून असलेली गडर लाईन खराब झाली आहे. त्यामुळे गटारीतील घाण पाणी रस्त्यावर वाहत असते. नवीन गडर लाईन टाकण्यात यावी यासाठी मागील अनेक वर्षांपासून परिसरातील लोक मागणी करीत होते. परंतु, प्रशासनाला जाग येत नव्हती. शेवटी मुहूर्त ठरला आणि नवीन लाईन टाकण्याचा निर्णय घेतला. तीन टप्प्यात हे काम होणार होते. शेवटच्या टप्प्यात अंसारनगर येथील आरिफ गोला ते अमीन क्लिनिकपर्यंत पाईप लाईन टाकण्यात येत होते. परंतु, संबंधित ठेकेदाराने जुन्या पाईप लाईनवर गोदकाम न करता चक्क सिमेंटचा रस्ता खोदला. त्यामुळे रस्ता खराब झाला आहे. प्रशासनाच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी ठेकेदाराला काम थांबविण्याचे आदेश दिले.

## मोकळ्या भखंडावर पाणी साचल्याने मच्छरांचा त्रास

**महासागर प्रभाग मित्र**
**नागपूर, दि. २१**

नरसाळा आणि हुडकेश्वर मार्गावरील मोकळ्या भूखंडात पावसाचे पाणी साचल्याने मच्छरांचा त्रास वाढला आहे.

शहरात काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी तुरळक पाऊस पडत आहे. हुडकेश्वर मार्गावरील साईनगर, आम्रपालीनगर, श्यामनगर, शक्तीनगर, पवनसूतनगर या परिसरात मोठ्या प्रमाणात भूखंड आहेत. या भूखंडात कचरा जमा झाला असून, सोबतच गवत उगवले आहे. श्यामनगरात देखील मोकळ्या भूखंडात पाणी जमा झाले. मुसळधार पाऊस झाला की, मोकळ्या भूखंडातील कचरा लोकांच्या घरात जाते. जोरदार पाऊस झाला की, पाणी वाहून जाते. परंतु, अजूनपर्यंत जोरदार पाऊस न झाल्याने पाणी जमा वाहून गेले नाही. त्यामुळे मच्छरांची पैदास वाढली आहे. मनपा झोन कार्यालयात तक्रार केली तरी लोकांच्या तक्रारीकडे कुणीही लक्ष देत नाही. पावसाळ्याच्या दिवसात या समस्या निर्माण होतात असे या परिसरातील लोकांनी सांगितले. जमा झालेल्या पाण्यावर औषधाचा मारा करून मच्छरांचा नायनाट करावा अशी मागणी जोर धरत आहे.

## मानेवाडा घाट अंधारात

**महासागर प्रभाग मित्र**
**नागपूर, दि. २१**

मानेवाडा स्मशानघाट येथे मुलभूत समस्यांचा अभाव असून अंधाराचे साम्राज्य पसरले असून रात्री उशीरा आलेल्या लोकांना अंधारात अंत्यसंस्कार करावे लागत आहे.याप्रकरणी एक सजग नागरिक सारंग ढोक यांनी सांगितले की, गुरुवारी त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीचा मृत्यू झाला होता. रात्री उशीरा लोक अंत्यसंस्कारासाठी मानेवाडा घाट येथे आले. त्यावेळी तेथे अंधाराचे साम्राज्य पसरले होते. लोकांनी अंधारातच अंत्यसंस्कार केले. अंत्यसंस्काराला आलेल्या लोकांनी तेथे हजर असलेल्या कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता त्यांच्याकडे काहीच उत्तर नव्हते. स्मशानघाट सारख्या संवेदनशील ठिकाणी उजेडाची नितांत आवश्यकता आहे. अगोदरच आप्तजन गेल्यामुळे कुटुंबिय दु:खात असतात. त्यातच घाटावर आल्यानंतर प्रशासनिक समस्यांना सामोरे जावे लागते.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, ही पहिली घटना नसून यापूर्वी देखील अशा घटना घडल्या आहेत. परंतु, प्रशासनाच्या वतीने ही समस्या दूर करण्यात येत नाही. प्रशासनाने लवकरात लवकर मानेवाडा घाट येथे प्रकाशाची व्यवस्था करावी आणि अंत्यसंस्काराला येणाऱ्या लोकांना दिलासा द्यावा अशीही मागणी या नागरिकांनी केली आहे.

## नंदनवनमध्ये जीर्ण इमारतीमुळे अनेकांचा जीव धोक्यात

**महासागर प्रभाग मित्र**
**नागपूर, दि. २१**

नंदनवन येथील पित्रेश्वरी अपार्टमेंट ही इमारत पुर्णपणे मोडकळीस आली असून त्यामुळे या इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांसोबतच आजूबाजूच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

परिसरातील नागरिकांनी सांगितले की, सुमारे ४२ वर्षांपूर्वी ही इमारत बांधण्यात आली होती. आता ही इमारत जीर्ण झाली आहे. ६ सप्टेंबर २०२४ मध्ये पी. टी. मसे अँण्ड असोसिएट कडून या इमारतीचे स्ट्रकरल ऑडिट करण्यात आले. त्यामुळे ही इमारत मोडकळीस आल्याचे लक्षात आले. संभाव्य घटना लक्षात घेता मनपाच्या नेहरूनगर झोनच्या वतीने ७ एप्रिल



२०२५ रोजी इमारत रिकामी करण्याची नोटीस देऊन आपली जबाबदारी झटकली आहे. रहिवाश्यांनी या नोटीसला केराची टोपली दाखवित आजही ते तेथेच वास्तव्यास आहेत.

या इमारतीत राहणाऱ्या लोकांनी सांगितले की, मनपाने दिलेल्या नोटीसचे उत्तर देण्यात आले आहे. मनपाकडून इमारत पाडण्यासंदर्भात कुठलीही तारीख दिली नाही. इमारतीत राहणारे लोक इमारत सोडण्यास तयार नाहीत. या इमारतीत सहा फ्लॅट आणि दोन दुकाने आहेत. इमारतीत राहणाऱ्या काही लोकांनी १२ डिसेंबर २०२४ आणि १२ मार्च २०२५ ला स्ट्रकरल ऑडिट रिपोर्टसह मोडकळीस आलेली इमारत पाडण्यासाठी नेहरूनगर झोनमध्ये तक्रार केली होती असेही या लोकांनी सांगितले.

एक मात्र खरे की, सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने मोडकळीस आलेल्या इमारतीला काहीही होऊ शकते. त्यामुळे इमारतीत राहणाऱ्या लोकांसह आजूबाजूच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. तरी मनपाने या गंभीर प्रकाराची त्वरेने दक्षता घ्यावी अशी मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेत प्रकल्पनिहाय समन्वय अधिकारी देणार

**अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला**



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०'' च्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेतांना अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, सोबत इतर अधिकारी.

**नागपूर, १९ जुलै २०२५:** ''मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०'' ची प्रभावी अंमलबजावणीसाठी करणेसाठी तसेच प्रकल्प विहित कालमयार्देत पूर्ण करण्यासाठी प्रकल्पनिहाय आणि जिल्हानिहाय समन्वय अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत. अशी माहिती अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनी आज नागपुरात दिली

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने साकार झालेल्या या योजने अंतर्गत १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करण्याचे भव्य उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याचा थेट फायदा शेतक?्यांना होणार असून, त्यांना दिवसा भरवशाची वीज मिळेल आणि सिंचनाचे प्रश्न सुटण्यास मदत होईल.

नागपूर जिल्ह्यासाठी २७८ मेगावॅटचे उद्दिष्ट आहे, ज्यासाठी १५ विकासकांना काम देण्यात आले आले असून, ५९ वीज उपकेंद्रांतील कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करायचे आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नागपूर जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सच्या बैठकीत श्रीमती आभा शुक्ला बोलत होत्या.

श्रीमती आभा शुक्ला यांनी योजनेच्या जलद आणि यशस्वी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा केली. यामध्ये सौर प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी, तांत्रिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि वन विभागाशी संबंधित अडचणी दूर करणे यावर भर देण्यात आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनीची उपलब्धता सुलभ करण्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. खाजगी शेती जमीन मालकांना या योजनेत लाभ घेण्यासाठी मिळणा?्या लाभाबाबत व्यापक जनजागृती करण्याबाबत आदेशित करण्यात आले.

या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी, जिल्हा पोलीस उपअधीक्षक विजय माहुलकर, उप वन संरक्षक अधिकारी यश काळे, जिल्हा भुसंपादन अधिकारी इंदिरा चौधरी, महानिर्मितीचे मुख्य अभियंता रमेशकुमार ओस्वाल, अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण कार्यालय उदय भोयर, जिल्हा विद्युत निरीक्षक उमाकांत धोटे, महाऊजार्चे व्यवस्थापक सारंग महाजन महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, नागपूर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, बैठकीला महाराष्ट्र एम एस ई बी सोलर?ग्रो पॉवर लिमिटेडचे सल्लागार श्रीकांत जलतारे, नविकरणीय ऊजार्चे अधीक्षक अभियंता निखील मेश्राम यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### विकासकांना इशारा: वेळेत काम पूर्ण करा...

श्रीमती आभा शुक्ला यांनी ''मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०'' च्या नागपूर जिल्ह्यातील प्रकल्प विकासकांसोबत बैठक घेऊन त्यांच्या प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी विकासकांना त्यांच्या प्रकल्पाच्या प्रगतीची नियमित नोंद योजनेसाठी तयार केलेल्या पोर्टलवर करण्याचे तसेच वेळेत प्रकल्प पुर्ण करण्याचे निर्देश दिले.

श्रीमती आभा शुक्ला यांनी वेळेत प्रकल्प पूर्ण करणा?्या विकासकांना केंद्र शासनातर्फे प्रति मेगावॅटसाठी १ कोटी रुपये आणि महाराष्ट्र शासनातर्फे प्रति युनिट २५ पैसे अनुदान मिळणार असल्याची माहितीही दिली. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचा थेट फायदा राज्यातील शेतक?्यांना होणार असून, त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती देखील होणार असल्याचे श्रीमती आभा शुक्ला यांनी नमूद केले.

या योजनेच्या पोर्टलमध्ये विकासकाला जमिनीबाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेबाबत येणा?्या अडचणी मांडण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून, त्याचा ?क्सेस जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही देण्यात आला आहे. यामुळे प्रकल्प उभारणीत येणा?्या समस्यांचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या स्तरावर देखील निराकरण होईल, असेही श्रीमती आभा शुक्ला यांनी सांगितले.

# जमीन व घरकुलांसाठी बेघरांचे पालकमंत्र्यांना साकडे




राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र परंतु, घरकुलांच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या बेघरांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून जमीन व घरकूलांसाठी अनुदान देण्याची मागणी आवास- भूमी अधिकार अभियान- शहर विकास मंचच्या वतीने राज्याचे महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुडे यांच्याकडे करण्यात आलेली आहे.

नागपूर ग्रामीणमधील बेघरांच्या भरगच्च शिष्टमंडळाने शहर विकास मंचचे संयोजक अनिल वासनिक व संघठक युवराज फुलझेले यांच्या नेतृत्वात पालकमंत्री बावनकुळे यांची कोराडी येथील कार्यालयात भेट घेऊन मागणीचे निवेदन आज सादर केले. या शिष्टमंडळात पालकमंत्र्यांच्या कामठी मतदार संघातील खापरी व परिसरातील बेघर बहुसंख्येने होते.

महाराष्ट्र सरकारच्या शासनादेशानुसार भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गच पात्र परंतु, घरकूल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना आहे, पण याचा लाभ ग्रामीण बेघरांना मिळत नसल्याची आवास- भूमी अधिकार अभियानची तक्रार आहे.

# नागपूर ग्रामीण तालुका मधील जिल्हा परिषद गटांची फेररचना: कही खुशी, कही गम

**वाडी, २१ जुलै**

नागपूर (ग्रामीण ) तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या गट, गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध झाले असून, यामुळे संपूर्ण राजकीय वतुर्ळात हलचल निर्माण झाली आहे. सत्ताधारी पक्षांनी या रचनेचे स्वागत केले असले, तरी विरोधकांकडून गट रचनेत पक्षीय हितसंबंधासाठी मोडतोड केल्याचा आरोप केला जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुकांबाबत न्यायालयाने आदेश दिल्यानंतर ग्रामविकास विभागाने अधिसूचना काढली आणि प्रारूप गट रचना प्रसिद्ध केली. नागरिकांना २१ जुलैपर्यंत हरकती व सूचना सादर करता येणार आहेत.

राजकीय इच्छुकांमध्ये गट रचनेवरून स्पष्टपणे कही खुशी, कही गम अशी स्थिती दिसत आहे. काही गटांची नावे बदलली असून, अनेक गावांच्या समावेशातही मोठे फेरबदल झाले आहेत. त्यामुळे काही इच्छुकांचे राजकीय गणित पूर्णत: बदलले आहे.

भोकारा जिल्हा परिषद सर्कलमध्ये ब्राह्मणवाडा, बैलवाडा, वलनी, खंडाळा,पारडी, बोरगाव (खुर्द ), आष्टी, येरला, गोन्ही ,माहुरझरी, फेटरी, चिचोली, बोदाळा, गुमथळा, घोगली, लोणारा, चक्कीखापा, भरतवाडा, भोकारा हे समाविष्ठ आहे.

कापसी खुर्द जिल्हा परिषद सर्कल मध्ये कापसी (खुर्द ), विहीरगाव, अव्वाली,कळमना, टाकळी, उमरगाव, हुडकेश्वर (खुर्द ), धामना, किरणापुर कन्हाळगाव, विळंबा, निंबा, नवेगाव, सालई गोधणी , कालडोंगरी, रुई, गवसी मानापूर, झरी, बनवाडी, कल्कुही, तेल्हारा, खापरी (रेल्वे ), दहेगाव, पांजरी बु, परसोडी, वरोडा, जामठा, छुटी, खसरमारी, डोंगरगाव, सुकळी, पांजरी लोधी, खातमारी, नवरमारी, मांगरुळ, तुमडी, सिंदीविहीरी, जुनापाणी हे गाव समाविष्ठ आहे.

दवलामेटी जिल्हा परिषद सर्कलमध्ये लाव्हा, खडगाव, द्रुगधामणा, सुराबर्डी,दवलामेटी हे गाव समाविष्ठ आहे. सोनेगाव (निपाणी ) जिल्हा परिषद सर्कलमध्ये सोनेगाव (निपाणी ), व्याहाड,

पेठकाल डोंगरी, चंद्रपूर रिठी, धामणा, लिंगा, मोहगाव खुर्द, मोहगाव बु. शिरपूर, भुयारी, खरी, आमगाव, कवडीमेठ, बंधारा, सातनवरी, दगा, पाचनवरी, माळेगाव खुर्द, मालेगाव बु, बाजारगाव, पांजरा, शिवा, खापरी, स्कटंगा हे गाव समाविष्ठ आहे.

बोरखेडी ( फाटक ) जिल्हा परिषद सर्कलमध्ये वारंगा, परसोडी (गो), बोथली,

चाकेश्वर, बोरखेडी (फाटक ), मोहगांव, देवळीगुजर, व्याहाडघाट, कोलार, घोटी, किन्हाळमाकडी, खापरी (सुभेदार), जयपूर, कन्हाळगांव, रहीमाबाद/रिधोरा, सोनुली, वाठोडा, म्हसाळा, गोपाळपूर, दुधाला, रुईखैरी, मुरारपूर, डोंगरगांव, सोनेगांव (बोरी ), बोरखेडी (रेल्वे), जंगेश्वर, पिपरडोल, दुधा, तारसी, धवळपेठ, नवेगाव, मांगली, कवठा, चिचोली, ब्राहाणी, आलागोंदी, टेंभरी, चिमनाइरी, रामा, रहिमापूर, वडगांव, सोनेगांव (लोधी), मोहगांव, चिचकोटा, दहेली, पोही, तामसवादी, खस्दा, वहमांजरा, आष्टा, जमापूर हे गाव समाविष्ठ आहे.सध्या गट रचना निश्चित झाल्यामुळे इच्छुकांची नजर आता आगामी आरक्षणाच्या सोडतीकडे लागली आहे. कोणता गट महिला, मागासवर्गीय वा सर्वसाधारणासाठी राखीव राहणार, यावर या निवडणुकीत यशाची गणिते ठरणार आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांत आणि राजकीय इच्छुकांमध्ये या बदलांबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

# मनपाने केली कचरा संकलन वाहनांची तपासणी

**विशेष पथकाची दहाही झोन निहाय कचरा संकलन केंद्रांना दिली भेट**

**नागपूर, ता. २१ :** स्वच्छ, सुंदर व स्वस्थ नागपूर साकारण्यासह नागरिकांना उत्तम सोयीसुविधा प्रदान करण्यासाठी नागपूर महानगरपालिका कटिबद्ध आहे. मनपाद्वारे मे. ए. जी. इन्फ्रा प्रा. लि. आणि मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. या दोन एजन्सीला शहरातील कचरा संकलनाची जबाबदारी देण्यात आली आहे. या एजन्सीद्वारा शहरातील घरोघरी जाऊन कचरा संकलन करणा?्या वाहनांची मनपा आयुक्त श्री. अभिजीत चौधरी यांचे निर्देशांनुसार अतिरिक्त आयुक्त (शहर) श्रीमती. वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात सोमवारी (ता.२१) तपासणी करण्यात आली.

नागपूर महानगरपालिका हद्दीत कचरा संकलन आणि वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याकरिता आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी मनपाच्या दहाही झोन निहाय असणा?्या कचरा संकलन वाहनांच्या पार्किंग स्थळांना भेट दिली. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त श्री. राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सर्व झोनल अधिकारी,



एनडीएचे झोन प्रमुख, कारखाना विभागाचे कर्मचारी व आयईसी चमूचे सदस्य यांच्यासह मे. ए. जी. इन्फ्रा प्रा. लि. आणि मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. चे प्रतिनिधी उपस्थित होते. शहरातील कचरा संकलनाची जबाबदारी असलेल्या मे. ए. जी. इन्फ्रा प्रा. लि. आणि मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. या दोन्ही एजन्सींच्या वाहनांची विशेष पथकाद्वारे तपासणी करण्यात आली. या दोन्ही एजन्सीद्वारे कचरा संकलनासाठी लहान आणि मोठी अशी एकूण ५३६ वाहने तैनात करण्यात आली आहेत. यात सीतानगर केंद्रावर ६४, जयताळा केंद्रावर ६९, बुधवार बाजार केंद्रावर १३, भांडेवाडी (ए.जी.) केंद्रावर १५०, भांडेवाडी (बीव्हीजी) केंद्रावर ८७, दही बाजार केंद्रावर ३५, कामगार नगर केंद्रवर ५६, आहुजानगर केंद्रावर ५७, मानकापूर घाट केंद्रावर ५ अशा ५३६ वाहनांची तपासणी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी वाहनांसंबधित अधिका?्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या.

पाहणी दरम्यान सीतानगर केंद्रावर श्री. ऋषिकेश इंगळे, जयताळा केंद्रावर श्री. दीनदयाल टेंभेकर, भांडेवाडी (ए.जी.) केंद्रावर श्री. विठोबा रामटेके, भांडेवाडी (बीव्हीजी) केंद्रावर श्री. मंगेश राऊत, बुधवार बाजार केंद्रावर श्री. दिनेश कलोडे, दही बाजार केंद्रावर श्री. वामन काईलकर, आहुजा नगर केंद्रावर श्री. प्रमोद आत्राम, मानकापूर घाट केंद्रावर श्री. भुषण गजभिये इत्यादी झोनल अधिकारी उपस्थित होते.